ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

M58 एम. ए. (लोकप्रशासन)

COURSE CODE : PAD605

BOOK CODE : PAD 6051



सत्र तिसरे

# PAD 605

# स्वयंसेवी संस्था आणि सहकार प्रशासन

## पुस्तक १ : स्वयंसेवी संस्था : संकल्पना आणि स्वरूप

यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त
विद्यापीठ

PAD 605
स्वयंसेवी संस्था आणि सहकार प्रशासन
Book Code : PAD 6051

पुस्तक १

# स्वयंसेवी संस्था : संकल्पना आणि स्वरूप

लेखक : डॉ. फारूक शेख


| | | | |
|---|---|---|---|
| घटक १ | : | स्वयंसेवी संस्था : संकल्पना, स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व | १ |
| घटक २ | : | स्वयंसेवी संस्था : संरचना, वैशिष्ट्ये व प्रकार | १२ |
| घटक ३ | : | स्वयंसेवी संस्था : अधिनियम व वैधानिक तरतुदी | २२ |
| घटक ४ | : | स्वयंसेवी संस्था : जागतिक संदर्भ | ३४ |
| घटक ५ | : | स्वयंसेवी संस्था व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण | ५० |
| घटक ६ | : | स्वयंसेवी संस्थेपुढील समस्या आणि आव्हाने | ६० |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

## संचालक : नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

### मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषद

नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

प्रा. डॉ. संजीवनी महाले
संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. चेतना कामळस्कर
संचालक
विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. सुरेंद्र पाटोळे
संचालक
वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

श्रीमती शुभांगी पाटील
सहायक प्राध्यापक
विद्यार्थी सेवा विभाग
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. मंजुलिका श्रीवास्तव
संचालक, अंतर्गत गुणवत्ता
आश्वासन केंद्र, इंदिरा गांधी राष्ट्रीय
मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली

डॉ. संदिप चौधरी
विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग
सरस्वती भुवन महाविद्यालय
औरंगाबाद

प्रा. डॉ. भारती गोरे
प्राध्यापक, हिंदी विभागप्रमुख
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. श्यामल बनसोडे
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग मुंबई विद्यापीठ
मुंबई

डॉ. ज्योती निसवाडे
प्राध्यापक
मातृ सेवा संघ समाजकार्य महाविद्याल
नागपूर

डॉ. अजित गागरे
सहायक प्राध्यापक
मीडिया ॲण्ड कम्युनिकेशन स्टडीज
सावित्रीबाई फ़ुले पुणे विद्यापीठ, पुणे

डॉ. शिल्पा वाकचौरे
ग्रंथपाल, गोखले एज्युकेशन संस्थेचे
शिक्षणशास्त्र व संशोधन
महाविद्यालय, परळ, मुंबई

डॉ. नुसरत मीनू
उर्दू विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला
आणि सामाजिकशास्त्रे संस्था, नागपूर

### राज्यस्तरीय शिक्षणक्रम सल्लागार समिती (लोकप्रशासन)

नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

प्रा. डॉ. श्याम शिरसाठ
लोकप्रशासन विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छ. संभाजीनगर

प्रा. डॉ. जितेंद्र वासनिक
प्रमुख, लोकप्रशासन विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ
नागपूर

प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार
लोकप्रशासन विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर

प्रा. डॉ. मृदुल निळे
नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. डॉ. शामसुंदर वाघमारे
लोकप्रशासन विभाग
शारदा महाविद्यालय, परभणी

प्रा. डॉ. संजय भालेराव
लोकप्रशासन विभाग
शिवाजी महाविद्यालय, कन्नड

प्रा. डॉ. प्रकाश पवार
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. विजय तुंटे
राज्यशास्त्र विभाग
प्रताप महाविद्यालय, अमळनेर

प्रा.डॉ. पांडुरंग भोये
राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग सा. फु. पु.
विद्यापीठ पुणे

प्रा. डॉ. जयश्री बिरदवडे
लोकप्रशासन विभाग
ए. बी. भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव (रं) छत्रपती संभाजीनगर

प्रा. डॉ. मीरा फड
लोकप्रशासन विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड

प्रा. डॉ. अमोल काळे
लोकप्रशासन विभाग
पीपल्स महाविद्यालय, नांदेड

डॉ. योगेश भादे
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती
संभाजीनगर

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे**

**संचालक : नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**


| **लेखक** | **संपादक** |
|---|---|
| डॉ. फारुख शेख<br>प्राचार्य, संदीप कॉलेज झोडगे तालुका<br>मालेगाव, जिल्हा नाशिक | प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार<br>लोकप्रशासन विभाग<br>देगलूर महाविद्यालय, देगलूर |

**शिक्षणक्रम संयोजक**

डॉ. सुनील लक्ष्मण गावंडे
शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक स्तर)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**निर्मिती**

श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



© **२०२४, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**



- **प्रथम मुद्रण :** जुलै २०२४ ● **प्रकाशन क्रमांक :**
- **मुखपृष्ठ रेखाटन :**
- **अक्षरजुळणी :** मे आर.एस.एंटरप्रायजेस, नाशिक
- **प्रकाशक :** श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

# कुलगुरूंचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020 नुसार एम. ए. लोकप्रशासन या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतल्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो. या शिक्षणक्रमाची पुस्तके आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020 नुसार विद्यापीठाने समाजाच्या गरजेनुरूप कौशल्याधिष्ठित शिक्षणक्रम विकसनास प्राधान्य देऊन शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. केवळ पारंपरिक शिक्षणावर आणि पुस्तकी ज्ञानावर भर न देता, दैनंदिन जीवनात स्वत:च्या व समाजाच्या हितासाठी ज्ञानाचे उपयोजन कसे करावे, याचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा विद्यापीठाने सतत प्रयत्न केलेला आहे. विद्यापीठाने शिक्षणाच्या संधीचे लोकशाहीकरण करताना केवळ आर्थिक कुवत नाही म्हणून शिक्षण घेता आले नाही अशी स्थिती असणाऱ्या अनेक विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणत ज्ञानगंगा घरोघरी पोहोचवणारी शिक्षण प्रणाली निर्माण करून देत राज्याच्या विकासात आपले योगदान दिले आहे. कोणत्याही कारणाने शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. काम करता करता शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी वाढीव कालावधी, अत्यल्प शिक्षणक्रम शुल्क, लवचीक आणि विद्यार्थिकेंद्री प्रशासन, इत्यादी मुक्त शिक्षणप्रणालीची वैशिष्ट्ये आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि शासनाकडून वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध संस्था-संघटनांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार तसेच बदलत्या काळाची आणि परिस्थितीची गरज लक्षात घेऊन विद्यापीठाकडून नवनवीन अभ्यासक्रम तयार केले जातात. मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रमाची त्या त्या विषयातील तज्ज्ञांद्वारे विकसित दर्जेदार पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून दिली जातात.

लोकप्रशासन हा विषय एक विद्याशाखा म्हणून फक्त सव्वाशे ते दीडशे वर्षांपूर्वी अमेरिकेत अस्तित्वात आल्याचे दिसते. आता जगभरातील जवळपास सगळ्या प्रमुख विद्यापीठांमध्ये लोकप्रशासन एक स्वतंत्र विषय म्हणून शिकविला जात आहे. लोकप्रशासन एक विद्याशाखा म्हणून भारतातूनही मान्यता पावलेली दिसून येते.

राज्याच्या (स्टेट) बदलत्या स्वरूपानुसार आता राज्य केवळ कायदा व सुव्यवस्था पाहणारी व्यवस्था राहिली नसून लोकांचे सर्वंकष कल्याण करणारी व्यवस्था बनली आहे. मात्र आधुनिक कल्याणकारी राज्यात लोकांचे कल्याण साधण्याकरिता कायदेमंडळाने ठरविलेल्या धोरणांची यथोचित अंमलबजावणी करण्यासाठी राज्याएवढीच लोकप्रशासनाच्या कार्याचीही आवश्यकता निर्माण झाली आहे.

संघ लोकसेवा आयोगाची तयारी करणाऱ्या अध्ययनार्थीपासून ते ग्रामपंचायतीच्या सदस्यांपर्यंत या विषयाचा अभ्यास करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आढळतो. महाराष्ट्रातील असा वर्ग लक्षात घेऊन सदर शिक्षणक्रमाची मांडणी करण्यात आली आहे. विशेषत: लोकप्रशासन हा वैकल्पिक विषय घेऊन विविध विद्याशाखांतील विद्यार्थी केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करीत आहेत. प्रशासकीय सेवेमध्ये निवड झाल्यानंतर कर्तव्य पार पाडताना लोकप्रशासनातील या तत्त्वांचा व सिद्धांतांचा त्यांना व्यवहारात उपयोग होताना दिसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची ही गरज लक्षात घेऊन या शिक्षणक्रमात काही विशिष्ट अभ्यासक्रमांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. जसे 'ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था', 'महाराष्ट्र प्रशासन', 'ग्रामीण विकास', 'भारतातील लोकशाही व विकास' अशा महत्त्वाच्या अभ्यासक्रमाबरोबरच 'लोकप्रशासनातील नवप्रवाह', 'मानव व वित्तीय संसाधन व्यवस्थापन' व 'सामाजिक कल्याण प्रशासन', इत्यादी नवीन घटकांचाही समावेश करण्यात आला आहे. लोकप्रशासन विषयामध्ये अद्ययावत राहण्यासाठी विद्यापीठाने तुम्हाला पुरविलेल्या स्वयं-अध्ययन साहित्याबरोबरच तुम्ही योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य अशा

चालू घडामोडींवरील मासिकांचेदेखील नियमित अध्ययन करावे. विद्यापीठाने दृकश्राव्य माध्यमाचा अत्यंत प्रभावीपणे वापर करून विविध विषय तज्ज्ञांची व्याख्याने, मुलाखती विद्यापीठाच्या यु ट्युब वाहिनीवर (चॅनलवर) उपलब्ध करून दिल्या आहेत त्या आवर्जून पाहाव्यात.

पारंपरिक शिक्षणप्रणालीत विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांमध्ये दररोज अभ्यासवर्ग असतात, तर दूरशिक्षण प्रणालीमध्ये सुट्टीच्या दिवशी संपर्कसत्र आयोजित केली जातात. स्वत:च्या व्यावसायिक तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण पूर्ण करणे असे या संकल्पनेमध्ये अपेक्षित असल्याने संपर्कसत्राला जाताना त्या विषयाची, विषयातील घटकांची पूर्वतयारी, अभ्यास करून उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे तुमच्या शंका-अडचणी, संबंधित अध्यापकांना विचारून त्याचे निराकरण करून घेता येईल. आदर्श संपर्कसत्राचे स्वरूप एकसुरी व्याख्यानाऐवजी चर्चात्मक व्हावे अशी विद्यापीठाची भूमिका आहे.

आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रशासनात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदरहित प्रशासनावर भर दिला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांची पुस्तके डिजिटल स्वरूपात www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत, ती विद्यार्थी, शिक्षक तसेच जिज्ञासूंना उपयुक्त ठरतील अशी खात्री आहे.

आपल्या भविष्यातील वाटचालीसाठी पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा !

**- कुलगुरू**

## पदव्युत्तर पदवी (एम. ए. लोकप्रशासन) शिक्षणक्रम (M58)

*अभ्यासक्रम*

## स्वयंसेवी संस्था आणि सहकार प्रशासन (PAD 605)

**पुस्तक १ : स्वंयसेवी संस्था : संकल्पना आणि स्वरूप**

घटक १ : स्वयंसेवी संस्था : संकल्पना, स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व
घटक २ : स्वयंसेवी संस्था : संरचना, वैशिष्ट्ये व प्रकार
घटक ३ : स्वयंसेवी संस्था : अधिनियम व वैधानिक तरतुदी
घटक ४ : स्वयंसेवी संस्था : जागतिक संदर्भ
घटक ५ : स्वयंसेवी संस्था व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण
घटक ६ : स्वयंसेवी संस्थेपुढील समस्या आणि आव्हाने

**पुस्तक २ : स्वंयसेवी संस्था : प्रशासन आणि कार्यपद्धती**

घटक १ : स्वयंसेवी संस्था : नोंदणी प्रक्रिया
घटक २ : स्वयंसेवी संस्था : संरचना आणि व्यवस्थापन
घटक ३ : स्वयंसेवी संस्थाचे वित्तीय प्रशासन
घटक ४ : निवडक स्वयंसेवी संस्था
घटक ५ : स्वयंसेवी संस्था : समाजावरील प्रभाव आणि परिणाम
घटक ६ : प्रकल्प आराखडा आणि प्रकल्पाचे सादरीकरण

**पुस्तक ३ : सहकार : संकल्पना व चळवळ**

घटक १ : सहकार : संकल्पना व विचारप्रणाली
घटक २ : महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा इतिहास व विकास
घटक ३ : सहकारी संस्थांपुढील समस्या व आव्हाने
घटक ४ : सहकाराचे तत्त्व आणि व्यवहार
घटक ५ : सहकारी अर्थरचना : एक आकलन
घटक ६ : सहकारी संस्था : समाजावरील प्रभाव आणि परिणाम

**पुस्तक ४ : सहकार प्रशासन व व्यवस्थापन**

घटक १ : सहकार संकल्पना व शाश्वत विकास
घटक २ : सहकारी संस्था : नोंदणी प्रक्रिया
घटक ३ : व्यवस्थापन शास्त्र : एक विज्ञानसंमत संज्ञा/संकल्पना
घटक ४ : सहकारी संस्था : संरचना, व्यवस्थापन व संनियंत्रण
घटक ५ : सहकारी प्रशासनाचे स्वरूप
घटक ६ : सहकारी संस्थेत व्यवस्थापनशास्त्राचे व प्रशासनशास्त्राचे उपयोजन

# पुस्तक पहिले : स्वयंसेवी संस्था : संकल्पना आणि स्वरूप

## प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, स्वयंसेवी संस्था : संकल्पना आणि स्वरूप हे पुस्तक स्वयंसेवी संस्था आणि सहकार प्रशासन या अभ्यासक्रमातील पहिलेच पुस्तक आहे. या पुस्तकात एकूण सहा घटकांच समावेश करण्यात आला आहे.

घटक १ : स्वयंसेवी संस्था : संकल्पना, स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व, या घटकामध्ये या स्वयंसेवी संस्थेविषयी मूलभूत संकल्पना व त्याचे स्वरूप याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

घटक २ : स्वयंसेवी संस्था : संरचना, वैशिष्ट्ये व प्रकार या घटकात स्वयंसेवी संस्थेचे संस्थात्मक संरचना, जबाबदा-या तसेच त्याची वैशिष्ट्ये, प्रकार इत्यादीचा समावेश यात करण्यात आला आहे.

घटक ३ : स्वयंसेवी संस्था : अधिनियम व वैधानिक तरतुदी , या घटकामध्ये सोसायटी नोंदणी अधिनियम व प्रशासकीय यंत्रणा, निबंधकाचे अधिकार व विविध तरतुदी सदस्याची पात्रता व अपात्रता इत्यादीची चर्चा त्यामध्ये करण्यात आली आहे.

घटक ४ : स्वयंसेवी संस्था : जागतिक संदर्भ, या घटकात युनिसेफ़ तसेच फॉरेन कॉट्रीब्युशन रेग्युलेश यांचा समावेश करण्यात आला आहे.

घटक ५ : स्वयंसेवी संस्था व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण, या घटकात स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात दुर्बल घटकाच्या सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्थेचे योगदान, तसेच संस्था व दुर्बल घटकाचे अक्षमीकरण आणि सक्षमीकरणाच्या योजना यांचा आढावा घेण्यात आला आहे.

घटक ६ : स्वयंसेवी संस्थेपुढील समस्या आणि आव्हाने, या घटकात स्वयंसेवी संस्थेपुढे निर्माण झालेल्या समस्या तसेच आव्हानांची चर्चा करण्यात आली आहे.

उपरोक्त घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणास स्वयंसेवी संस्थेविषयी सविस्तर माहिती मिळेल.

# घटक १ : स्वयंसेवी संस्था : संकल्पना स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व

***अनुक्रमणिका***

१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
१.२.१ स्वयंसेवी संस्थेची संकल्पना
१.२.२ स्वयंसेवी संस्था : स्वरूप
१.२.३ स्वयंसेवी संस्था व व्याप्ती
१.२.४ स्वयंसेवी संस्थेतील कार्याचे महत्त्व
१.२.५ स्वयंसेवी संस्थेचे महत्त्व
१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

- स्वयंसेवी संस्थेची संकल्पना स्पष्ट करता येईल.
- स्वयंसेवी संस्थेचे स्वरूपाची माहिती समजेल.
- स्वयंसेवी संस्थेचे व्याप्तीचे पैलूंवर चर्चा करता येईल.
- स्वयंसेवी संस्थेचे महत्त्व याविषयावर सविस्तर अभ्यास करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

भारतात अथवा जागतिक पटलावर स्वयंसेवी संख्या, सामाजिक कार्य तथा सामाजिक सेवा संस्था, विकास गट आणि सामाजिक कृती गट अशा वेगवेगळया नांवानी ओळखले जाते. गांधीवादी, सर्वोदय, मार्क्सवादी, धार्मिक संबंधित, राजकीय पक्षासंबंधित, चर्च संबंधित सेवा अशा कार्यप्रक्रियेतून त्यांचे वर्गीकरण केले जाते. स्वयंसेवी कार्य ही मानवाच्या हदयातून येणारी स्फूर्तीदायी कृती आहे. अनेक व्यक्तीचा समूह आपले जीवन जगत असतांना

समाजातील विविध समस्या सोडवण्यासाठी एखाद्या स्वयंअनुभूतीने व स्वयंस्फूर्तीने किंवा एखादया व्यक्तिच्या प्रेरणेने मानव कल्याणासाठी स्वतःचे आयुष्य समर्पित करतात. विवेकशील बुध्दीनिष्ठ व्यक्तीचा समूह हा आपल्या जीवन जगण्याचे ध्येय मानतात आणि कार्यनिष्ठकडे वाटचाल करीत राहतात, वंचित मानवाच्या चेह-यावरील आनंद, समाधान यातच आपल्या जीवनाचा आनंद मानून जी माणसे अथवा ज्या व्यक्ती किंवा व्यक्तींचे गट कार्य करतात त्याला सेवाभावी कार्य असे म्हणतात.

सन १९४१ मध्ये महात्मा गांधीजींनी समाजसेवा कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचा संदेश दिला आहे यामध्ये ग्रामस्वच्छता, ग्रामोद्योग खादीनिर्मिती, प्रौढ शिक्षण, स्त्रियांच्या दर्जात सुधारणा मूलभूत शिक्षण, अस्पृश्यता निवारण, नशाबंदी, शेतकरी हक्क, आदिवासी कल्याण स्थानिक भाषा संवर्धन विद्यार्थी विकास व कल्याण अशा चौदा प्रकारांच्या कार्यक्रमाचा त्यात समावेश होता. महात्मा गांधीजींच्या प्रबोधनात्मक व कार्यात्मक राष्ट्रीय पातळीवरील ग्राम विकासाचा पहिला कार्यक्रम होता. सत्य, अहिंसा, श्रमप्रतिष्टा, समता, सेवाभाव या मुद्यावर आधारलेली शोषण मुक्त समाजव्यवस्था ही त्यांची आदर्श समाजाची संकल्पना होती. आज एकविसाव्या शतकात देखील महात्मा गांधींकडून प्रेरणा व स्फूर्ती घेऊन असंख्य कार्यकर्ते व सेवाभावी संस्था ग्रामिण भागात कार्य करीत आहेत.

स्वयंसेवी संस्थांची संकल्पना विशेषताः स्वयंस्फूर्तीने निगडित असलेल्या गटातून निर्माण होते. तसेच सामाजिक पीडित व शोषित समुदायांसाठी ग्रामीण, शहरी व आदिवासी इत्यादी क्षेत्रात त्यांचे स्वरूप व व्याप्ती निश्चित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण, शहरी व आदिवासी क्षेत्रात स्वयंसेवी संस्थांना सामाजिक विकास व सामाजिक कल्याणाचे शाश्वत प्रकल्प राबवून सामाजिक विकास व कल्याणाचे कार्य सुव्यवस्थितरित्या करतात. महाराष्ट्रातील आनंदवनातील बाबा आमटे यांचे कार्य, आदिवासी कल्याण व शिक्षण कार्यक्रमातील श्रीमती ताराबाई मोडक, अनुताई वाघ याचे कार्य, मागासवर्गीय व आदिवासी कल्याण क्षेत्रातील इसामुद्दिन बायदानी याचे कार्य, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे यांनी ग्रामीण शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्ये केले आहे. त्यांनी केलेल्या कार्यासाठी स्वयंसेवी संस्थाची मदत व सहकार्याने शाश्वत विकास साधलेले आहे.

# १.२ विषय-विवेचन

## १.२.१ स्वयंसेवी संस्थांची संकल्पना

"स्वयंसेवी संस्था" हा शब्द पहिल्यांदा १९४५ मध्ये नव्याने स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या कलम ७१ मध्ये करण्यात आला होता. एन.जी.ओ. काय आहेत याची कोणतीही निश्चित किंवा औपचारिक व्याख्या नसली तरी, त्यांना सामान्यत: ना नफा संस्थां परिभाषित केले जाते. जे सरकारी प्रभावापासून स्वतंत्र असतात. त्या संस्था सरकारी निधी मिळू शकतात. युएन ऑफ ग्लोबल कम्युनिकेशन्सच्या मते एन.जी.ओ हा नफ्यासाठी नसलेला स्वंयसेवी नागरिकांचा गट आहे, जो सार्वजनिक हिताच्या समर्थनार्थ समस्या सोडवण्यासाठी स्थानिक, राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित केला जातो. एन.जी.ओ. हा शब्द विसंगतपणे वापरला जातो आणि काही वेळा नागरी समाज संस्था (सीए) साठी समानार्थीपणे वापरला जातो. जी नागरिकांनी स्थापन केलेली कोणतीही संघटना देशामध्ये, स्वयंसेवी संस्थांना ना नफा संस्था ओळखले जाते.

१९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर स्वयंसेवी संस्था हा शब्द लोकप्रिय झाला त्याला सनदेच्या १० मधील कलम ७१ यात सदस्य राष्ट्रे नसलेल्या संस्थासाठी सल्लागार स्थिती निर्धारित केली आहे. दि. २७ फेब्रुवारी १९५० रोजी युनायटेड नेशन्स इकोनॉमिक अँड सोशल कौन्सिल [ECOSOC) च्या ठराव 288 ($x$) मध्ये आंतरराष्ट्रीय एनजीओची प्रथम व्याख्या "आंतरराष्ट्रीय कराराद्वारे स्थापित असलेली कोणतीही आंतरराष्ट्रीय संस्था. शाश्वत विकासामध्ये एनजीओ आणि इतर " प्रमुखगट" याची भूमिका अजेंडा २१व्या प्रकरण २७ (५९) मध्ये मान्य करण्यात आलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघाने गैरसरकारी संस्थांना संमेलनात आणि काही सभामध्ये निरीक्षकांचा दर्जा दिला युएनच्या मते (एनजीओ) ही एक खाजगी नफा न कमावणारी संस्था आहे. जी सरकारी नियंत्रणापासून स्वतंत्र आहे.

कल्याणकारी राज्याच्या पुनर्रचनेचा परिणाम म्हणून गैर-सरकारी जागतिकीकरणामुळे स्वयंसेवी संस्थाचे महत्त्व वाढले. आंतरराष्ट्रीय करार आणि संघटना जसे की, जागतिक व्यापार संघटना, भांडवलदारांच्या हितसंबंधावर लक्ष केंद्रित करतात. या प्रवृत्तीचा प्रतिहार करण्यासाठी मानवतावादी समस्या, विकास मदत आणि शाश्वत विकास यावर भर देतात. जागतिक सामाजिक मंच स्वित्झर्लंड मधील दावोस येथे जानेवारी २०२४ येथे संपन्न झालेले जागतिक आर्थिक मंचाचे प्रतिस्पर्धी अधिवेशन हे त्याचे उदाहरण आहे. पोर्टो अलेगे, ब्राझील येथे जानेवारी २००५ मध्ये पाचव्या जागतिक सामाजिक मंचात हजाराहून अधिक स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. रियो दी जानेरो मे १९९२ पृथ्वीशिखर परिषद ज्यामध्ये सुमारे २४०० होते. पर्यावरणविषयक समस्या आणि शाश्वतविकासामध्ये आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थाचे सामर्थ्य प्रदर्शित करणारे पहिले पाऊल होते.

**स्वयंसेवी संस्थेची संकल्पना**

**(अ) स्वयंसेवी संस्थेचे सेवाभावी कार्य :** समाजातील पीडीत शोषित लोकांसाठी अथवा समूहाच्या कल्याणकारी व विकासात्मक कार्यासाठी उदिष्टासाठी लोकांच्या पुढाकाराने व सहकारने काम करणारी संस्था व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होय.

**(ब) स्वयंसेवी संस्थेचे स्वावलंबन** : तळागाळातील लोकांना सहाय्य व मदत करण्यासाठी किंवा स्वावलंबी बनविण्यासाठी नि:स्वार्थी भावनेने काम करणाऱ्या लोकांकडून चालणारी संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होय.

**(क) स्वयंसेवी संस्था ना नफा हेतूने** : सर्वसामान्य वंचित, मागासलेले, समस्याग्रस्त लोकांचे जवळचे प्रश्न हातात घेऊन ते सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या शासकीय किंवा निमशासकीय नफा हेतू नसणाऱ्या म्हणजेच समाजसेवा हा प्रमुख हेतू ठेवून लोकांच्या विकासासाठी कार्य करणारी संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होय.

**(ड) स्वयंसेवी संस्था : शाश्वत विकास :** स्वयंसेवी संस्था ही अशी एक व्यापक संकल्पना आहे की ह्या संस्था व गट शासनाकडून मदत न घेता ग्रामीण, आदिवासी, शहरी भागातील गोरगरीब लोकांच्या कल्याणाचे व विकासाचे काम करतात. यामध्ये युवा संघटना, महिला मंडळ, कामगारांच्या संस्था, कामगार संघटना, धार्मिक संस्था, व्यावसायिक संघटना इत्यादी त्यात समावेश होतो.

**(इ) स्वयंसेवी संस्था : क्रियाशील सहभाग :** स्वयंसेवी संस्था म्हणजे अशी संस्था की, जिचे कार्यकर्ते मोबदला घेता अथवा न घेता सक्रिय सहभाग देतात. स्वयंसेवी संस्थेने राबविलेला प्रत्येक उपक्रम, कार्यक्रम योजना व उद्दिष्ट धोरणाची आखण्यात सर्वांचा क्रियाशील सहभाग घेतला जातो. त्या संस्थेला स्वयंसेवी संस्था असे म्हणतात.

**(ई) स्वयंसेवी संस्था : निपक्षपातीचे धोरण** : स्वयंसेवी संस्था राजकारणापासून तटस्थ असल्या पाहिजेत, स्वयंसेवी संस्था विकासाचे काम करत असताना सर्व पक्षाच्या प्रमुखाचा सहभाग घेण्याची अपेक्षा असते. स्वयंसेवी संस्थेचे कामाची दिशा ही मात्र मानवी मूल्यावर आधारीत असावी. विशिष्ट जात-धर्म यावर आधारित नसावी.

स्वयंसेवी संस्था म्हणजे एक अशासकीय संस्था आहे. सर्वसाधारणपणे सरकारपासून स्वतंत्रपणे असून सामान्यत: ना नफा ना तोटा या तत्त्वाने कार्य करणा-या संस्था आहेत. त्या संस्थेचे मानवतावाद किंवा सामाजिक विज्ञानातील विचार धारा आहे, यात ऐच्छिक लोक समुहाकडून कामाची कार्यवाही व अंमलबजावणी केली जाते, तीला स्वयंसेवी संस्था असे संबोधले जाते.

स्वयंसेवी संस्था म्हणजे लोकांनी एकत्रित येऊन तयार केलेला असा समूह की, जो ऐच्छिकपणे किंवा सरकारी मदतीशिवाय गरजू लोकांना मदत करणे व त्यांच्या गरजा भागविण्यासाठी साधनांची उपलब्ध करते. स्वयंसेवी संस्था या व्यक्तिगत स्वरूपात किंवा व्यक्तीच्या समुहाने यासाठी व्यक्तींच्या किंवा समुदायांच्या विकासासाठी निर्माण होतात. या संस्थांकडून सामाजिक दुर्लक्षित घटकांकडे अधिक लक्ष देण्याविषयी अभिव्यक्ती आहे.

**सारांश -** गावोगावी, शहराशहरातून, गल्लीबोळातून विविध मंडळे, संघटना लोककल्याणाचे कार्य करतात. तसेच काही व्यक्ती आपल्या आवडीप्रमाणे व क्षमतेनुसार काही-ना-काही सामाजिक कार्य करीत असतात. समाजाला उपयुक्त असे विधायक कार्य करण्याच्या हेतूने काही समविचारी मंडळी एकत्र येतात व संघटना बांधतात, संस्था / मंडळ तयार करतात, परंतु पैशासाठी त्यांना लोकांकडून, शासकीय अथवा निमशासकीय संस्थाकडून निधी उभारण्याची आवश्यकता भासते. स्वयंसेवी संस्थाचे कार्य हे मात्र लोकांच्या गरजेनुसार समाजातील समस्येनुसार करावे लागते. त्यात लोकसहभाग, समन्वय व धोरण निश्चिती इत्यादी आवश्यकता आहे.

## १.२.२ स्वयंसेवी संस्थेचे स्वरूप

**प्रस्तावना :** स्थानिक पातळीवर एखादा प्रश्न घेऊन एक स्वयंसेवी गट निर्माण होणे. त्या गटाने जनजागृतीचे व्यापक अभियान म्हणून लोकांच्या समूह उस्फूर्तपणे संघटित होतात. काही मागण्यासाठी अन्यायाच्या प्रतिकारासाठी, जुलमाचा निषेध करण्यासाठी अशा स्वयंसेवी संस्थांचा गट उभे होतात. त्यामुळे स्वयंसेवी संस्थांची स्थितीचा विचार सामाजिक व राजकीय चळवळीशी जोडला गेला आहे. समाजामध्ये स्वयं शासन, अनुशासन तथा शिस्त पाळण्यावर शासनाची कमीत कमी मदत घेऊन विकास करण्यावर स्वयंसेवी गटाचा आणि संस्थांचा भर आहे. राज्यसंस्थेकडून दुर्लक्षित राहिलेल्या किंवा वंचित तथा उपेक्षित राहिलेल्या कामांवर स्वयंसेवी संस्था प्राधान्याने लक्ष केंद्रित करतात. म्हणूनच विविध देशातील राज्यसंस्था व सरकारी असे दोन किंवा अधिक देशांमध्ये परस्पर सहयोगाचे विकास घडवून आणणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटना व वित्तीय संस्था देखील स्वयंसेवी संस्थेचे स्थान व त्यांची आवश्यकता मान्य करीत आहेत .

**स्वयंसेवी संस्थेचे स्वरूप**

(अ) **स्थानिक लोकांचा समूह व वैचारिक बांधिलकी**: स्वयंस्फूर्तीने व ऐच्छिक एकत्र येऊन समविचारी लोकांचा समूह. मानवी समाज विविध विचारांच्या माध्यमातून प्रेरित असतो या मानवी विचारांना योग्य अशी सैन्धान्तिक व तात्विक बैठक असते विविध विचारांचे बांधिलकी स्वीकारून स्वयंसेवी कार्य केले जाते. जागतिक पातळीवर समाजवाद, मार्क्सवाद, गांधीवाद, मिशनरी विचार, हिंदुत्ववाद, आंबेडकरवाद अथवा परिवर्तनवादी विचार व विद्रोही विचार अशा स्वरूपांच्या वैचारिक विचारांचे समाजकार्य जगामध्ये स्वयंसेवी संस्थामार्फत कार्य चालू आहेत. समाजवादी, हिंदुत्ववादी आणि मिशनरी विचारांचे मंडळींनी प्रामुख्याने कार्यात्मक कार्यावर जास्त जोर देतात तसेच मार्क्सवादी आंबेडकरवादी आणि विद्रोही विचारांची मंडळी संघर्ष शिवाय प्रस्थापित व्यवस्थेत परिवर्तन शक्य नाही अशा प्रकारच्या वैचारिक बैठकीचे अधिष्ठान त्यांचे आहे .म्हणून अन्यायाविरुद्ध सातत्याने रस्त्यावर उतरून संघर्ष करीत राहतात आहे

(ब) **स्वयंसेवी संस्थेतील कार्याचे विशिष्ट उद्दिष्टे** : स्वयंसेवी संस्थेचे कार्य विशिष्ट उद्दिष्टाची व्याख्या बनवून सामाजिक हितासाठी काम करतात. सामाजिक धोरणाची निर्मिती करण्यासाठी समाजातील विविध समस्यांची तीव्रता व संवेदनशीलता समजणे गरजेचे आहे यासाठी स्वयंसेवी संस्था या समाजाचा विविध समस्येचे उखखलन करतात आणि त्यांच्यावर कार्य करण्यासाठी त्यांचे कामाचे क्षेत्र हे गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देश असे निश्चित करतात स्वयंसेवी संस्थेचे स्वरूपात सामाजिक कार्याचे उद्दिष्ट, कार्यक्रमाचे प्रकार, कार्यक्रमाचे समन्वय व फलश्रुती इत्यादीचे स्वयंसेवी संस्थेच्या उद्दिष्टात दिशादर्शक मांडले जातात.

(क) **स्वयंसेवी संस्थेचे कार्याचे स्वरूप** : रचनात्मक किंवा शाश्वत कार्यात समाजाच्या प्रश्नांचा शोध घेऊन, त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी, लोकसहभागाच्या माध्यमातून सोडवण्यासाठी प्रयत्न सेवाभावी संस्थेकडून केला जातो. या प्रक्रियेत समस्या प्रधान व्यक्तीच्या समस्येचा अभ्यास करून मानसिकता बदलणे आणि प्रत्यक्ष कार्यक्रमांची अंमलबजावणी व मूल्यमापन करून त्यांच्यातील उणिवा व त्रुटींची बाजूला करण्याची व्यवस्था निर्माण केली जाते. संघर्षात्मक कार्यात अन्यायग्रस्त समाजाला समस्या सोडवण्यासाठी संघर्षमय परिस्थिती प्रतिकार करण्यास सेवाभावी संस्थांकडून प्रबोधनाचे कार्य केले जाते. या विचारात कोणती समस्या संघर्ष केल्याशिवाय सोडविता येत नाही असा कार्यकर्त्यांचा विश्वास आहे.

(ड) **वैज्ञानिक व कायदेशीर दर्जा** : जागतिक पटलावर स्वयंसेवी संस्थेला कामकाज करण्यासाठी संविधानात्मक दर्जा देण्यासाठी सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत मान्यता घेणे अनिवार्य आहे. स्वयंसेवी संस्थेला कायदेशीर मान्यता मिळाल्यानंतर सामाजिक विकासाचे प्रकल्प राबवण्यासाठी अथवा अंमलबजावणीसाठी आर्थिक व प्रशासकीय मदत शासनामार्फत, औद्योगिक क्षेत्र तथा उद्योगपतींमार्फत किंवा दात्यांमार्फत मिळते.

(इ) **स्वयंसेवी संस्थेसाठी निधी** : समाजातील दानशूर व्यक्ती अथवा गटांकडून देणगी स्वरूपात स्वयंसेवी संस्थेला निधी मिळतो. राज्यातील व देशातील काही औद्योगिक संस्थांकडून स्वयंसेवी संस्थांना सामाजिक दायित्वातंर्गत निधी देण्यात येतो. तसेच काही शासकीय योजना व कार्यक्रम यांची अंमलबजावणी करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेला शासनाकडून अनुदान देण्यात येतात. काही संस्था धर्मादाय स्वरूपाचे काम करतात यातून त्यांना केवळ मानसिक समाधान मिळते एवढीच अपेक्षा त्यामध्ये आहे. उदाहरणार्थ अनाथालय, मुलांचे पुनर्वसन, व्याधीग्रस्त अथवा दत्तगट घेणे, गरीबी निर्मूलनासाठी कार्यक्रम, अन्नक्षेत्र चालवणे इत्यादी स्वरूपाची कामे यात समाविष्ट आहेत. काही सेवाभावी संस्था आरोग्याचे काम करत असतात अगदी अल्प खर्चामध्ये रुग्णांना आरोग्याच्या सुविधा रुग्णालयात देतात तसेच वृद्धांसाठी वृद्धाश्रम चालवले जातात.

(ई) **स्वयंसेवी संस्थेचे समन्वयदर्शक तथा सहयोगी दृष्टी** : स्वयंसेवी संस्थेतील सदस्य, लाभार्थी, सरकार व निधी देणाऱ्या संस्था यात नेहमीच सहकार्य व समन्वयदर्शक दृष्टी असावी लागते. समाजातील वाईट प्रवृत्तींचे उद्धाटन करण्यासाठी सामाजिक प्रबोधन करणे गरजेचे आहे. यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत सामाजिक प्रबोधनाचे उपक्रम, संसाधने, माहिती, ज्ञानस्रोत व लाभार्थी यांच्यातील समन्वय साधनांची दृष्टी निर्माण होते.

नवीन योजना व कार्यक्रम राबवण्यासाठी जनजागृतीचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी स्वयंसेवी संस्थेकडे अप्रत्यक्षपणे येऊन पडते. रोजगारविषयक कार्यक्रम व ग्रामीण भागातील स्वयं-साहाय्यता गटाकडून योजना राबवण्यासाठी त्यांनादेखील स्वयंसेवी संस्थेकडून प्रशिक्षण देण्यात येते.

(उ) **स्वयंसेवी संस्थेचे लोककल्याणासाठी शाश्वत विकास** : ग्रामीण, शहरी व आदिवासी क्षेत्रातील महिला, पुरुष व बेरोजगार तरुण यांच्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकास साध्य करण्यासाठी

स्वयंसेवी संस्थेचे एक क्रियाशील प्रयत्न नेहमीच असतो. शासनाचे कार्यक्रम व योजना यात गुणात्मक विकास साध्य करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेचे महत्त्वाचे स्वरूप आहे.

**सारांश :** भारतातील बहुसंख्य सेवाभावी संस्था ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. सेवाभावी संस्थेच्या स्वरूपाला प्रकाश टाकताना स्थानिक लोकांचा समूह व वैचारिक बांधिलकी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यातील उद्दिष्टे, स्वयंसेवी संस्थेचे कार्याचे स्वरूपाचे वैज्ञानिक व कायदेशीर दर्जा , स्वयंसेवी संस्थांसाठी निधी, समन्वय इत्यादी मुद्द्यांच्या आधारावर स्वयंसेवी संस्थेची स्वरूप मानवतावादी, लोककल्याणकारी व संवेदनशील असल्याचे स्पष्ट होते.

## १.२.३ : स्वयंसेवी संस्था : व्याप्ती

**प्रस्तावना :** गैरसरकारी संस्था म्हणजे स्थानिक , राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थापन केलेल्या ना नफा या तत्त्वाने कार्य करणारा स्वयंसेवी गट आहे. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी आणि समाजाच्या विकासासाठी स्वयंसेवी संस्था त्यांच्यानुसार वेगवेगळी कामे करतात. काही सेवाभावी संस्था ह्या सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील कंपन्यांसोबत जोडलेल्या आहेत. या संस्था प्रामुख्याने महिला सक्षमीकरण, बाल लैंगिक समस्या, शिक्षण, प्रदूषण, रस्त्यावरील मुले, वेश्या व्यवसायातील महिला, झोपडपट्टीतील रहिवासी, आरोग्य, शहरी विकास, मानवी अधिकार इत्यादी सामाजिक समस्या हाताळतात. स्वयंसेवी संस्था ह्या लोकांच्या समस्या आणि त्या समस्यांची तीव्रता सरकारकडे मांडतात. शासनाला सामाजिक धोरण निर्माण करण्यासाठी स्वयं-साहाय्य करतात. स्वयंसेवी संस्था ही समविचारी व्यक्तींची एक संस्था आहे जी निश्चित मूलभूत सामाजिक तत्त्वावर विश्वास ठेवतात आणि ते सेवा देत असताना असलेल्या समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांच्या सुविधांसाठी प्रयत्न करतात. स्वयंसेवी संस्था या आर्थिक व सामाजिक दृष्ट्या उपेक्षित गटांच्या सक्षमीकरणासाठी काम करणारी एक स्वतंत्र गैर संप्रदाय लोक संस्था होय. स्वयंसेवी संस्थेची आधुनिक काळातील व्याप्ती खूप वाढली आहे. त्यांचे कामाची व्याप्ती बदललेली आहे. स्वयंसेवी संस्था या उत्पादन निर्मिती, प्रसार माध्यमातील कामकाज, लोकप्रबोधन, लोकशिक्षण, समूह समुपदेशन, सल्लामसलत इत्यादी क्षेत्रात व्यापलेले आहेत.

**स्वयंसेवी संस्थेचे वर्गीकरण**

स्वयंसेवी संस्थेचे अभिमुखता (Orientation) पातळी व ऑपरेशन (operational) दोन पातळीवर वर्गीकरण व्यापलेले आहे.

अभिमुखता पातळी म्हणजे मानवी हक्क, ग्राहक संरक्षण, पर्यावरणवाद, आरोग्य किंवा विकास यांचा समावेश असलेल्या सुविधा व ऑपरेशन पातळी म्हणजे जी संस्था कोणत्याही प्रमाणात कार्य करते ते दर्शवते- स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय.

**अभिमुखता :** यात खालील दर्शविलेल्या पातळीचा समावेश होतो. धर्मदाय स्वरूपात लाभार्थ्यांच्या गरजेनुसार व आवश्यकतेनुसार लाभाच्या योजनेची माहिती देऊन लाभार्थ्यांमध्ये स्थितिज्ञान निर्माण करून पूर्णपणे धर्मदाय स्वरूपात लाभ दिला जातो.

(१) **सेवा** : आरोग्यविषयक सेवा आणि शिक्षण विषयक, कृषी विषयक सेवा सुविधा देणाऱ्या सर्व संस्थांचा यात समावेश होतो.

(२) **सहभागी** : स्वयसेवी संस्था या पैसा, साधने ,साहित्य किंवा श्रम या स्वरूपात स्थानिक सहभागासह स्वयं मदत प्रकल्प राबवणे.

**(३) सशक्तिकरण** : पीडित, वंचित गरीब लोकांना त्यांच्या जीवनावर परिणाम करणारे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटक समजून घेण्यास मदत करणे आणि त्यांच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याच्या त्यांच्या सामर्थ्याची जाणीव वाढवणे. लाभार्थ्यांचा जास्तीतजास्त सहभाग घेऊन स्वयंसेवी संस्थाद्वारे सुव्यवस्थित सुविधा देणे.

**(इ) कृतीची पातळी**

१) **समुदाय आधारित संस्था** (CBOs) : ग्रामीण, शहरी व आदिवासी भागातील लोकांमध्ये सुविधेचा लाभ घेण्यासाठी संवेदनशीलता वाढवणे त्यांना त्यांच्या सेवेवरील अधिकार समजावून सांगण्यासाठी मदत करतात. त्याचबरोबर आवश्यक सेवा सुविधा प्रदान करतात.

२) **व्यापारी संस्था** : चेंबर ऑफ कॉमर्स आणि औद्योगिक क्षेत्रातील व्यवसाय शैक्षणिक गट आणि समुदाय संघटना समाविष्ट होतो.

३) **राज्य स्वयंसेवी संस्था** : राज्यस्तरीय संस्था, संघटना आणि गट यात समावेश होतो काही राज्यसेवा ही स्वयंसेवी संस्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थांना मार्गदर्शन करतात.

४) **राष्ट्रीय सेवाभावी संस्था** : एक स्वयंसेवी संस्था जी फक्त एकाच देशात अस्तित्वात आहे ते दुर्मीळ आहे यामध्ये राष्ट्रीय संस्था जसे की, YMCA's (वायएमसीए) आणि YWCA's (वायडब्ल्यूसीएस), व्यावसायिक संघटना आणि तस्सम गट समाविष्ट आहेत. काहींना राज्य किंवा शहर मध्ये शाखा आहेत आणि स्थानिक स्वयसेवी संस्था मदत करतात.

५) **आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था** (INGO) : सेव द चिल्ड्रन्ससारख्या धर्मनिरपेक्ष एजन्सीपासून ते धार्मिक गटापर्यंत. या संस्थेंकडून स्थानिक स्वयंसेवी संस्था व त्यांचे प्रकल्प यांचा निधी देऊ शकतात आणि प्रकरण राबवू शकतात.

**व्याप्ती** : सर्वसाधारणपणे स्वयंसेवी संस्थांची खालील प्रमाणे व्याप्ती दर्शविली आहे.

१) स्वयंसेवी संस्था म्हणजे स्थानिक राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थापन केलेले ना नफा ना तोटा या तत्त्वाने कार्य करणारा स्वयंसेवी गट आहेत.

२) सामाजिक समस्या सोडवण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वयंसेवी संस्था ह्या विकासात्मक, रचनात्मक व प्रबोधनात्मक कामे करतात.

३) स्वयंसेवी संस्था या सरकारी अथवा खाजगी क्षेत्रातील विविध अस्थापनासोबत जोडलेले असतात.

४) स्वयंसेवी संस्था ह्या महिला सक्षमीकरण, लैंगिक समस्या, लोकशिक्षण, पर्यावरण प्रदूषण, रस्त्यावरील मुले, झोपडपट्टीतील राहणारे समुदाय, आरोग्य विषयक समस्या, शहरी विकास, मानवी हक्क इत्यादी सामाजिक समस्या सोडविण्याचे कार्य करतात आणि लोकांच्या समस्या सरकारकडे मांडतात.

५) खाजगी व्यक्तींचा समूह एकत्रित येऊन एक संस्था बनते त्यामुळे निश्चित मूलभूत सामाजिक तत्त्वावर विश्वास ठेवतात आणि समुदायाचा विकास घडवून आणण्यासाठी रचनात्मक सेवा देतात.

६) सामाजिक व आर्थिक दृष्ट्या उपेक्षित गटांच्या सक्षमीकरणासाठी काम करणारी एक स्वतंत्र लोकशाही, गैर सांप्रदायिक लोक संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होय.

**सारांश :** 'स्वयंसेवी संस्था' ह्या मुख्यत्वे सामाजिक समस्या सोडवण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करतात. स्वयंसेवी संस्था ह्या विकासात्मक, रचनात्मक व प्रबोधनात्मक कामे करतात.

## १.२.४ : स्वयंसेवी संस्थेतील कार्याचे महत्त्व

समाजाच्या विकासात सरकारला मदत करण्यासाठी स्वयंसेवी संस्थाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. स्वयंसेवी संस्था ह्या सहसा सामाजिक कारणासाठी किंवा अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी वेळ, श्रम व संसाधने वापर करतात स्वयंसेवी संस्था याद्वारे समाजातील शाश्वत विकासासाठी सुविधा अथवा सेवा देण्याचे कार्य करण्यात येते . त्यामुळे सर्व दृष्टीकोनातून समाजाची प्रगती होण्यास मदत मिळते.

**स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे महत्त्व**

अ) **दारिद्य निर्मूलन**: भारत सरकारकडे असलेल्या अपुऱ्या निधी कारणांमुळे साधनाचा अभाव किंवा भ्रष्टाचार प्रवृत्तीच्या कारणामुळे सरकारने गरिबीच्या छायेत अडकलेल्या सर्व लोकांना त्यांना आवश्यक असलेल्या फायदे देऊ शकत नाही. स्वयंसेवी संस्था या अनेकदा दारिद्य निर्मूलनासाठी योगदान देतात. त्या संस्था गरजू लोकांना त्यांच्या गरजेनुसार दर्जेदार शिक्षण, शुद्ध पिण्याचे पाणी, घरे,स्वच्छता आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. स्वयंसेवी संस्थामार्फत लोकांना समाज कल्याणाची मदत करतात आणि त्यांच्यातील आत्मनिर्भरता आणि क्षमता निर्माण करण्याची इच्छाशक्ती रुजवण्याचा प्रयत्न करतात स्वयंसेवी संस्था देखील लोकांना विविध फायदेशीर सरकारी योजना आणि विकास प्रकल्पाची जाणीव करून देतात. लोकांमध्ये फारसी जागृती व माहितीचा अभाव असेल तर ते दूर करतात.

ब) **शिक्षणाच्या प्रचारातील स्वयंसेवी संस्थेचे महत्त्व** : शिक्षण हे सर्वात शक्तिशाली साधन आहे जे एखाद्या व्यक्तीला आणि त्याच्या भावी पिढीच्या गरिबीचे बंधन तोडण्यासाठी सक्षम ठरू शकते स्वयंसेवी संस्था या कौशल्य विकासावर कार्यशाळेच्या आयोजन करतात. स्वयंसेवी संस्थामार्फत होतकरू गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देखील देण्यात येतात. मुला-मुलींसाठी कोचिंग क्लासदेखील देण्यात येत आहे.

क) **पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण** : वाढते शहरीकरण, लोकसंख्या वाढ, विकास आणि मर्यादित नैसर्गिक संसाधने यांसारख्या पर्यावरणावर परिणाम झाला आहे. पर्यावरण स्वयंसेवी संस्था ह्या पर्यावरण विषयांमधील पर्यावरण ऱ्हास आणि दीर्घकाळ टिकणारे परिणामाबद्दल जनतेला शिक्षित करण्याचा प्रयत्न करतात. तसेच पर्यावरणातील योजना राबविण्यासाठी शासनाला योग्य सल्ला देणे व सरकारी प्रकल्पांमुळे होणारे पर्यावरणाची हानी थांबवण्यासाठी कायदेशीर मार्गाने सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम सेवाभावी संस्थेमार्फत केले जाते.

ड) **मानवी हक्क** : स्वयंसेवी संस्था ह्यांच्याकडून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, स्थानिक पातळीवरील मानवी अन्याय व अत्याचार याच्यावर प्रतिबंधात्मक उपाय करता येतात. मानवावरील मानवी हक्काचे हनन होत असल्यास त्यावर प्रकाश टाकून अन्यायग्रस्त व्यक्तींना मदत करून त्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी स्वयंसेवी संस्था या संरक्षण यंत्रणा म्हणून कार्य करतात. स्वयंसेवी संस्था ह्या समस्याग्रस्त अथवा पीडितांची माहिती गोळा करतात व मानवी हक्क आयोगाकडे उपाययोजनासाठी माहिती पाठवणे.

इ) **स्त्रियांचे अधिकार** : महिला सक्षमीकरणाचे नितांत गरज आहे. शाश्वत विकास सुलभ करण्यासाठी आणि महिलांच्या आर्थिक सामाजिक आणि राजकीय स्थिती सुधारण्यासाठी महिलांच्या सक्षमीकरण करणे आवश्यक आहे बहुतेक स्वयंसेवी संस्थामार्फत महिलांसाठी कौशल्य विकास आणि प्रशिक्षण उपक्रम राबवण्यात येतात. महिलांना त्यांच्या कायदेशीर मालमत्ता हक्कांबद्दल जागृत करतात एवढेच नव्हे तर महिलांना कौटुंबिक हिंसाचार आणि सामाजिक दुष्कृत्यापासून संरक्षण देण्याचे जबाबदारी स्वयंसेवी संस्थाद्वारे केली जाते. भारतातील व महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांनी समस्याग्रस्त महिलांच्या जीवनात बदल घडवून आणला आहे त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्व घडवण्यासाठी महत्त्वपूर्ण समाजसेवेचे कार्य केलेले दिसून येते.

ई) **आरोग्य सेवा** : वृद्ध, महिला, बालके व अपंग यांच्यासाठी आरोग्य विषयक शिबिरांच्या आयोजन स्वयंसेवी संस्थांद्वारे करण्यात येते. एड्सग्रस्त, एचआयव्हीग्रस्त व व्यसनाधीन व्यक्तींना आरोग्यविषयक सुविधा पुरविणे, असुरक्षित लोकांना निरोगी आणि फलदायी जीवन जगता यावे यासाठी याविषयी या संस्था ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात जाऊन समाजोपयोगी कार्य करतात.

## १.२.५ स्वयंसेवी संस्थेचे महत्त्व

अ) **संशोधनासाठी चालना देणे** : सामाजिक समस्येचे कार्यकारण जाणून घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व स्थानिक यास्तरावर संशोधनाचे कार्य हाती घेतलेले जाते. ग्रामीण, शहरी व आदिवासी भागातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रातील दर्जा समजावून घेण्यासाठी माहिती गोळा करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेमार्फत संशोधन अभ्यास केला जातो. उपलब्ध माहितीच्या आधारावर सरकारला व स्वयंसेवी संस्थेला कार्यक्षेत्रात काम करण्यासाठी अधिक सोयीचे होते.

ब) **स्वयं-साहाय्यता गटाची निर्मिती** : ग्रामीण, शहरी व आदिवासी भागातील अल्प उत्पन्न गटातील आर्थिक दुर्बल घटकातील आर्थिक विकास साध्य करण्यासाठी स्वयंसाहाय्यता गटाची निर्मिती करणे सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी महिलांचे लहान गट निर्माण करणे व त्याद्वारे त्यांच्यातील बचतीची सवय वाढवणे इत्यादी कार्य स्वयंसेवी संस्थेमार्फत केले जात आहे.

क) **सामाजिक अनिष्ठ प्रथा बदलणे** : समाजातील अनिष्ट प्रथा व चालीरीती रिवाजमध्ये देखील बदल घडवून आणण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. जातिभेद स्त्री-पुरुषांमधील विषमता यामध्ये स्वयंसेवी संस्थेमार्फत योग्य जनजागृती केली जाते.

ड) **कायद्याचा विकास** : स्वयंसेवी संस्थांनी भारतातील कायद्यांच्या निर्मितीवर प्रभाव टाकला आहे. त्यांच्या सातत्य प्रयत्नामुळे माहितीचा अधिकार, मानवी तस्करी, जंगलाचे संवर्धन, अपंगाचे कल्याण, प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन, शाळांमधील शारीरिक शिक्षा संपवणे इत्यादी अनेक समस्यांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. स्वयंसेवी संस्थांनी याबद्दल वेळोवेळी काळजी घेतली आहे.

इ) **मूलभूत मानवी गरजा पूर्ण झाल्याची खात्री करणे** : वंचित व पीडित समुदायातील मानवाला पर्यावरणात जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून उपक्रम राबवण्यात येतात गरजू लोकांना नाममात्र / मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ देण्यात येतो आणि लोकांना आरोग्य कार्यक्रमाबदल शिक्षित करतात.

ई) **आपतकालीन परिस्थितीत संकटग्रस्त लोकांना मदत करणे** : भूकंपग्रस्त, धरणग्रस्त, पूरग्रस्त लोकांसाठी तातडीने उपाययोजना समुपदेशन, मूलभूत सुविधा पुरवणे, संकटातून बाहेर काढून पुनर्वसनात्मक योजना व कार्यक्रमाचे अंमलबजावणी करणे, तातडीने मदत म्हणून त्यांना अन्न वैद्यकीय मदत आणि निवाराची सुविधा ही स्वयंसेवी संस्थामार्फत देण्यात येतात अपघातग्रस्त ठिकाणाहून बाहेर काढून सुरक्षित तात्पुरता स्वरूपात निवाऱ्याची व्यवस्था करणे.वैद्यकीय उपचार केले जातात.

उ) स्वयंसेवी संस्थांच्या योगदानामुळे सरकारी कामगिरी सुधारते. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारवर वेळोवेळी दबाव आणून समस्याग्रस्त लोकांना, समुदायाला मदत करण्यासाठी भाग पाडले जाते. सरकारचे काम योग्य दिशेने जाण्यासाठी स्वयंसेवी संस्थेकडून सरकारी कामावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात येते, तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत समस्येचे निराकरण करण्यासाठी शास्त्रयुक्त पद्धतीने वास्तविक माहिती गोळा केली

जाते. तसेच उपलब्ध समस्यांना उपायोजनासाठी त्या उपलब्ध माहितीच्या आधारे उपचारात्मक योजना मांडल्या जातात.

ऊ) **शाश्वत विकास** : नैसर्गिक साधनांचे शोषण होणार नाही याची खात्री करण्यासाठी स्वयंसेवी संस्था कार्य करतात आणि परिसंस्थेचे रक्षण करण्यासाठी देखील विविध कार्य करतात.

**स्वयं-अध्यनासाठी प्रश्न**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. स्वयंसेवी संस्था म्हणजे काय?

२. स्वयंसेवी संस्थेच्या स्वरूपातील स्थानिक संघटन म्हणजे काय?

३. स्वयंसेवी संस्था ह्या कोणकोणत्या मानवी अधिकारावर व्यापलेल्या आहेत?

४. स्वयंसेवी संस्थेचे महत्व म्हणजे सांगा.

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**१.** **स्वयंसेवी संस्था** : स्वयंसेवी संस्था म्हणजे लोकांच्या विकासासाठी लोकांनी चालवलेली संस्था होय.

**२.** **स्वयंसेवी संस्था ना नफा हेतूने** : शोषित, अन्यायग्रस्त पीडित व्यक्तीं यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता लोकांना सेवा सुविधा देण्याच्या हेतूने स्थापन झालेली संस्था.

**३.** **देणगी** : दानशूर व्यक्तींकडून वस्तू अथवा पैसे स्वरूपात जे स्वयंसेवी संस्थेला प्राप्त होते देणगी असे म्हणतात.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. लोकांच्या विकासासाठी व कल्याणासाठी स्थापन केलेली स्वयंसेवी संस्था होय.

२. स्वयंसेवी संस्थेचे स्वरूप हे स्थानिक पातळीवर एखादा प्रश्न घेऊन एक स्वयंसेवी गट निर्माण करणे त्या गटाने जनजागृतीचे व्यापक अभियान म्हणून लोकांच्या समूह उत्स्फूर्तपणे संघटित होतात

३. स्वयंसेवी संस्थेची आधुनिक काळातील व्याप्ती खूप बदल झालेली आहे स्वयंसेवी संस्था या उत्पादन निर्मिती, प्रसार माध्यमातील कामकाज, लोक प्रबोधन, लोक शिक्षण, समूह समुपदेशन, सल्लामसलत इत्यादी मानवी अधिकारावर व्यापलेले आहेत.

४. समाजातील संशोधन कार्याला चालना देणे कायद्यांचा विकास करणे आपतकालीन परिस्थितीमध्ये मदत करणे इत्यादी क्षेत्रात स्वयंसेवी संस्थेचे महत्त्व आहे.

## १.५ सारांश

भारतातील स्वयंसेवी संस्थेचे महत्त्व बहुआयामी आहे. विविध कारणामुळे सरकार भरू शकत नसलेली पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न स्वयंसेवी संस्थांकडून केलेली कामगिरी जात आहे. स्वयंसेवी संस्था ह्या लोकांच्या समस्या सरकार समोर मांडतात, त्यांना मार्गही सांगतात. आणि समाजामध्ये सामाजिक विकासाचे प्रकल्प दर्जा

सुधारण्यासाठी कामदेखील स्वयंसेवी संस्था करतात. सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रातील दर्जा समजावून घेण्यासाठी, माहिती गोळा करण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत संशोधन अभ्यास केला जातो. उपलब्ध माहितीच्या आधारावर सरकारला व स्वयंसेवी संस्थेला कार्यक्षेत्रात काम करण्यासाठी सोयीचे होते.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१. स्वयंसेवी संस्थेची संकल्पना विशद करा.

२. स्वयंसेवी संस्थेचे स्वरूपाचे महत्व विशद करा.

३. स्वयंसेवी संस्थेच्या व्याप्ती यावर टीप लिहा.

४. स्वयंसेवी संस्थेचे महत्व लिहा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) तिजोरे बाबा वि. (१९८३), *सामुदायिक विकास आणि विस्तार*, छत्रपती संभाजीनगर, शिक्षण प्रकाशन महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी विद्या बुक्स.

२) म्हात्रे रमेश, (२०१७), *ग्रामीण विकासासाठी समाजकार्य*, मुंबई विद्यापीठ दूरशिक्षण विभाग

३) Faruk Shaikh, (2018), *Social work Practi*ce, New Delhi, R.P. Publication.

# घटक २ : स्वयंसेवी संस्था : संरचना, वैशिष्ट्ये व प्रकार

*अनुक्रमणिका*

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय-विवेचन

२.२.१ स्वयंसेवी संस्थेचे संस्थात्मक संरचना व जबाबदाऱ्या

२.२.२ स्वयंसेवी संस्थेची संस्थात्मक रचना

२.२.३ सेवाभावी संस्थेचे वैशिष्ट्ये

२.२.४ स्वयंसेवी संस्थेचे प्रकार

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

१) स्वयंसेवी संस्थेतील संरचनाची कार्यप्रणाली स्पष्ट करता येईल.

२) सेवाभावी संस्थेच्या वैशिष्ट्यांचे वर्गीकरण समजेल.

३) सेवाभावी संस्थांच्या विविध प्रकारांची माहिती कळेल.

४) स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक विकास कसा होतो याचा सविस्तर अभ्यास करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

स्वयंसेवी संस्थेत सामाजिक, शैक्षणिक व मानसिक विचाराने एकत्रित आलेल्या व्यक्तींचा / समूहाचा समावेश असतो. विशिष्ट ध्येयपूर्ती व उद्देश पूर्तीसाठी एकत्र येऊन स्वयंसेवी संस्थेची रचना करण्यात येते. स्वयंसेवी संस्थेतील संचालक मंडळास विश्वस्त, सदस्य, पदाधिकारी या नावाने संबोधले जाते. या संस्थेतील संचालक मंडळ मार्फत स्वयंसेवी संस्थेच्या कारभाराचे संचालन केले जाते. स्वयंसेवी संस्थांचे सामाजिक धोरण निर्धारण आणि निर्णय घेणारी संस्था म्हणून काम करण्याचा त्यांना अधिकार दिला जातो. या संस्थेत ७, ९, ११ व १३ असे विषम संख्या असलेले सभासद असतात आणि ते पदसिद्ध सदस्य असतात या संस्थेत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष व

इतर सदस्य एकत्रित येऊन स्वयंसेवी संस्थांचे गठण केले जाते. स्वयंसेवी संस्थेसाठी वैज्ञानिक स्वरूप प्राप्त करण्यासाठी ट्रस्ट ॲक्ट आणि सोसायटी अंतर्गत नोंदणी करणे अनिवार्य आहे.

जगभरातील सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांची ध्येय प्रभावीपणे साध्य करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेला सुपरिभाषित संस्थात्मक संरचना आवश्यक आहे. ज्यामुळे कार्यक्षम कार्य सुलभ होते. कार्यक्रम आणि उपक्रमांचे प्रभावीपणे वितरण सुनिश्चित होते.

## २.२ विषय-विवेचन

### २.२.१ स्वयंसेवी संस्थेची संस्थात्मक संरचना

स्वयंसेवी संस्थेतील संघटनात्मक रचना ही भूमिका जबाबदाऱ्या आणि संस्थेतील संबंधांचे अहवाल देणारी फ्रेमवर्क (आकृतिबंध) आहे संस्थेचे आकार, स्वरूप, उद्दिष्टावर संस्थेचे संरचना बदलू शकते.

**स्वयंसेवी संस्थेची संघटनात्मक संरचनेचे महत्व** : स्वयंसेवी संस्थांना त्यांचा प्रभाव वाढवण्यासाठी आणि त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रभावी संघटनात्मक रचना आवश्यक आहे. सुव्यवस्थेतपणे संप्रेषण, कार्यक्षम कार्यप्रवाह आणि सुविधेची प्रभावी समन्वय सक्षम होण्यासाठी स्वयंसेवी संस्थेचे संरचना मदत करते. एक विधीमान्य रचना सुनिश्चित करते की, भूमिका आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे नियुक्त केले आहेत. जबाबदारीला प्रोत्साहन देणे आणि संस्थेच्या उद्दिष्टांच्या दिशेने वाटचाल करणे सुलभ करते.

**स्वयंसेवी संस्थेचे संरचना** : स्वयंसेवी संस्थांमध्ये खालीलप्रमाणे दर्शवलेल्या वर्गीकरणानुसार तक्ता

अ) बोर्ड ऑफ डायरेक्टर (Board of Director)

ब) एक्झिक्यूटिव्ह टीम (Executive Team)

क) प्रोग्राम/प्रोजेक्ट (Program/project)

ड) सपोर्ट सर्विस (Support service)

इ) समन्वयक स्वयंसेवक (Volunteer/co-ordination)

खालील प्रमाणे सविस्तर माहिती मांडलेली आहे.

अ) **संचालक मंडळ** : संस्थेचे धोरणात्मक दिशा ठरवण्यासाठी व संस्थेतील सर्व आर्थिक व्यवहाराचे व्यवस्थापन व देखरेख करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेच्या घटनेनुसार कार्याची दिशा व उद्दिष्टानुसार कामकाज करण्याची जबाबदारी संचालक मंडळावर असते. सेवाभावी संस्थेमध्ये संचालक मंडळ संस्थेच्या निर्णय प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक असतो.

ब) **कार्यकारी मंडळ** : स्वयंसेवी संस्थेचे कामकाज आणि प्रशासकीय कामकाज सुरळीत चालवण्यासाठी कार्यकारी मंडळाची महत्त्वपूर्ण भूमिका व जबाबदारी असते. स्वयंसेवी संस्थेला आवश्यक लागणाऱ्या संसाधनाची जुळवाजुळव व प्रकल्पाचे अंमलबजावणीची कार्यप्रणाली व दृष्टिकोनाची दिशा निश्चित करण्यासाठी कार्यकारी मंडळाची जबाबदारी आहे. तसेच कार्यकारी मंडळातील सदस्यांकडून स्वयंसेवी संस्थेचे धोरणात्मक मार्गदर्शन, स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, प्रस्ताव तयार करणे तसेच अनुदान, निधी, देणगी मिळवण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी कामे त्यांना करावी लागतात. तसेच संचालक मंडळ हे धोरणात्मक योजना राबवण्यासाठी दैनंदिन कामकाजाची व्यवस्थापन करण्यासाठी आणि संस्थेचे नेतृत्व प्रदान करण्यासाठी जबाबदारी कार्यकारी मंडळावर असते.

क) **कार्यक्रम / प्रकल्प** : (कार्यक्रम / प्रकल्प विभाग) विशिष्ट कार्यक्रम आणि प्रकल्पाचे डिझाईन अंमलबजावणी आणि मूल्यमापनासाठी कार्यक्रम / प्रकल्प विभागाकडे जबाबदारी देण्यात येते. ते निधी संकलित करण्यासाठी भागीदार निर्माण करतात तथा शासनाकडून कार्यक्रम राबविण्यासाठी, अनुदान प्राप्तीसाठी प्रयत्न करतात. शकतात.

ड) **साहाय्य सेवा विभाग** : साहाय्य सेवा विभागात प्रशासकीय आणि कृतिशील कार्यक्रमाची जबाबदारी असते ज्यात वित्त, मानव संसाधन व प्रकल्पाचे प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा प्रदान करतात तसे प्रकल्प यशस्वी करण्यासाठी सहाय्य सेवा उपलब्ध करण्यासाठी मार्ग निश्चित करतात.

इ) **समन्वयक आणि जनसंपर्क अधिकारी** : एक अनुभवी विकास कार्यकर्ता स्वयंइच्छेने स्वयंसेवी संस्थेचे समन्वयक म्हणून काम करतो. बहुदा समन्वयकाची नियुक्ती मानधनावर अगर पगारी व्यक्ती म्हणूनदेखील करण्यात येते. काही सेवाभावी संस्थामध्ये स्वयंसेवकाच्या प्रयत्नांचे समन्वय साधण्यासाठी आणि ते संस्थेच्या सुविधेमध्ये प्रभावीपणे समायोजित करतात. समन्वयक समर्पित भावनेने कार्य करणारा असेल तर त्या संस्थेची प्रगती जलद गतीने होते.

## २.२.२ स्वयंसेवी संस्थेची संस्थात्मक रचना व जबाबदाऱ्या

स्वयंसेवी संस्थेचे संस्थात्मक रचना त्यांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्य काय आहेत हेदेखील समजून घेणे गरजेचे आहे. त्यांची माहिती खालीलप्रमाणे विशद केलेली आहे.

१) संस्थेचे शीर्षस्थानी स्वयंसेवी संस्थेचे संचालक मंडळ असते. स्थानिक प्राधिकरणांसाठी अधिकृतपणे नोंदणीसाठी स्वयंसेवी संस्थेचे मंडळ हे बहुतेक देशांमध्ये त्यांना कायदेशीर मान्यता घेण्याची आवश्यकता आहे. अनेक स्वयंसेवी संस्थांच्या मंडळाचे सदस्यत्व ऐच्छिक आणि मोबदला न घेणारे असतात. पारदर्शकतेच्या हेतूने अहवाल तयार करणे तसेच सार्वजनिक पटलावर संस्थेचे अहवाल प्रसिद्ध करणे व संचालक मंडळाच्या सभेत त्या अहवालांना मान्यता देणे.

तसेच स्वयंसेवी संस्थेच्या प्रकारानुसार मंडळे अनेक कामांसाठी जबाबदारी स्वीकार करीत असतात. उदाहरणार्थ - कार्यकारी संचालक नियुक्त करणे आणि त्यांचे परिवेक्षण करणे, अंदाजपत्रक विकसित करणे आणि मंजूर करणे इत्यादी मंडळाच्या सदस्यांची जबाबदारी त्यांनी स्वीकारलेली आहे.

२) स्वयंसेवी संस्थेचे कार्यकारी संचालक यांना मुख्य समन्वयक अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी या नावाने संबोधले जाते. स्वयंसेवी संस्था कोणत्या ह्या दिशेने वाटचाल करीत आहे आणि स्वयंसेवी संस्थेच्या दैनंदिन सुविधांमध्ये व कार्यक्रमांमध्ये व्यवस्थापन करण्याची जबाबदारी कार्यकारी संचालकाची राहते. कार्यकारी संचालक देखील मंडळाचा सदस्य असून त्याची कार्यकारी सचिव म्हणून नियुक्ती करण्यात येते.

३) संचालक मंडळ आणि कार्यकारी संचालक यांना सल्लागाराची मदत मिळू शकते. या सल्लागाराची नियुक्ती ऐच्छिक असते, परंतु स्वयंसेवी संस्थाची चांगली प्रतिमा निर्माण करण्यासाठी व नावलौकिक वाढवण्यासाठी विशेषतज्ज्ञ सल्लागार नियुक्ती केली जाते.

४) स्वयंसेवी संस्थेला सर्वसाधारण सभेचे आयोजन करावे लागते. महासभा ही सर्व सदस्यांचा प्रमुख गट असतो. त्यात स्वयंसेवी संस्थेचे / मंडळाचे सर्व सदस्यांचा, सभासदांचा कार्यकारी मंडळातील सदस्यांचा समावेश असतो. महासभा वार्षिक किंवा द्वैवार्षिक बैठक आयोजित केली जाते.

स्वयंसेवी संस्थेचे दैनंदिन निर्णय, सेवा-सुविधा आणि व्यवस्थापनाची काळजी इत्यादी बाबींवर कार्यकारी संचालक आणि कार्यकारी सदस्य जबाबदारी घेत असतात. स्वयंसेवी संस्थेचा सर्वांगीण विकास आणि

प्रगतीसाठी मार्गदर्शन आणि सल्ला देणारी सर्वोच्च संस्था म्हणजे महासभा. कायद्यानुसार सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात येते. स्वयंसेवी संस्थेचे चांगले व पारदर्शक प्रतिमा तयार करण्यासाठी निधी किंवा अनुदान मिळण्यासाठी सर्वसाधारण सभेची फार मदत होते.

५) **कर्मचारी सदस्य** : सेवाभावी संस्थेचे कर्मचारी दैनिक कामासाठी आणि त्यांचा कार्यक्रम व योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी कर्मचाऱ्यांवर सोपविली जाते. कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाच्या अहवालाचे सादरीकरण कार्यकारी मंडळाकडे करतात.

स्वयंसेवी संस्थेचे कर्मचारी तीन गटांमध्ये मोडतात.

१) प्रशासन

२) प्रसिद्धी

३) योजना कार्यक्रमाशी संबंधित

६) प्रशासकीय कामकाजाचे नेतृत्व प्रशासकीय संचालकाकडे देण्यात येते. शासकीय स्तरावर प्रशासकीय संचालकाच्या अधिपत्याखाली वित्त कर्मचारी व अनेक शाखेचे विभागाचे कर्मचारी असू शकतात. स्वयंसेवी संस्थेच्या आर्थिक व्यवस्थापना व्यतिरिक्त एनजीओसाठी निधी उभारण्यासाठी देखील जबाबदार असू शकतात. याचा अर्थ असा की, संचालकाला संप्रेषण आणि प्रसारासाठी जबाबदार असलेल्या कर्मचारी व सदस्यांसह तसेच कार्यक्रम / प्रकल्पाची जबाबदारी असलेल्या सोबत कार्य करावे लागते.

अ) संप्रेषण आणि प्रसार सेवा सुविधा ही प्रशासकीय संचालक स्तरावरील कर्मचाऱ्यांची जबाबदारी मानली जाते. प्रशासकीय संचालकाना सार्वजनिक सहसंबंध निर्माण करण्यासाठी कर्मचारी, प्रकाशक सहाय्यक किंवा वेब पब्लिक सोशल मीडिया कर्मचारी यांच्यातील सुसंवाद निर्माण करणे व प्रभावी संप्रेषण निर्माण करण्याची मदत करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्थेतील प्रत्येक विभागातील शाखेमधील संवाद प्रवाह सुरक्षित असावा लागतो. संस्थेतील प्रत्येक विभागातील नेटवर्क व सामाजिक व्यवहारातील रचना मानवी मूल्यावर आधारित असतात, त्यामुळे संस्थेच्या कामकाजांमध्ये हुकूमशाही वृत्ती साठी फारसा वाव नसतो.

ब) स्वयंसेवी संस्थेचे कार्यक्रम आणि प्रकल्प सेवा सुविधांचे कामकाज हे प्रशासकीय संचालकांच्या नेतृत्वाखाली केले जातात हा अर्थातच सेवाभावी संस्थेच्या संरचनात्मक गाभा आहे. एका कार्यक्रमासाठी अनेक प्रकल्प मदतनीस, प्रशिक्षण मदतनीस आणि इतर अनेक सहाय्यकांकडून मदत घेतली जाते. स्वयंसेवी संस्थेत प्रकल्पाच्या संख्येनुसार, आवश्यकतेनुसार, अंमलबजावणीनुसार, कालावधीनुसार, आकारमानानुसार, कर्मचारी कामासाठी लावण्यात येतात. त्यावरील नियंत्रण आणि संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी प्रकल्प प्रमुखाकडे असते. प्रकल्प अंमलबजावणीनुसार अल्प, मध्यम, दीर्घ स्वरूपात बाह्य सल्लागारांची प्रकल्पासाठी मदत घेण्यात येते. सर्व कर्मचारी सदस्यांचे तपशील त्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या आणि एकूणच एनजीओची संरचना यांचा स्वयंसेवी संस्थेच्या नियमावली स्पष्ट उल्लेख करून ठेवला जातो. संचालक मंडळाच्या आणि सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने जोडले जाऊ शकतात किंवा बदलले जाऊ शकतात. कार्यक्रम आणि प्रकल्प कसे आहेत याचे नवीन सुरू केले आहेत त्यावर अवलंबून संस्थात्मक संरचना कालांतराने बदलत बदलू शकते.

## २.२.३ स्वयंसेवी संस्थेची वैशिष्ट्ये

१) **निस्वार्थी व ना नफा या वृत्तीने एकत्रित येऊन कार्याची दिशा** : बहुसंख्य सेवाभावी संस्थेची नेतृत्व आर्थिक प्रगत व प्रस्थापित लोकांचे आहे. काही संस्थांचे नेतृत्वाची दिशा ही मात्र परिवर्तनवादी आहे. आर्थिकदृष्ट्या प्रगत स्वयंसेवी संस्थांचे प्रामुख्याने शिक्षण प्रसार, अपंग संगोपन, धर्मदाय स्वरूपाचे निस्वार्थी वृत्तीने कार्य करतात. अशा प्रकारच्या संस्थेच्या बऱ्याच वेळा शासकीय अनुदानदेखील घेतात किंवा परकीय मदतीवरही त्या चालवतात अशा प्रकारच्या संस्थांकडून समाज प्रबोधन किंवा परिवर्तनाच्या अपेक्षा बाळगता येत नाही. काही सेवाभावी संस्था या परिवर्तनवादी प्रक्रियेशी अथवा ध्येय कार्यावर आधारित संघटना आहेत त्यात प्रामुख्याने जन आंदोलनावर, लोकशिक्षणावर किंवा जनजागृतीवर भर देण्यात येतो. समाज प्रबोधन आणि समाज परिवर्तन हे त्यांचे प्रमुख ध्येय आहे. यात स्वयंसेवी संस्था चे निव्वळ निस्वार्थी हेतू व दृष्टिकोन असतो.

२) **मर्यादित कार्यक्षेत्र** : वंचित, उपेक्षित, पीडित व शोषित समाजात जाऊन काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आहेत. भारतातील स्वयंसेवी संस्था या प्रामुख्याने मर्यादित समस्याग्रस्त क्षेत्रावर काम करतात. समाजातील एखाद्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून, समाजात स्वयंसेवी संस्था या समाज कार्य करतात. तसेच संस्थेच्या जवळील उपलब्ध साधनसामग्री आधारित कार्यप्रणाली निश्चित झालेली असते. स्वयंसेवी संस्था या एखाद्या वस्तीत अथवा गावात वाडी / तांड्यावर जावून शासकीय दृष्टिकोनातून तेथील समस्यांवर रचनात्मक प्रबोधनात्मक व कार्यात्मक कार्य करीत असतात. यास्तव स्वयंसेवी संस्थेचे मर्यादित कार्यक्षेत्र असल्याने नियंत्रण व संनियंत्रण प्रस्थापित करण्यात त्यांना सहज शक्य होते.

३) **नेतृत्व** : व्यावसायिक समाजकार्याचे तज्ज्ञ समूहातील सदस्यमार्फत बहुदा स्वयंसेवी संस्थेचे बांधणी केली जाते. किंवा स्वयंसेवी संस्थेचे नेतृत्व बहुतांशी बाहेरचे असल्याचे दिसून येते. स्थानिक नेतृत्वापेक्षा बाहेरील भागातून आलेल्या नेतृत्वाजवळ अधिक अनुभवक्षमता वकौश्यल असतात. प्रतिकूल परिस्थिती लढतांना स्वयंसेवी संस्थाला त्यांच्या कौशल्य व अनुभवाचा फायदा होतो. बाहेरील नेतृत्व हे समस्याग्रस्त भागांतील लोकांसाठी शासन व प्रस्थापित यांच्याशी संघर्ष करण्यासाठी बाहेरील नेतृत्व झुकत नाही. यास्तव त्यांच्यातील गुण व कौशल्याच्या जनमानसात फार प्रभाव पडतो. संस्थेचे निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे बहुतांशी प्रमुख कार्यकर्ते बाहेरून आलेले असले तरी त्यानेतृत्वामार्फत स्थानिक पातळीवर नेतृत्व तयार करण्याची अप्रत्यक्ष तयारी सुरू असते. स्थानिक लोकांचे निर्णय प्रक्रियेत व कार्य प्रक्रियेत त्यांच्या क्रियाशील सहभाग घेणे व त्यांना कर्तव्य बजावण्यासाठी जबाबदारी देणे त्यातून स्थानिक पातळीवरील लोकांशी जवळकी प्रस्थापित करून त्यांच्यातील नेतृत्व विकासासाठी चालना देण्यात येते. महाराष्ट्रातील, विदर्भातील व उत्तर महाराष्ट्रातील, कोकणातील स्वयंसेवी संस्था यांच्यामधील कामकाजासाठी शैलीमुळे ग्रामीण व आदिवासी भागातील लोकांसाठी आशेचा किरण बनले आहे.

४) **कार्यपद्धती** : स्वयंसेवी संस्थेच्या कार्यपद्धतीमुळे स्थानिक प्रभागातील लोकांना कार्य करण्यासाठी अधिक एक संधी मिळते. स्थानिक पातळीवर केलेल्या कामाचे अधिक समाधान मिळते. स्वयंसेवी संस्था मधील कामकाजाची शैली ही विकेंद्रीत स्वरूपाची असते. तर त्यांच्यातील कामाची विभागणी ज्येष्ठ व कनिष्ठ असे संबधावर आधारित आहे. स्वयंसेवी संस्था याची ध्येयपूर्तीवर, उद्दिष्टपूर्ती व कार्यपद्धतीबाबतची दिशा निश्चित करण्यात येते. संस्थेचे ध्येय व धोरणानुसार स्वयंसेवी संस्थेतील सर्व घटकांच्या जबाबदाऱ्यावर मांडणी केली जाते. या संस्थेच्या कार्यपद्धतीमुळे लोकशाही तत्वाचा वापर केला जातो. एकाधिकाराशाही ऐवजी स्वयं ऐच्छिक गटाची कार्यपद्धती निर्माण करण्यात येते. संस्थेच्या एकाधिकारांशाहीचा वापर होत

असल्याचे संस्थेच्या कार्यामध्ये केंद्रीकरण जाते. संस्थेच्या कामात सहकार्य, समन्वय, आंतरक्रिया नियंत्रण, संनियत्रण इत्यादीचा प्रभाव हा स्वयंसेवी संस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये असतो. स्वयंसेवी संस्थेच्या गटा गटागटात व्यक्तींव्यक्तींमध्ये प्रेमाचे व जिव्हाळ्याचे सहसंबंध असतात. त्यामुळे कार्यपद्धतीमुळे प्रत्येकामध्ये आपलेपणाचे भावना निर्माण होते.

५) **लोकसहभाग** : सामाजिक कार्य सुरू करतांना स्थानिक लोकांचा सोबत कामे करावी लागतात. सामाजिक धोरणाचे आखणी करताना लोक सहभागाची दृष्टी त्यात मांडणी लागते. सामाजिक कार्यक्रमात आपल्यापणाची भूमिका निर्माण करण्यासाठी लोक सहभागाची प्रक्रिया महत्त्वाचे आहे. लोक सहभागाच्या प्रक्रियेत स्थानिक नेतृत्वासाठी वाव व संधी मिळते. स्वयंसेवी संस्थातील निर्णय प्रक्रियेपासून ते अंमलबजावणी व कामाच्या पूर्णावस्थेपर्यत अनेक टप्प्यांमध्ये आवश्यक तेवढा सहभाग घेतला जातो. परिवर्तनासाठी होणाऱ्या संघर्षाच्या प्रक्रियेतून स्थानिक नेतृत्व विचारांना पोषक वातावरण हे स्वयंसेवी संस्थाकडून देण्यात येते. परिवर्तनासाठी स्थानिक लोकांचा सहभाग घेतला जातो कारण त्यांच्या प्रश्नांविषयी त्यांना जास्त गंभीरता व संवेदनशील असते त्यामुळे नैसर्गिक त्या प्रश्नांच्या चांगल्यापैकी एक हाताळणी करण्यासाठी योग्य नेतृत्वासाठी लोक सहभागाची संकल्पना ही महत्त्वाची आहे.

६) **स्वयंसेवी संस्थेत मानवी मूल्यावर भर** : धर्म आणि जातीय व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून निर्माण होणाऱ्या संकुचित मानसिक प्रतिबंध करण्यासाठी व निखळ मानवतावादी दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्ते हे समाजात मानवी मूल्ये रुजविण्याचे काम करतात. सामाजिक परिवर्तनाची दिशा ही जातीनिष्ठ व धर्मनिष्ठ भूमिकेतून होणार नाही याची खबरदारी घेण्यात येते. काही प्रमाणात जातीनिष्ठ आणि धर्म निष्ठेचे कार्यकर्त्यांवर होण्याची शक्यता असते परंतु स्वयंसेवी संस्थाला सामाजिक धोरणाच्या कार्यपद्धतीत जात व धर्म बाजूला सावरुन केवळ मानवी मूल्यावर आधारित कार्य करतात.

७) **निधी व संसाधने** : सामाजिक धोरणांचा सामाजिक उपक्रमाचे कार्यक्रमाचे अंमलबजावणी करण्यासाठी निधी व संसाधनांची आवश्यकता असते. स्वयंसेवी संस्था त्यांच्याकडून लोकांकडून देणगी, औद्योगिक क्षेत्रातील सीएसआर निधी, सरकारकडून अनुदान इत्यादी स्वरूपात निधी उभारण्याचे काम स्वयंसेवी संस्था करण्यात येते. संस्था पातळीवरील आवश्यक आर्थिक निधीसाठी प्रस्ताव बनवणे मंजूर करणे इ. कार्य कार्याचे अंमलबजावणी करणे व उपक्रमांमध्ये उभारण्यात येतात.काही स्वयंसेवी संस्था ह्या विदेशातील दानशूर व्यक्ती व संस्था, औद्योगिक क्षेत्रात त्यांच्याकडे निधीसाठी शासनाने मार्फत अथवा एफसीआरए कायदेअंतर्गत प्रस्ताव सादर करून निधी मिळतात.

८) **स्वायतत्ता** : स्वयंसेवी संस्था यांच्या, कार्यपद्धती, कार्यक्रम अंमलबजावणी, कार्यक्षेत्राची निवड इत्यादी व्यवस्थितमध्ये त्या संस्थांना स्वायत्तता आहे व स्वयंसेवी संस्थेच्या कार्यशैलीत बंधने नसतात. मुंबई विश्वस्त कायदा व संस्था नोंदणी कायद्याअंतर्गत स्वयंसेवी संस्थेचे नोंदणी करणे मात्र अनिवार्य असून त्यांच्यातील नियमावली अंतर्गत कार्य करण्यासाठी स्वायत्तता मान्यता आहे. स्वयंसेवी संस्था ह्या सामाजिक व्यवहारातील गरजेनुसार सक्षम रीत्याने कार्य करण्यासाठी स्वायत्त वातावरणामुळे त्यांच्या कार्याला गती मिळते.

९) **स्वयंसेवी संस्थेचे ध्येय व उद्दिष्टांची बांधिलकी** : प्रत्येक स्वयंसेवी संस्थेचे स्वतंत्र ध्येय उद्दिष्ट असतात. त्यांचे अस्तित्व जपण्याचे प्रयत्न विविध कार्यक्रमातून केला जातो. संस्थेचे ध्येय उद्दिष्टेपूर्तीसाठी निश्चित केलेले ध्येय पर्यंत पोहोचण्यासाठी संस्थेतील सर्व घटकांचा वाटचाल योग्य दिशेकडे जाते. स्वयंसेवी संस्थाच्या उद्दिष्टाला निश्चित केले जाते त्यानंतर त्या उद्दिष्टांची क्रमवारी लावण्यात येते व त्या उद्देशाच्या माध्यमातून समाजकार्य सफल करण्यात येते.

१०) **लोकांच्या ऐच्छिक सहभाग** : स्वयंसेवी संस्थेच्या कार्यक्रमाच्या आखणीत लोकांच्या ऐच्छिक सहभाग वैशिष्ट्य नमूद केले जाते. त्यांच्यामधील जनजागृती व संवेदना जागृत करून उपक्रम सक्रिय ऐच्छिक सहभाग घेतला जातो.

## २.२.४ स्वयंसेवी संस्थेचे प्रकार

**प्रस्तावना** : ब्रिटिश कालखंडापासून ते भारत स्वातंत्र्यापूर्वी कालखंडापर्यंत भारतामध्ये मिशनऱ्यांच्या सेवाभावी संस्था भारतातील विविध भागामध्ये समाजासाठी कार्यरत असल्याचे दिसून येते. त्या संस्था प्रामुख्याने धर्मदाय वृत्तीने लोकांमध्ये समाजकार्य करण्याचे उदाहरण आपणांस आढळून येतात. स्वयंसेवी संस्थांना सध्याच्या काळामध्ये समाजकार्य संस्था, सेवाभावी संस्था, समाज कल्याण संस्था अशा नावाने त्यांचा उल्लेख केला जातो. एखादा सामाजिक कार्यकर्ता हा जेव्हा वैयक्तिक पातळीवर समाजाचे कार्य करतो, त्यावेळी त्या व्यक्तीस अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते तसेच विकास कार्यात अनेक अडचणी त्याच्या समोर उभ्या राहतात हे लक्षात आल्यानंतर अधिक प्रभावी रित्या समाजात जाऊन समाजकार्य करणाऱ्या अशा कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन स्वयंसेवी संस्थेची स्थापना करणे हे हा एक आवश्यक भाग झालेला दिसून येतो. स्वयंसेवी संस्थाचे कार्यप्रणालीत स्वतंत्र पद्धतीने अथवा स्वायत्त पद्धतीने कार्य करतात ही स्वायत्त त्यांनी स्वीकारलेली आहे. स्वयंसेवी संस्थांना अशासकीय संस्था असे म्हणतात या संस्था आपल्या कार्यपद्धतीने व आवश्यक असेल तेथे बदल करण्यासाठी त्यांना मुभा प्राप्त झालेली असते. मात्र त्या संस्थांनासुद्धा संविधानात नेमून दिलेल्या नियमावली व नियंत्रणानुसार समाजात कार्य करावे लागते. स्वयंसेवी संस्थेच्या विकास कार्यात व संशोधन कार्यामध्ये ना नफा ना तोटा क्षेत्र हा शब्दप्रयोग वापरला जातो. किंबहुना स्वयंसेवी संस्था या समाजाला सामाजिक सेवा देणाऱ्या संस्था म्हणून ओळखल्या जातात. त्यामुळे त्यांनी त्या सेवांच्या मोबदल्यात कोणताही प्रकारचा मोबदल्याचा स्वीकार करू नये हे या ठिकाणी अपेक्षित आहे. स्वयंसेवी संस्थेचे त्यांच्या कार्यानुसार व उद्दिष्ट कार्यउद्दिष्टानुसार प्रकार निश्चित करण्यात येतात काही सेवाभावी संस्था या समाज प्रबोधनाचे कार्य करतात तर काही शाश्वत विकासाचे कार्य करीत असतात. स्वयंसेवी संस्था ह्या संस्थेचा संदर्भ घेताना जे वंचित आणि गरजूंना आधार देण्याची भूमिका घेतात. समाजसेवा करण्याचा ठसा उमटवण्याची इच्छा असलेल्या लोकांचा समूह बनवला जातो. थोडक्यात एनजीओ, गैरसरकारी संस्था हा शब्द समाजाच्या वापरला जात असला तरी त्यांचे कार्याची रुपरेषा ही सामाजिक भल्यासाठी वचनबद्धता दाखवणारी असावी लागते. सर्वसाधारणपणे सेवाभावी संस्था या ना नफा आणि संपूर्णपणे सामाजिक कारणासाठी समर्पित असतात या संस्थांनी केलेल्या उपक्रमांमध्ये पर्यावरणीय, सामाजिक आणि मानवी हक्क कार्याचा समावेश आहे. परंतु इतकेच मर्यादित नाही तर एनजीओंना व्यापक स्तरावर राजकीय किंवा सामाजिक बदलाचे समर्थन करण्यासाठी, कार्यकर्ता आणि समाजाचा विकास करण्यासाठी, नागरिकांचा सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि समुदायांमध्ये सुधारणा करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिकेत बदल होतात.

### २.५ स्वयंसेवी संस्थांचे प्रकार

१) **धर्मादाय अभिमुखता** (Charitable orientation) : सामाजिक कार्यात निस्वार्थ सेवा हा आपल्या भारतीय संस्कृतीची प्रेरणा मानली जाते भारतीय संस्कृतीने निस्वार्थ सेवेला ईश्वराची सेवा मानले आहे. यासंदर्भानुसार आदिवासी ग्रामीण शहरी भागात अनेक श्रीमंत मंडळी त्यांच्या वैयक्तिक पातळीवर लोकांना निस्वार्थपणे मदत करत असतात आणि विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करत असतात. चॅरिटेबल ओरिएंटेशनमध्ये लाभार्थीद्वारे कमीत कमी सहभागासह पितृत्ववादी प्रयत्नांचा समावेश होतो त्यात गरिबांच्या महत्त्वपूर्ण गरजा पूर्ण करण्यासाठी विविध मोहिमेचा समावेश होतो. उदाहरणार्थ गरिबांना कपडे वाटणे, औषध वाटप, अन्नधान्य

वाटप, निवाऱ्याची व्यवस्था करणे, शाळा इत्यादी धर्मदायी तत्त्वावर लोकांना देण्याचा हेतू अस.तो देशांमध्ये उद्भवलेली नैसर्गिक आपत्तीच्या वेळी स्वयंसेवी संस्था लोकांना निरनिराळ्या प्रकारची मदत करतात व त्यांना पुनर्रउभारण्यासाठी मदत करतात.

२) **सहभागी अभिमुखता** (Participatory Orientation) : सहभागी अभिमुखतामध्ये स्वयं मदत प्रकल्पाची उभारणी दर्शवली जाते. जिथे स्थानिक व्यक्तींचे पैसे, जमीन, साधने, श्रम, साहित्य इत्यादींच्या बाबतीत योगदान घेऊन समाज कल्याण प्रकल्पाची निर्मिती केली जाते. शास्त्रीय समुदाय विकास प्रकल्पामध्ये सहभागीची सुरुवात त्यांच्या गरजेनुसार होते आणि विविध नियोजन, प्रकल्पांचा अंमलबजावणी प्रकल्पाचे अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सुरू राहते.

३) **सेवा अभिमुखता** (Service Orientation) : सेवा अभिमुखतामध्ये सेवाभावी संस्थेला विविध सामाजिक सेवासुविधा लोकांना पुरवणे. लोक कल्याणासाठी लोकांना त्यांच्या गरजेनुसार सेवा पुरविणे, समाजामध्ये वैयक्तिक गट, कौटुंबिक, सामाजिक पातळीवर व्यक्तींना त्यांच्या गरजेनुसार त्यांना सेवा पुरविणे. उदा. बालगृह, विशेष शाळा (अपंग शारीरिक / मानसिक विकलांग व्यक्तींना) एड्सग्रस्त लोकांना उपचारात्मक सेवा पुरवणे, सशक्तिकरण अभिमुखता अस्तित्वात आहे. जिथे गरजूंना मदत करणे आणि त्यांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या सामाजिक राजकीय आर्थिक घटकांची समज विकसित करणे आणि त्यांच्या जीवनावर अंकुश ठेवण्याच्या त्यांच्या क्षमतेबद्दल जागरूकता मजबूत करणे हे उद्दिष्ट आहे. बऱ्याचदा पीडित, शोषित गटांना काही समस्या येतात, तेव्हा स्वयंसेवी संस्थाकडून त्यांच्या विकासात समर्थन देण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतात. कोणत्याही परिस्थितीत स्वयंसेवी संस्था सुविधा देणाऱ्या म्हणून काम करणाऱ्या असतात व त्यावेळी समस्याग्रस्त व्यक्तीचा जास्तीत जास्त सहभाग असतो.

४) **समुदाय आधारित संस्था (Community Base Organisation)** : स्वयंसेवी संस्था या भारतातील आदिवासी व ग्रामीण भागात विकासाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम करतात. आदिवासी आणि ग्रामीण कार्यक्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था म्हणून समाज विकास संस्था असे म्हटले जाते. या संस्था प्रामुख्याने गाव, तालुका व जिल्हा पातळीवर कार्यरत असतात आदिवासी आणि ग्रामीण भागातील दारिद्य, अंधश्रद्धा, शेती, पाणलोट क्षेत्र, शिक्षण, पाणी, आरोग्य, स्त्रियांचे प्रश्न इत्यादी अनेक विषयावर कार्यरत आहेत. तळागाळातील समुदायासोबत जाऊन स्वयंसेवी संस्था या विकासात्मक रचनात्मक व कार्यात्मक इत्यादी प्रकाराचे कार्य करण्याच्या हेतूने सामुदायिक विकास संस्थेचे गठण झालेले आहे. समुदाय आधारित संस्थाची कार्यप्रणाली ही प्रामुख्याने लोक संघटन लोक समन्वय, लोक सहकार्य लोक सहभाग, विकेंद्रीकरण व सहसंबंध आंतरक्रिया प्रस्थापित करणे इत्यादी तत्त्वज्ञानावर आधारित आहे.

५) **शहरी व्यापारी संस्था** : शहरातील व्यापारी संस्थेमध्ये रोटरीक्लब किंवा लायन्स क्लब, वाणिज्य संस्था आणि उद्योग चेंबर्स समुदाय संघटनाच्या संघटना आणि शैक्षणिक गट अगर यासारख्या संस्थेचा समावेश होतो. काही संस्था इतर उद्देशांसाठी असतात आणि गरजूंना आधार देण्यामध्ये सहभागी होतात. इतर उद्योजकांसाठी असतात आणि गरजूंचा आधार देण्यामध्ये सहभागी होतात.

६) **राष्ट्रीय स्वयंसेवी संस्था** : राष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेमध्ये, वाय एम सी ए (YMCA), वाय डब्ल्यू सी ए (YWCA) इत्यादी संस्थांचा समावेश होतो. यापैकी काही संस्थेचे राज्य स्तरांवर आणि विविध ठिकाणी शाखा स्थापन स्थापून कर्तव्य करीत आहेत. आणि स्थानिक पातळीवर स्वयंसेवी संस्थांना समर्थन देत आहेत.

७) **आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था** : आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था अर्थात धर्मनिरपेक्ष संस्था जसे की रेडक्रॉस रेड्डा, अराना आणि सेव्ह द चिल्ड्रेन एजन्सी, केअर, ऑक्सफँन, फोर्ड आणि रॉक फेलर फाउंडेशन यांचा

समावेश केला जातो. त्यांचे उपक्रम आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था यांच्याकडून स्थानिक संस्थांना उपक्रम व प्रकल्पासाठी आणि एजन्सीना निधी देण्याचे कार्यदेखील करतात.

**स्वयं-अध्यनासाठी प्रश्न**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) स्वयंसेवी संस्थेतील संरचनेतील श्रेणी लिहा?

२) स्वयंसेवी संस्थेतील संरचनेतील जनसंपर्क अधिकारी कोणत्या कार्यासाठी नियुक्त केला जातो?

३) स्वयंसेवी संस्थेतची दोन वैशिष्ट्ये लिहा?

४) समुदाय आधारित संस्थेची माहिती लिहा?

५) सहभागी अभिमुखता म्हणजे काय?

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) **संघटनात्मक संरचना** : सेवाभावी संस्थेत सु व्यवस्थितपणे संप्रेषण, कार्यक्षम कार्यप्रवाह आणि सुविधेची प्रभावी समन्वय, क्षमता होण्याच्या प्रक्रियेला संघटनात्मक संरचना असे म्हणतात.

२) **प्रकल्प** : लोककल्याणाचे किंवा लोकविकासाचे कार्यक्रम राबवण्यासाठी हाती घेतलेला उपक्रम अथवा कार्य म्हणजे प्रकल्प होय.

३) **ब्रँडनेम**: स्वयंसेवी संस्थेची चांगली प्रतिमा निर्माण करण्यासाठी व नावलौकिक वाढवण्यासाठी विशेष तज्ज्ञ सल्लागार नियुक्ती करतात. त्यांचा ब्रँ डनेम वाढवण्यासाठी उपयोग केला जातो.

४) **कार्यपद्धती** : स्वयंसेवी संस्थेच्या कार्यपद्धतीमुळे स्थानिक प्रभागातील लोकांना कार्य करण्यासाठी अधिक एक संधी मिळते. स्थानिक पातळीवर केलेल्या कामाचा अधिक समाधान मिळते.

५) **मानवी मूल्यावर आधार** : धर्म आणि जातीय व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून निर्माण होणाऱ्या संकुचित मानसिकतेला प्रतिबंध करण्यासाठी व निखळ मानवी दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये मानवी मूल्य रुजवण्यात येतात.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) स्वयंसेवी संस्थेतील संघटनात्मक संरचना ही खालच्या श्रेणीतील कर्मचाऱ्यापासून ते धोरण निर्णय प्रक्रियेतील कर्मचाऱ्यापर्यंत कामाची दिशा व एक निश्चित दिशा ठरवण्यासाठी उपयोग केला जातो.

२) स्वयंसेवी संस्थेतील प्रत्येक घटकातील प्रभावी संप्रेषण प्रस्थापित करण्यासाठी क्रियाशील घटक म्हणून जबाबदारी जनसंपर्क अधिकाऱ्याला पार पाडावी लागते.

३) स्वयंसेवी संस्थेचे निस्वार्थी व ना-नफा या वृत्तीने एकत्रित येऊन समाज कार्य करण्यात येते.

४) स्वयंसेवी संस्थेचे प्रामुख्याने धर्मदाय अभिमुखता, सहभागी अभिमुखता सेवा अभिमुखता, समुदाय आधारित संस्था, शहरी व्यापारी संस्था, राष्ट्रीय स्वयंसेवी संस्था व आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था असे विविध प्रकार पडतात.

५) स्वयंसेवी संस्थेचे ध्येय व उद्दिष्टाची बांधिलकी आखलेले आहे त्यानुसार त्यांना कार्य करावी लागतात.

## २.५ सारांश

समाजातील लोक प्रबोधनाचे व विकासाचे कार्य करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेचे संघटनात्मक संरचना असणे अनिवार्य आहे. त्या संरचनेत संचालक मंडळ, कार्यकारी मंडळ ,कार्यक्रम अथवा प्रकल्प , सहाय्यसेवा विभाग , समन्वयक इत्यादी घटकांचा त्यात समावेश होतो. समाजातील रचनात्मक व कार्यात्मक कार्य करण्यासाठी सेवाभावी संस्थेला निस्वार्थी व ना नफा मर्यादित कार्यक्षेत्र नेतृत्व कार्यपद्धती लोकसहभाग मानवी मूल्य स्वायत्तता इत्यादी वैशिष्ट्येंच्या आधारावर स्वयंसेवी संस्थेची कार्यप्रणाली निश्चित होते. समाजातील समस्या सोडवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांमार्फत समाजात विधायक कामे करावी लागतात. समाजातील काही सेवाभावी संस्था या प्रबोधनाचे काम करतात तर काही संस्था रचनात्मक विकास कार्यावर भर देत असतात.

## २.८ सरावासाठी स्वाध्याय

१) स्वयंसेवी संस्थेची संघटनात्मक संरचनेचे महत्त्व विशद करा.

२) संस्थेचे शीर्षस्थानी स्वयंसेवी संस्थेचे संचालक मंडळाचे कामकाज लिहा.

३) स्वयंसेवी संस्थेचे वैशिष्ट्य विशद करा.

४) स्वयंसेवी संस्थेचे "मानवी मूल्यावर आधार" यावर टीप लिहा.

५) सेवाभावी संस्थेचे प्रकार लिहा.

६) आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्था यावर टीप लिहा.

## २.९ अधिक वाचण्यासाठी पुस्तके


१) प्रा. रमेश म्हात्रे (2017), *ग्रामीण विकासाचे विकासासाठी समाजकार्य.*

२) IAN SMILLIE. (1995) *The Alms Bazaar* (Altruism under Fire Non Profit Organization and International development Published in Canada By International Development Research centre.

# घटक ३ : स्वयंसेवी संस्था अधिनियम व वैधानिक तरतुदी

*अनुक्रमणिका*


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्तविक

३.२ विषय-विवेचन

३.२.१ सोसायटी नोंदणी अधिनियम व प्रशासकीय यंत्रणा

३.२.२ निबंधकाचे अधिकार व विविध तरतुदी

३.२.३ सोसायटीची जंगम व स्थावर मालमत्ता

३.२.४ नावातील बदल करण्याच्या तरतुदी

३.२.५ सदस्याची पात्रता व अपात्रता

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचण्यासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

- सोसायटी कायद्यातील प्रमुख तरतुदी स्पष्ट करता येईल.
- स्वयंसेवी संस्थेला वैधता घेण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया समजून घेणे.
- सोसायटी कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी अन्वये स्वयंसेवी संस्थेतील कामकाज समजून घेता येईल.

## ३.१. प्रास्ताविक

स्वयंसेवी संस्थेला वैधानिक स्वरुप प्राप्त करण्यासाठी सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी करणे अनिवार्य आहे. या कायदातंर्गत नोंदणी प्राप्त स्वयंसेवी संस्थेला समाजात जावून कार्य करण्यासाठी, कायदेशीर मान्यता प्राप्त होते. तसेच कायद्यातील तरतुदी नुसार सरकारकडून अनुदान मिळविण्यासाठी स्वयंसेवी संस्था ह्या पात्र ठरतात.

सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० याकायद्यातील तरतुदी व कलमांची ओळख़ व माहिती करून घेणे गरजेचे आहे. यासाठी खालील प्रमाणे १८६० अधिनियमाविषयी पुढील प्रमाणे चर्चा मांडलेली आहे. सोसायटी नोदंणी

अधिनियम, १८६० अन्वये साहित्य, विज्ञान किंवा ललित कला यांच्या अभिवृद्धीकरिता अथवा उपयुक्त ज्ञानाचा उद्देशिका प्रसार (राजकीय शिक्षणाचा प्रसार) याकरिता अथवा धर्मदाय प्रयोजनाकरता स्थापन केलेल्या सोसायट्यांची कायदेविषयक परिस्थिती सुधारण्याची तरतुद करणे इष्ट आहे.

# ३.२ विषय-विवेचन

## ३.२.१ सोसायटी नोदंणी अधिनियम

सोसायटी नोदंणी अधिनियम, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमीत करण्यात येत आहे.

**सोसायटी निबंधक कलम १ क** : मधील निर्वचन या अधिनियमामध्ये विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, "निबंधक" या संज्ञेचा अर्थ, कलम १ ख अन्वये, नेमलेला सोसायटी निबंधक, असा आहे आणि त्यात सोसायटी निबंधक म्हणून अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी या कलमान्वये नेमलेल्या इतर अधिकाऱ्यांचा समावेश होतो.

**सहायक निबंधक कलम १ ख** : या कलमांतर्गत सोसायटी निबंधक आणि सहायक निबंधक-

(१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एखाद्या व्यक्तीला सोसायटी निबंधक म्हणून नेमू शकेल आणि असा निबंधक, या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा अन्वये त्यास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करील आणि त्यास नेमून दिलेली कर्तव्ये व कामे पार पाडील आणि राज्य शासन तयार करील असा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांच्या अधीनतेने. (संबंध (महाराष्ट्र राज्यात) या अधिनियमाच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवील आणि त्याच्या तरतुदींचे पालन करील.)

(२) राज्य शासन, तशाच अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रांकरिता "सोसायटी सहायक निबंधक" म्हणून व्यक्तींना नियुक्त करू शकेल आणि अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा किंवा या अधिनियमाच्या सर्व तरतुदीखालील अधिकारांचा वापर करण्याचा आणि त्याखालील कर्तव्ये व कामे पार पाडण्याचा अधिकार त्यांना देऊ शकेल.

**संस्थापन** : समयलेख व नोंदणी याद्वारे बनविण्यात आलेल्यास सोसायट्या (कलम १) - कोणत्याही साहित्यिक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय प्रयोजनाकरीता किंवा या अधिनियमाच्या कलम २० मध्ये वर्णन केलेल्या अशा कोणत्याही प्रयोजनाकरिता कोणत्याही सात किंवा त्याहून अधिक व्यक्ती, एका संस्थापन-समयलेखावर आपल्या नावांच्या स्वाक्षऱ्या करून आणि (असा समयलेख स्वतःकडून निबंधकाकडे दाखल करून) या अधिनियमान्वये एका सोसायटीत सहयोगी होऊ शकतील.

**संस्थापन समयलेख (कलम २) :** संस्थापन-समयलेखामध्ये पुढील गोष्टी असतील, त्या म्हणजे सोसायटीचे नाव ; **सोसायटीची उद्दिष्टे** - नियामक, परिषद, संचालक समिती अथवा सोसायटीच्या नियमांद्वारे ज्याच्याकडे तिच्या कामकाजाचे व्यवस्थापन सोपविण्यात आलेले आहे असे अन्य नियामक मंडळ यांची नावे, पत्ते व व्यवसाय इत्यादी माहिती व सोसायटीचे नियम व विनियम यांची अचूक प्रत म्हणून नियामक मंडळाच्या किमान तीन सदस्यांनी प्रमाणित केलेली एक प्रत संस्थापन समयलेखाबरोबरच दाखल करण्यात येईल.

**नोंदणी आणि फी (कलम ३)** : असा समयलेख आणि प्रमाणित प्रत दाखल करण्यात आल्यावर (कलम ३क च्या तरतुदींच्या अधीन राहून) निबंधक, या अधिनियमान्वये त्या सोसायटीची नोंदणी आली असल्याचे स्वतःच्या स्वाक्षरीने

प्रमाणित करील. अशा प्रत्येक नोंदणीबद्दल निबंधकाकडे पन्नास रुपये फी किंवा' (राज्य शासन) वेळोवेळी निर्देश देईल. त्याप्रमाणे त्यापेक्षा कमी फी भरावी लागेल; आणि भरण्यात आलेल्या अशा सर्व फीचा हिशेब (राज्य शासनाकडे) द्यावा लागेल.

**अनिष्ट नावाच्या सोसायट्यांची नोंदणी करण्यास मनाई (कलम ३ क)** : जे नाव इतर कोणत्याही विद्यमान सोसायटीची ज्या नावाने पूर्वी नोंदणी करण्यात आली असेल त्या नावासारखेच असल्यामुळे, अथवा निबंधकाच्या मते, लोकांची किंवा दोन्ही सोसायट्यांपैकी कोणत्याही सोसायटीच्या सदस्यांची फसगत होऊ शकेल इतके त्या सोसायटीच्या नावाशी साम्य असल्यामुळे अथवा ज्या नांवावरून संबंधित शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय उक्त शासनाचा आश्रय असल्याचे किंवा उक्त शासनाने अगर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने प्रस्थापित केलेल्या कोणत्याही सोसायटीशी संबंध असल्याचे सुचित होत असल्यामुळे किंवा सूचित होण्याचा संभव असल्यामुळे निबंधकाच्या मते अनिष्ट असेल किंवा यासंबंधात करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीन राहून जे नांव अनिष्ट असल्याचे निबंधक मानील अशा नावाने कोणत्याही सोसायटीची नोंदणी करता येणार नाही.)

**व्यवस्थापन मंडळाची वार्षिक सूची दाखल करण्याबाबत (कलम ४)** : सोसायटीच्या नियमांनुसार ज्या दिवशी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात येते. त्या दिवसानंतर चौदाव्या दिवशी किंवा त्यापूर्वी अथवा जर नियमांमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी तरतूद करण्यात आलेली नसेल तर, जानेवारी महिन्यात. याप्रमाणे दरवर्षी एकदा नियामक, परिषद, संचालक समिती किंवा त्या त्या वेळी ज्याच्याकडे सोसायटीच्या कामकाजाचे व्यवस्थापन सोपवण्यात आलेले असेल असे अन्य नियामक मंडळ यांची नावे, पत्ते व व्यवसाय यांचीएक सुची '(निबंधकाकडे) दाखल करण्यात येईल.

## ३.२.२ निबंधकाचे अधिकार व विविध तरतुदी

### (कलम ४ क) (१) सोसायटीच्या नियामक मंडळाकडून माहिती व विवरण मागविण्याचा निबंधकाचा अधिकार व त्या संबधीच्या तरतुदी

(१) या अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या कोणत्याही सोसायटीच्या कामकाजाचे व्यवस्थापन ज्यांच्याकडे सोपविण्यात आले असेल त्या नियामक मंडळावर, नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रितीने, निबंधकांस नोटीस बजावता येईल किंवा बजावण्याची व्यवस्था करता येईल व नोटीशीद्वारे सोसायटीने कामावर ठेवलेल्या व्यक्ती त्यांच्या सेवा-शर्ती (त्यांचे वित्तलब्धी, कोणतीही अंशदाने, सवलती किंवा कर्मचाऱ्यांना पुरविण्यात आलेले इतर लाभ व सुखसोयी यांसह)) व तत्ससंबंधीत बाबी याविषयी नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी माहिती किंवा विवरण सादर करण्याबद्दल सोसायटीला फर्माविता येईल.

(२) कोणत्या नमुन्यात अशी माहिती किंवा विवरण पाठविण्यात आली पाहिजेत, त्यामध्ये कोणता तपशील असावयास पाहिजे व किती कालांतरानी (कोणतीही असल्यास) अशी माहिती किंवा विवरणे पाठवावी लागतील. या गोष्टी नियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील.

(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली नोटीस, टपालाद्वारे बजावता येईल.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ, एकत्रित केलेली कोणतीही माहिती किंवा विवरण हे, ज्या सोसायटीच्या संबंधात सदरहू माहिती देण्यात किंवा विवरण तयार करण्यात आले असेल त्या सोसायटीच्या लेखीपूर्व संमतीशिवाय त्यामधील कोणताही तपशील, विशिष्ट सोसायटीच्या संबंधातील तपशील आहे हे ओळखणे ज्यामुळे शक्य होईल अशारितीने प्रसिद्ध करता येणार नाही.

(५) १८६० चा ४५ - कलम ११ क खालील किंवा भारतीय दंड संहिता याखालील एखाद्या खटल्याच्या प्रयोजनांशिवाय एरव्ही, निबंधक किंवा याबाबतीत त्याने योग्यरित्या विनिर्दिष्ट केली असेल अशी कोणतीही व्यक्ती यांच्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे देण्यात आलेली कोणतीही माहिती किंवा विवरण पाहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(६) या कलमास अनुसरून, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, निबंधकाविरुद्ध किंवा निबंधकाच्या प्राधिकारान्वये काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

## ३.२.४ सोसायटीची जंगम मालमत्ता

**सोसायटीची मालमत्ता कशाप्रकारे निहित असेल (कलम ५)** : या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेल्या सोसायटीच्या मालकीची जंगम आणि स्थावर मालमत्ता जर विश्वस्तांकडे निहित नसेल तर, ती मालमत्ता त्या त्या वेळी अशा सोसायटीच्या नियामक मंडळाकडे निहित असल्याचे मानण्यात येईल, आणि दिवाणी व फौजदारी अशा सर्व कार्यवाहींमध्ये, ती मालमत्ता अशा सोसायटीच्या नियामक मंडळाच्या योग्य मालकीहक्क असलेली त्याची मालमत्ता म्हणून तिचे वर्णन करता येईल.

**सोसायट्यांनी किंवा त्यांच्या विरुद्ध दाखल करावयाचे दावे (कलम ६) :** या अधिनियामन्वये नोंदणी करण्यात आलेल्या प्रत्येक सोसायटीचे नियम व विनियमयाद्वारे निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे अध्यक्ष, कार्याध्यक्ष किंवा मुख्य कार्यवाह किंवा विश्वस्त यांच्या नावाने आणि असे निश्चित केले नसल्यास, नियामक मंडळाकडून त्याप्रसंगापुरती जी नियुक्त करण्यात येईल अशा व्यक्तीच्या नावाने त्या सोसायटीला दावा लावता येईल किंवा त्या सोसायटीच्याविरुद्ध दावा लावता येईल.

परंतु सोसायटीविरुद्ध मागणीहक्क असलेल्या किंवा तिच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही व्यक्तीने नियामक मंडळाकडे अर्ज आल्यानंतर अन्य कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती प्रतिवादी म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेली नसेल तर, सोसायटीचा अध्यक्ष किंवा कार्याध्यक्ष किंवा मुख्य कार्यवाह किंवा विश्वस्त यांच्या विरुद्ध दावा दाखल करणे कायदेशीर ठरेल.

**दावे अवसान न पावणे (कलम ७) :** दावे समाप्त न होणे कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा किंवा कोणतीही कार्यवाही चालू असतांना, असा दावा किंवा अशी कार्यवाही जिच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली असेल किंवा चालू ठेवण्यात आलेली असेल ती व्यक्ती मरण पावल्यामुळे अथवा ज्या पदाच्या नावाने त्या व्यक्तीने दावा लावलेला असेल किंवा तिच्याविरुद्ध दावा लावलेला असेल त्या पदावर राहण्याचे बंद झाल्यामुळे असा दावा किंवा कार्यवाही समाप्त होणार नाही किंवा बंद पडणार नाही, तर तो दावा किंवा ती कार्यवाही त्या व्यक्तीच्या उत्तराधिकाऱ्याच्या नावाने किंवा त्याच्याविरुद्ध चालू ठेवण्यात येईल.

**सोसायटीच्या संबंधात न्याय निर्णयाची अंमलबजावणी करणे (कलम ८ )** : सोसायटीच्यावतीने नाव सूचविण्यात आलेल्या व्यक्तीच्या किंवा अधिकाऱ्याच्या बिरुद्ध वसुलीबाबतचा एखादा न्यायनिर्णय असेल तर, तो न्यायनिर्णय अशा व्यक्तीच्या किंवा अधिकाऱ्याच्या जंगम किंवा स्थावर मालमत्तेविरुद्ध अथवा खुद्द त्या व्यक्तीविरुद्ध किंवा अधिकाऱ्याविरुद्ध अंमलात येणार नाही तर सोसायटीच्या मालमत्ते संबंधात अंमलात आणला जाईल. अंमलबजावणीसाठी दरखास्त देताना त्यामध्ये, न्यायनिर्णय कोणता आहे, तसेच सोसायटीच्यावतीनेच फक्त ज्या पक्षकाराने किंवा यथास्थिति, ज्या पक्षकाराविरुद्ध दावा लावला असून, ज्याच्याविरुद्ध न्यायनिर्णयाची रक्कम वसूल

करावयाची आहे तो पक्षकार कोणता याबाबतची वस्तुस्थिती मांडावी लागेल आणि असा न्यायनिर्णय सोसायटीच्या मालमत्तेच्या संबंधात अंमलात आणावा लागेल.

**उपविधी अन्वये उपार्जित होणाऱ्या दंडाची वसुली (कलम ९) :-** सोसायटीचे नियम आणि विनियम यानुसार रीतसर तयार करण्यात आलेल्या कोणत्याही उपविधीअन्वये अथवा उपविधी करण्यासाठी नियमांमध्ये तरतूद करण्यात आलेली नसल्यास. या प्रयोजनार्थ बोलावलेल्या, सोसायटीच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात आलेल्या कोणत्याही उपविधीअन्वये (तो करण्यासाठी अशा सभेला उपस्थित सदस्यांपैकी तीन पंचमांश इतक्या सदस्यांची सहमतीसूचक मते आवश्यक असतील) सोसायटीच्या कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या भंगाबद्दल कोणताही द्रव्यदंड लादण्यात येईल त्याप्रसंगी असा द्रव्यदंड तो देय होईल तेव्हा, जेथे प्रतिवादी निवास करीत असेल ते ठिकाण अथवा जेथे सोसायटी वसलेली असेल ते ठिकाण यापैकी नियामक मंडळास इष्ट वाटेल अशा ठिकाणी अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडून वसूल केला जाईल.

**सदस्य हे ति-हाईत व्यक्ती म्हणून दावा लावला जाण्यास पात्र (कलम १०)** : ज्या कोणत्याही सदस्याने सोसायटीच्या नियमांनुसार वर्गणीची रक्कम थकवली असेल अथवा जो कोणी अशा नियमांच्या विरुद्ध होईल अशा पद्धतीने किंवा अशा काळापर्यंत सोसायटीची कोणतीही मालमत्ता आपल्याजवळ बाळगील किंवा ती अडकवून ठेवील. अगर सोसायटीच्या कोणत्याही मालमत्तेला क्षती पोहचविल किंवा ती नष्ट करील अशा कोणत्याही सदस्यांविरुद्ध अशा थकबाकीबद्दल किंवा अशाप्रकारे मालमत्ता अडकवून ठेवण्यामुळे होणारे तिचे नुकसान तिची क्षती किंवा तिचा नाश याबद्दल यात यापूर्वी तरतूद केलेल्या रीतीने दावा दाखल करता येईल.

जिंकलेल्या प्रतिवादीकडून न्यायनिर्णीत खर्चाची वसुली - परंतु, सोसायटीच्या पुढाकाराने प्रतिवादिविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही दाव्यात किंवा अन्य कार्यवाहीमध्ये प्रतिवादी जिंकला आणि त्याच्या दावा खर्चाजी वसुली करण्याबाबत न्यायनिर्णय देण्यात आलेला असेल तर, ज्या अधिकाऱ्याच्या नावाने दावा दाखल करण्यात आलेला असेल त्या अधिकाऱ्याकडून किंवा सोसायटीकडून खर्च वसूल करण्याची कार्यवाही करण्याचा पर्याय तो निवडू शकेल व त्यानंतरच्या प्रकरणात त्याला वर वर्णन केलेल्या रीतीने उक्त सोसायटीच्या मालमत्तेच्या संबंधात कार्यवाही करता येईल.

**अपराधांबद्दल दोषी असणारे सदस्य ति-हाईत व्यक्तीप्रमाणे शिक्षा होण्यास पात्र (कलम ११)** : सोसायटीचा जो कोणताही सदस्य, कोणताही पैसा अन्य मालमत्ता, चोरीला, हडप करील किंवा तिची अफरातफर करील, अथवा अशा सोसायटीची कोणतीही मालमत्ता बुद्धिपुरस्सर आणि दुर्भावपूर्वक नष्ट करील किंवा तिला क्षती पोहचवील अथवा ज्यायोगे सोसायटीच्या पैशांची हानी होऊ शकेल अशाप्रकारे कोणताही विलेख, बंधपत्र, पैशांचा रोखा, पावती अथवा अन्य संलेख बनावट तयार करील असा कोणताही सदस्य हा, अशाच अपराधाच्या संबंधात ज्यारीतीने सदस्य नसलेली कोणतीही व्यक्ती खटला भरला जाण्यास आणि दोष सिद्ध झाल्यावर शिक्षा मिळण्यास पात्र होईल त्याचरितीने खटला भरला जाण्यास आणि शिक्षा मिळण्यास पात्र ठरेल.

**कलम ११ क- (कलम ४ चे उल्लंघन केल्याबद्दल दंड** : या अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या कोणत्याही सोसायटीच्या कामकाजाचे व्यवस्थापन सोपविण्यात आलेल्या नियामक मंडळास, कोणतीही माहिती किंवा विवरण पाठविण्यास फर्मावले असता उक्त नियामक मंडळ जर, -

(एक) कलम ४ क अन्वये आवश्यक असेल अशी माहिती किंवा पाठविण्यात हेतुपुरस्सर नकार देईल, किंवा अशी माहिती किंवा विवरण पाठविण्यात कायदेशीर सबबीशिवाय दुर्लक्ष करील; किंवा

(दोन) जी माहिती किंवा जे विवरण खोटे असल्याचे त्यास माहित असेल अशी कोणतीही माहिती किंवा विवरण हेतूपुरस्सर देईल किंवा देण्याची व्यवस्था करील; किंवा

(तीन) कलम ४ क अन्वये, जी माहिती देणे आवश्यक असेल अशी कोणतीही माहिती मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्यास

(तीन) नकार देईल किंवा हेतुपुरस्सर खोटे उत्तर देईल. तर अशा नियामक मंडळाला अशा प्रत्येक अपराधाबद्दल दोषसिद्ध झाल्यावर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**कलम ११ ख : माहिती किंवा विवरण अयोग्यरितीने उघड केल्याबद्दल दंड** - निबंधकाने किंवा या अधिनिधमांखालील कोणतीही माहिती किंवा विवरण, गोळा करण्याकरता त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमान्वये आपली कर्तव्य पार पाडताना किंवा या अधिनियमाखालील अगर 'भारतीय दंड संहिता' याखालील कोणत्याही आपराधाबद्दलच्या खटल्याच्या प्रयोजनार्थ खेरीज अन्यथा या अधिनियमान्वये देण्यात आलेली कोणतीही माहिती किंवा सादर करण्यात आलेल्या विवरणातील मजकूर हेतुपुरस्कर उघड केला तर, तो अशा अपराधाबद्दलचा दोष सिद्ध झाल्यानंतर दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**कलम ११ ग :** अपराधांची दखल घेणे कलम ११ क खालील अपराधाबद्दलचा खटला निबंधकाच्या मंजुरीने किंचा त्याच्या मंजुरीशिवाय कोणालाही दाखल करता येणार नाही, आणि कलम ११ख खालील अपराधाबद्दलचा खटला राज्य शासनाच्या संमतीने किंवा त्याच्या संमतीशिवाय कोणालाही दाखल करता येणार नाही.

**आपल्या प्रयोजनांमध्ये परिवर्तन करण्यास त्यांची व्याप्ती वाढविण्यास किंवा त्यांचा संकोच करण्यास सोसायट्यांना समर्थ करण्या बाबत (कलम १२)** : जी सोसायटी कोणत्याही विशिष्ट प्रयोजनाकरिता किंवा प्रयोजनांकरिता स्थापन करण्यात आली असून, या अधिनियमान्वये नोंदणी झालेली आहे अशा कोणत्याही सोसायटीच्या नियामक मंडळाला जेव्हा केंव्हा असे प्रयोजन किंवा प्रयोजने, या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत असलेल्या अन्य कोणत्याही प्रयोजनांमध्ये परिवर्तित करणे, अशा प्रयोजनांपर्यंत त्यांची व्याप्ती वाढवणे किंवा त्यांचा संकोच करणे, अथवा अशी सोसायटी अन्य कोणत्याही सोसायटीबरोबर पूर्णतः किंवा अंशतः संमिलीत करणे इष्ट वाटेल तेव्हा. (या अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या कोणत्याही सोसायटीची नियामक मंडळ जेव्हा केव्हा सोसायटीचे नाव बदलण्याचे ठरवील तेव्हा.) असे नियामक मंडळ, सोसायटीच्या सदस्यांना अशा प्रकारचा प्रस्ताव लिखित अथवा मुद्रित अहवालाच्या स्वरुपात सादर करू शकेल आणि सोसायटीच्या विनियमांनुसार त्यावर विचार करण्याकरता एक एक विशेष सभा बोलावू शकेल.

परंतु, नियामक मंडळाने, बोलावलेल्या विशेष सभेच्या दहा दिवस आधी असा अहवाल त्याच्यावर विचार करण्याकरिता सोसायटीच्या प्रत्येक सदस्यांकडे पोचवण्यास किंवा टपालाने पाठवण्यात आल्याखेरीज किंवा अशा प्रस्तावास एकूण सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी व्यक्तीशः किंवा बदली व्यक्तीद्वारे आपली मते देऊन तो, संमत केला आणि या पूर्वीच्या सभेनंतर एक महिन्याच्या कालांतराने नियामक मंडळाकडून बोलावण्यात आलेल्या दुसऱ्या विशेष सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांच्या मतांनी त्याला पुष्टी देण्यात आली असेल त्याखेरीज असा कोणताही प्रस्ताव अंमलात आणला जाणार नाही.

## ३.२.४ नावातील बदल करणाऱ्या तरतुदी

### (१२ क) नावातील बदलाची नोंदणी

(१) कलम १२ द्वारे विहित करण्यात आलेल्या रीतीने नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव संमत करण्यात आला असेल आणि त्याला पुष्टी देण्यात आली असेल अशा बाबतीत, अशाप्रकारे संमत करण्यात आलेल्या आणि

पुष्टी देण्यात आलेल्या प्रस्तावाची एक प्रत, (***) निबंधकाकडे, नावातील बदलाची नोंद करण्यासाठी पाठवण्यात येईल. (जर नावातील बदल हा कलम ३ क मध्ये नमूद केलेल्या करणापैकी कोणत्याही कारणास्तव त्याच्यामते ते नाव अनिष्ट असेल तर) निबंधक, नावातील बदलाची नोंद करण्याचे नाकारील.

(२) पोटकलम (१) मध्ये तरतूद करण्यात आली असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही जर नावातील बदलाच्यासंबंधी या अधिनियमात असलेल्या तरतुदींचे पालन करण्यात आले आहे. याबाबत निबंधकाचे समाधान झाले असेल तर, तो नावातील बदलाची नोंद करील आणि त्या प्रकरणाच्या परिस्थितीनुरूप फेरबदल केलेले नोंदणी प्रमाणपत्र देईल. असे प्रमाणपत्र देण्यात आल्यावर नावातील बदलाची कार्यवाही पूर्ण होईल.

(३) पोटकलम (२) अन्वये दिलेल्या प्रमाणपत्राच्या कोणत्याही प्रतीसाठी निबंधक एक रूपया फी आकारील आणि अशाप्रकारे प्रदान केलेल्या सर्व फीचा हिशेब *(राज्य) शासनाकडे देण्यात येईल.

(४) जर (कलम३ क च्या तरतुदी योग्यप्रकारे लक्षात घेऊन) एखाद्या सोसायटीची ज्या नावाने नोंद करायला नको होती अशा नावाने अनवधानाने, किंवा अन्यथा नोंद झाली असेल तर, निबंधक संबंधित पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सोसायटीच्या नावात बदल करण्याचा निदेश देऊ शकेल आणि त्या सोसायटीला, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, निदेश देण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत किंवा वाढीव कालावधी देणे निबंधकाला योग्य वाटल्यास. अशा वाढीव कालावधीत सोसायटीला आपल्या नावात बदल करावा लागेल.)

**१२ ख नावातील बदलाचा परिणाम :** एखाद्या सोसायटीच्या नावातील बदलामुळे, सोसायटीच्या कोणत्याही हक्कांवर किंवा आबंधनांवर परिणाम होणार नाही अथवा त्यामुळे सोसायटीकडून किंवा सोसायटीविरुद्ध केलेली कोणतीही वैध कार्यवाही सदोष ठरणार नाही; आणि सोसायटीकडून किंवा तिच्याविरुद्ध पूर्वीच्या नावाने जी कोणतीही वैध कार्यवाही चालू ठेवता आली असती किंवा सुरु करता आली असती ती कार्यवाही तिच्या नवीन नावाने चालू ठेवता येईल किंवा सुरु करता येईल.

**१२ ग. सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३** हा अमलात येण्यापूर्वी केलेल्या नाव बदलांची नोंदणी या अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या कोणत्याही सोसायटीने जर 'सोसायटी नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४८' अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी कंपनी निबंधकाला आपल्या नावातील बदल कळविला असेल तर, आणि जर निबंधकाने अशा बदलाची नोंद केली असेल तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूतअसले तरी, निबंधक, त्या सोसायटीने याबाबत अर्ज केल्यावर आणि कलम १२ क च्या पोटकलम (३) मध्ये, तरतूद करण्यात आल्याप्रमाणे फी भरल्यावर निबंधक अशा नावातील बदलाची नोंद करेल आणि उक्त कलम १२ क च्या पोटकलम (२) अन्वये त्या सोसायटीला एक प्रमाणपत्र देईल. असे प्रमाणपत्र देण्यात आल्यावर निबंधकाने अशा बदलाची नोंद केली होती त्या तारखेपासून असा बदल पूर्ण झाल्याचे मानण्यात येईल-मग कलमे १२ व १२क मध्ये विहित केलेली कार्यपद्धती त्या सोसायटीने अनुसरली नाही ही वस्तुस्थिती असली तरी हरकत नाही.

**१२ घ. हिशेब ठेवणे आणि त्यांचा ताळेबंद ठेवणे व लेखापरीक्षा करणे**

(१) या अधिनियमान्वये नोंदणी झालेल्या (मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० याच्या अर्थानुसार सार्वजनिक न्यास नसलेल्या) एखाद्या सोसायटीच्या कामकाजाचे व्यवस्थापन ज्याच्याकडे सोपविण्यात आलेले आहे असे प्रत्येक नियामक मंडळ नियमित हिशेब ठेवील.

(२) असे हिशेब, निबंधक मान्यता देईल अशा नमुन्यात ठेवण्यात येतील आणि त्यात, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा तपशीलाचा समावेश असेल.

(३) दरवर्षी, मार्चच्या एकतीस तारखेस किंवा निबंधकाकडून निश्चित करण्यात येईल अशा अन्य दिवशी हिशेबांचा ताळेबंद ठेवण्यात येईल.

(४) नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, दरवर्षी आणि 'सनदी लेखापाल अधिनियम, १९४९ यातील अर्थानुसार जो सनदी लेखापाल असेल अशा व्यक्तीकडून किंवा राज्य शासन याबाबतीत प्राधिकृत करील अशा अन्य व्यक्तीकडून हिशेबांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

**१२ ड ताळेबंद तयार करणे व नियमबाह्य गोष्टी, इत्यादी कळवणे हे लेखा परीक्षकाचे कर्तव्य असणे.**

(१) कलम १२घ अन्वये सोसायटीच्या हिशेबाची लेखापरीक्षा करणाऱ्या प्रत्येक लेखापरीक्षकाने ताळेबंद आणि उत्पन्न व खर्च यांचा हिशेब तयार करणे आणि त्याची एक प्रत निबंधकाकडे अग्रेषित करणे हे त्याचे कर्तव्य असेल.

(२) नियमबाह्य बेकायदेशीर किंवा अयोग्य खर्चाची अथवा सोसायटीच्या मालकीचे पैसे किंवा इतर मालमत्ता वसूल करण्यात अपयशी ठरल्याची किंवा त्यात चुक झाल्याची अथवा सोसायटीच्या पैशांची किंवा इतर मालमत्तेची झालेली हानी किंवा अपव्ययाबद्दलची सर्व प्रकरणे, लेखापरीक्षक आपल्या अहवालात विनिर्दिष्ट करील, आणि असा खर्च असे अपयश, चूक हानी किंवा अपव्यय हा, नियामक मंडळाने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने विश्वासघात केल्यामुळे किंवा अपयोजन केल्यामुळे किंवा इतर कोणत्याही गैरवर्तणुकीमुळे झालेला आहे किंवा कसे ते नमूद करील).

**सोसायट्यांचे विसर्जन करणे आणि त्यांचे कामकाज पाहणे यासाठी तरतूद.(कलम १३) :** कोणत्याही सोसायटीच्या किमान तीन-पंचमांश इतक्या सदस्यांना ती सोसायटी विसर्जित करण्याचे ठरवता येईल. आणि त्यानंतर, ती तात्काळ किंवा त्यावेळी संमत झालेल्यावेळी विसर्जित करण्यात येईल, आणि या संबंधात लागू होणारे असे सदर सोसायटीचे काही नियम असल्यास त्यानुसार आणि असे नियम नसल्यास, नियामक मंडळाला समयोचित वाटेल त्याप्रमाणे, सोसायटीच्या मालमत्तेची विल्हेवाट करण्यासाठी आणि तिच्या हक्क मागण्या व दायित्वे चुकती होण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येईल, परंतु उक्त नियामक मंडळाच्यासदस्यांमध्ये किंवा सोसायटीच्या सदस्यांमध्ये कोणताही विवाद उद्भवल्यास तिचा कामकाज पाहण्याच्या संबंधातील कोणताही प्रश्न सोसायटीची मुख्य इमारत ज्या जिल्ह्यात असेल. त्या जिल्ह्याच्या मूळ दिवाणी अधिकारितेच्या प्रधान न्यायालयाकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात येईल, आणि न्यायालय, अशा बाबतीत त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे आदेश देईल.संमती आवश्यक - परंतु, सोसायटी विसर्जित करण्यासाठी, बोलावण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये तीन पंचमांश इतक्या सदस्यांनी स्वतः किंवा बदली व्यक्तीमार्फत मतदान करून त्याद्वारे, असे विसर्जन करण्याची आपली इच्छा व्यक्त केल्याशिवाय, अशी कोणतीही सोसायटी विसर्जित करण्यात येणार नाही. सरकारची संमती - परंतु, '(जेव्हा केव्हा कोणतेही शासन) या अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही सोसायटीचे सदस्य किंवा अंशदाता असेल किंवा त्या सोसायटीत ते अन्यप्रकारे हितसंबंधित असेल तेव्हा ' (जेथे नोंदणी झाली त्या राज्याच्या शासनाच्या संमतीशिवाय) अशी सोसायटी विसर्जित करण्यात येणार नाही.

**विसर्जनानंतर कोणत्याही सदस्याला नफा न मिळणे (कलम *१४)** : विसर्जना नंतर कोणत्याही सदस्याला नफा न मिळणे या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेली कोणतीही सोसायटी विसर्जित होऊन तिची सर्व ऋणी दायित्वे चुकती करण्यात आल्यानंतर जर तिची काही मालमत्ता ती कोणत्याही स्वरूपाची असो-शिल्लक राहिली तर, ती उक्त सोसायटीच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही सदस्याला देता किंवा त्यांच्यामध्ये वाटून देता येणार नाही, तर विसर्जनाच्यावेळी व्यक्तीशः किंवा बदली व्यक्तीमार्फत उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी किमान तीन-पंचमांश

इतक्या सदस्यांनी मतदानाद्वारे किंवा त्याअभावी पूर्वोक्त चायालयाने ठरवावयाच्या अशा अन्य सोसायटीला ती द्यावी लागले.संयुक्त भांडवल कंपन्यांना हा खंड लागू नाही - परंतु, असे असले तरी, भागधारकांच्या अंशदानाद्वारे संयुक्त भांडवल कंपनीच्या स्वरूपात जी सोसायटी प्रतिष्ठापित किंवा स्थापन करण्यात आलेली असेल अशा कोणत्याही सोसायटीला हा खंड लागू होणार नाही).

## ३.२.५ सदस्याची पात्रता व अपात्रता

**सदस्य' याची व्याख्या निरर्ह सदस्य (कलम १५) :** सदस्य याची व्याख्या या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सदस्य म्हणजे, ज्या व्यक्तीला सोसायटीचे नियम व विनियम यानुसार प्रवेश देण्यात आलेला असून, जिने सोसायटीची वर्गणी भरलेली असेल अथवा सदस्यांच्या पटावर किंवा यादीवर सही केलेली असेल व तसेच जिने अद्याप सोसायटीचे नियम व विनियम यांनुसार राजीनामा दिलेला नसेल अशी व्यक्ती होय; परंतु ज्या व्यक्तीच्या वर्गणीची बाकी तीन महिन्यांकडून अधिक कालावधीसाठी थकली असेल ती व्यक्ती, या अधिनियमाखालील सर्व कामकाजामध्ये मतदान करण्यास किंवा सदस्य म्हणून गणली जाण्यास हक्कदार असणार नाही; तर सदस्य म्हणून अपात्र असेल.

**नियामक मंडळ याची व्याख्या (कलम १६)** : नियामक मंडळ यांची व्याख्या सोसायठीचे नियामक मंडळ म्हणजे, नियामक परिषद, संचालक समिती, विश्वस्त किंवा ज्याच्याकडे सोसायटीचे नियम व विनियम यानुसार सोसायटीच्या कामकाजाचे व्यवस्थापनाचे काम सोपविले आहे असा अन्य निकाय होय.

**अधिनियमापूर्वी बनविण्यास आलेल्या सोसायट्यांची नोंदणी (कलम १७)** : साहित्यिक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी स्थापन केलेली आणि (१८५० चा अधिनियम ४३) या अन्वये नोंदणी केलेली कोणतीही कंपनी किंवा सोसायटी अथवा * (या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी राज्याच्या संबंधित भागात स्थापन व घटित केलेली, पण सदर १८५० चा अधिनियम ४३ यान्वये) किंवा अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी सोसायट्यांच्या किंवा कंपन्यांच्या नोंदणीसाठी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी न केलेल्या अशा कोणत्याही सोसायटीची यथास्थिती, यानंतर केव्हाही या अधिनियमाखाली नोंदणी होऊ शकेल; परंतु अट अशी की, नियामक मंडळाने या प्रयोजनार्थ बोलाविलेल्या एखाद्या सर्वसाधारण सभेमध्ये व्यक्तिशः उपस्थित असलेल्या सदस्यापैकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी अशाप्रकारे नोंदणी करण्यास आपली संमती दिल्याखेरीज, अशा कोणत्याही कंपनीची किंवा सोसायटीची या अधिनियमाखाली नोंदणी केली जाणार नाही.

(१८५० चा अधिनियम ४३) याअन्वये नोंदणी केलेल्या कंपनीच्या किंवा सोसायटीच्या बाबतीत. संचालक हेच असे नियामक मंडळ म्हणून मानण्यात येईल. अशा प्रकारे नोंद न केलेल्या सोसायटीच्या बाबतीत, सोसायटीच्या स्थापनेनंतर जर असे नियामक मंडळ घटित करण्यात आलेले नसेल तर, तिचे सदस्य रीतसर सूचना देऊन यापुढे सोसायटीचे काम करण्याकरिता एक नियामक मंडळ तयार करण्यास सक्षम असतील.

**अशा सोसायट्यांनी समय-लेख इत्यादि निबंधक यांच्याकडे दाखल करणे (कलम १८)** : मागील कलमात नमूद केलेल्या अशा कोणत्याही सोसायटीला या अधिनियमाखाली नोंदणी करवून घेण्यासाठी सोसायटीच्या नियामक मंडळाने सोसायटीचे, नाव तिची उद्दिष्टे आणि नियामक मंडळाच्या सदस्यांची नावे, पत्ते आणि व्यवसाय दर्शविणारा एक समयलेख आणि कलम २ मध्ये तरतूद केल्यानुसार प्रमाणित केलेले असे सोसायटीचे नियम व विनिमय यांच्या एका प्रतीसह व ज्या सर्व साधारण सभेत सोसायटीची नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला, त्या सभेच्या कामकाजावृत्ताची एक प्रत ही कागदपत्रे निबंधक (**) (***) यांच्याकडे दाखल करणे पुरेसे असेल.

३.२.२३ दस्ताऐवजांचे निरीक्षण (कलम १९) :- दस्तऐवजाचे निरीक्षण (कलम ४ क द्वारे तरतूद केली असेल ती खेरीज करून, एरव्ही कोणतीही व्यक्ती) या अधिनियमान्वये निबंधकाकडे दाखल केलेल्या सर्व दस्तऐवजांचे निरीक्षण

करावयाचे असल्यास अशा प्रत्येक निरीक्षणासाठी एक रुपयाएवढी फी भरून, त्यांचे निरीक्षण करू शकेल. (किंवा राज्य शासन किंवा त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी याबाबत राजपत्रातील अधिसूचनेद्वार निश्चित करील अशी फी भरल्यावर कोणत्याही दस्ताऐवजाची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची प्रमाणित प्रत किंवा त्यातील उतारा देण्यात यावा अशी निबंधकाकडे मागणी करू शकेल) आणि अशी प्रमाणित प्रत कोणत्याही स्वरूपाच्या सर्व कायदेशीर कार्यवाहीत अंतर्भूत असलेल्या बाबींचा प्रथमदर्शनी साक्षीपुरावा असेल.

**कोणकोणत्या सोसायट्यांना हा अधिनियम लागू होतो (कलम २०)**

(१) या अधिनियमान्वये पुढील प्रकारच्या सोसायट्यांची नोंदणी होऊ शकेल, त्या अशा :- धर्मदाय सोसायट्या, भारताच्या विविध इलाख्यांमध्ये स्थापन करण्यात आलेले सैनिकी, अनाथ बालक निधी किंवा सोसायट्या, तसेच विज्ञान, साहित्य किंवा ललित कला यांच्या अभिवृद्धीसाठी, शिक्षण, उपयुक्त ज्ञानाचा प्रसार, ' (राजकीय शिक्षणाचा प्रसार) यासाठी आणि सदस्यांच्या सार्वत्रिक उपयोगासाठी किंवा आम जनतेसाठी खुली असलेली ग्रंथालये किंवा वाचनालये स्थापन करणे आणि चालविणे यांसाठी अथवा सार्वजनिक वस्तुसंग्रहालये, रंगचित्रे व इतर कलाकृती यांची कलादालने (गॅलऱ्या) निसर्गेतिहासिक वस्तुसंग्रह, यंत्रशास्त्रीय आणि तत्त्वज्ञानविषयक नवशोध, संलेख किंवा रचनाकृती यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या सोसायट्या.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही सार्वजनिक अथवा धार्मिक प्रयोजनार्थ, 'सार्वजनिक सोसायटी नोंदणी अधिनियम' याखाली नोंदणी झालेली आणि 'सोसायटी नोंदणी (मुंबई विस्तारण व सुधारणा) अधिनियम १९५८ च्या प्रारंभाच्यावेळी (मुंबई राज्याच्या) हैद्राबाद क्षेत्रात कार्यरत असलेली कोणत्याही सोसायटीची या अधिनियमाखाली नोंदणी झाली असल्याचे व ती नोंदणी चालू असल्याचे मानले जाईल.

**(२०) क विशेष सोसायटी याची व्याख्या या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ**, "विशेष सोसायटी" याचा अर्थ महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१ च्या प्रयोजनांसाठी तयार केलेली सोसायटी असा आहे. २० (ख) विशेष सोसायट्यांच्या बाबतीत अधिनियमात फेरबदल करण्याचा अधिकार.

(१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निर्देशित करू शकेल की, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींपैकी काही तरतुदी या,

(क) विशेष सोसायटीला लागू होणार नाहीत

(ख) अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे अपवाद, फेरबदल आणि अनुकूलने यांसह विशेष सोसायटीला लागू होतील;

(२) पोट-कलम (१) अन्वये, काढावयाच्या प्रस्तावित केलेल्या प्रत्येक अधिसूचनेची एक प्रत, राज्य विधानमंडळाच्या सभागृहाचे अधिवेशन चालू असताना, कमीत कमी तीस दिवस इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मसुद्याच्या स्वरूपात ठेवण्यात येईल, आणि त्या कालावधीत जर दोहोंपैकी एखाद्या सभागृहाने अधिसूचना काढण्यास मान्यता दिली नाही किंवा फेरबदल करूनच ती काढण्यास मान्यता दिली तर, एकतर अशी अधिसूचना मुळीच काढण्यात येणार नाही किंवा, यथास्थिती आवश्यक असेल त्याप्रमाणे, दोन्ही सभागृहांना मान्य होतील अशा फेरबदलांसह अशी अधिसूचना काढण्यात येईल).

युनिसेफचे ३४ देशांमध्ये राष्ट्रीय समित्या आहेत. प्रत्येक स्वतंत्र स्थानिक गैरसरकारी संस्था म्हणून कार्यरत आहे. इनोसेंटी रिसर्च सेंटरची स्थापना १९८८ साली स्थापना केलेले आहे. युनिसेफच्या माध्यमाने बालविकास, आरोग्य, बाल संरक्षण, बालशिक्षण, बाल पर्यावरण, इत्यादी क्षेत्रांमध्ये काम सुरू असल्याचे आढळते. सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक किंवा धार्मिक कार्यक्रमासाठी काम करणारी कोणतीही संस्था ही गृहमंत्रालयाकडे नोंदणीकृत असेल किंवा परदेशी लोकांकडून मिळालेल्या निधीचे स्वतंत्र यादी ठेवून लेखा परीक्षण करून दरवर्षी गृह मंत्रालयाकडे अहवाल सादर करीत असेल अशा कोणत्याही संस्थेला एफसीआरए अंतर्गत प्रमाणपत्र घेऊन निधी प्राप्त करता येतो.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

१) युनिसेफचे कार्य विशद करा.
२) युनिसेफ इनोसेंटी सेंटर यावर टीप लिहा.
३) युनीसेफचे जागतिक कोठार यावर टीप लिहा.
४) युनिसेफच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची माहिती लिहा.
५) फॉरेन काँन्ट्रीब्युशन्स रेग्युलेशन कायद्यावर माहिती लिहा.
६) विदेशी योगदान नियमन कायद्याचे महत्व लिहा.
७) विदेशी योगदान नियमन कायद्यातील विविध तरतुदी लिहा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


1) Dr. Georage Joseph (1997), *Social Work Education & Emerging Concerns,* Kerala, published College of Social Sceince, Kalamssery
2) www.unisef.org
3) The Foreign Contribution Act 2010.

# घटक ५ : स्वयंसेवी संस्था व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण

***अनुक्रमणिका***


५.० उद्दिष्टे

५.१ प्रास्ताविक

५.२ विषय-विवेचन

 ५.२.१ स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात दुर्बल घटकांच्या सक्षमी करणासाठी स्वयंसेवी संस्थेचे योगदान

 ५.२.२ स्वयंसेवी संस्था व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण

 ५.२.३ सक्षमीकरणाच्या योजना

५.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

५.५ सारांश

५.६ सरावासाठी स्वाध्याय

५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ५.० उद्दिष्टे

- स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून दुर्बल घटकातील लोकांचे सामाजिक व शैक्षणिक विकासाचा अभ्यास करता येईल.
- दुर्बल घटकातील लोकांच्या विकासासाठी स्वयंसेवी संस्था मार्फत राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या माहिती समजेल.
- स्वयंसेवी संस्थेच्या विकासाचे मार्ग निश्चित करण्यासाठी कोणते मार्ग आहेत ते समजेल.
- दुर्बल घटकातील लोकांमध्ये स्वयं विकासाची प्रेरणा जागृतकरण्याचे मार्ग सांगता येईल.

## ५.१ प्रास्ताविक

सन १९५० नंतर देशातील सामाजिक आर्थिक शैक्षणिक वातावरण फ़ार चांगले नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील सर्व लोकांचे सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे योजना व कार्यक्रम राबवण्याचे एक प्रकारचे आव्हान होते. अशा परिस्थितीमध्ये भारत सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या उद्दिष्टात देशातील पीडित व आर्थिक आणि सामाजिक मागासलेल्या दुर्बळ घटकाच्या विकासासाठी विविध योजनांची आखणी केली. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाजवळ मर्यादित साधन संपत्ती व अपुरे मनुष्यबळ यांची सांगड घालून विकास साध्य करणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीमध्ये देशातील स्वयं साहाय्यता गटाने स्थापन

केलेल्या सामाजिक संस्थांमार्फत आदिवासी, ग्रामीण, दलित वस्त्यांमध्ये विकासाचे काम स्वयंसेवी संस्थामार्फत करणे हे करण्याची एक अग्रही भूमिका दिसून आली. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय इत्यादी क्षेत्रांमध्ये लोककल्याणासाठी कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्था या एका विशिष्ट उद्दिष्टासाठी स्थापन केलेली होती. त्यामध्ये प्रामुख्याने स्वयंसेवक स्वइच्छेने व निस्वार्थपणे सामाजिक कल्याणासाठी काम व मदत करण्याची त्यांच्याजवळ मानसिक तयारी होती. अशा संस्था आणि संघटना प्रामुख्याने नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीत सापडलेल्या लोकांना योग्य ती मदत करण्याची त्यांची धडपड होती. तसेच लोकांच्या मूलभूत अधिकारासाठी व ते जोपासण्याची आणि अबाधित राखण्यासाठी योजना राबवण्यात येत होत्या. नागरी सुविधांबद्दल जागृत करणे, बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी मदत करणे अशा अनेक सामाजिक समस्या हाताशी घेऊन सामाजिक संस्था या दुर्बल घटकाच्या विकाससाठी कार्यरत होत्या तथापि स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये बेरोजगारी, स्त्रियांवरील अत्याचार,व पर्यावरण विषयक प्रश्न, शेती विषयक प्रश्न, अनुसूचित जाती, जमातीतील लोकांचे प्रश्न अशा समस्यांना आपण सामोरे जात होतो. तेवढेच नव्हे तर देशात वीज पाणी निवारा शिक्षण या पायाभूत सुविधांची गंभीर समस्या होती. या पायाभूत सुविधा लोकांना देण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची धडपड होते . वास्तविक शिवाजी महाराजांच्या काळापासून ते स्वातंत्र्य मिळाल्या काळात पर्यंत भारतीय संस्कृतीनुसार मागासलेले दुर्बल घटकांचे विकास साध्य करण्याचे वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न झालेले दिसून येतात. शिवाजी महाराजांच्या काळात दुर्बल घटकातील लोकांसाठी निवाराच्या, पिण्याचे पाणी, शेतीविषयक साधनांच्या इत्यादी सुविधा पुरवण्यात येत होत्या. स्वतंत्यात्तर काळामध्ये भारतामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये विकास साध्य करण्यासाठी सामाजिक संघटनेची सरकारला मदत घ्यावी लागली.

# ५.२. विषय-विवेचन

## ५.२.१ स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात दुर्बल घटकांच्या सक्षमी करणासाठी स्वयंसेवी संस्थेचे योगदान

स्वातंत्र्यपूर्वकाळात राजर्षि शाहू महाराजांनी केलेले समाजकल्याणविषयक कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सुधारणांसाठी राजसत्तेचा पुरेपूर उपयोग केला. राज्यात अस्पृश्यांसह बहुजन समाजाला शिकण्यासाठी सक्रिय मदत केली. कोल्हापूरात निरनिराळ्या जातींसाठी विद्यार्थी वसतिगृहे स्थापन केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा आदेश काढला (१९१७).स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव, सामाजिक विषमता व अन्यायाविरूद्ध संघर्ष केला. अस्पृश्यांना शिक्षणात उत्तेजन, सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी, निरनिराळे व्यवसाय करण्यास प्रोत्साहन, सहभोजनाचे कार्यकम व अस्पृश्यता निर्मूलन परिषदांचे आयोजन, असे सर्वांगीण प्रयत्न केले. दुष्काळपीडित शेतकऱ्यांना कर्जवाटप, यात्रेकरूंसाठी धर्मशाळा तसेच स्त्री सुधारणाविषयक विविध कामे त्यांनी केली.

एकोणिसाव्या शतकानंतर मानवतावादाचा प्रसार होऊन सामाजिक समस्यां-वर तोडगा काढण्यासाठी बुद्धीवादी व विवेकनिष्ठ तत्त्वे प्रसृत झाली. लोककल्याणकारी योजनांबाबत वैज्ञानिक व वस्तुनिष्ठ दृष्टीकोन निर्माण होऊन, त्याबाबत संशोधन व विचारविनिमय होऊ लागला. समाजातील परिस्थिती अभ्यासून योजनापूर्वक कल्याणाची धोरणे आखणे, ही काळाची गरज ठरली. समाजवाद, लोकशाहीवादी तत्त्वे व मानवी हक्कांविषयी जागृती झाली.

समाजकल्याणाची प्रमुख जबाबदारी शासनाने उचलावी, हा आग्रह सर्व स्तरावर प्रचलित झाला. कायदेशीर नियोजन धोरणे व जनतेच्या सहभागाचा उपयोग, हा समाजकल्याणाच्या कार्यासाठी आवश्यक असणे मान्य झाले.

भारतीय समाजकल्याण मंडळाची स्थापना १९४७ साली झाली. महात्मा गांधींचे सामाजिक प्रबोधनाविषयीचे कार्य पुढील समाजकल्याणाच्या कार्यासाठी मार्गदर्शक ठरले. १९४७ नंतर भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये या विचारांना कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषत: फाळणीनंतर समाजात प्रचंड अशांतता व अस्थिरता निर्माण झाली. तसेच दारिद्रय, स्थलांतरांचे पुनर्वसन व सामाजिक स्थैर्य प्रस्थपित करण्यावर भर दिला गेला. या काळात संपूर्ण जगभर आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत उलथापालथी झाल्या. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरणामुळे कृषिक्षेत्रातून कामगारांचे औद्योगिक केंद्रांकडे स्थलांतर, शहरांची वाढ व बदलते कौटुंबिक जीवन, या सर्व कारणांमुळे मानवी जीवनमानाविषयीच्या कल्पनांमध्ये आमूलाग बदल घडून आला. वैज्ञानिक व वैदयकीय क्षेत्रांतील लक्षणीय प्रगतीमुळे ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या. उत्पादन वाढले, उद्योगधंदे विस्तारले, आरोग्यविषयक सुविधा व रोगप्रतिबंधक उपाय उपलब्ध झाले मात्र या प्रगतीचा समाजातील सर्व स्तरांना समान फायदा झाला नाही. वास्तवात, सर्वसामान्य जनतेला, विशेषत: ग्रामीण व कनिष्ठवर्गीयांना यथार्थ साधनसामगी, योग्य वेतन, अन्नपुरवठा, निवारा, शिक्षण व सुरक्षा या सुविधा मिळू शकल्या नाहीत. त्यामुळे समाजातील वंचित वदुर्बल जनतेसाठी शासकीय व ऐच्छिक संघटनांमार्फत पूरक मदत व साधनसामग्री उपलब्ध करून देणे अपरिहार्य झाले.

## ५.२.२ स्वयंसेवी संस्था व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण

समाजातील दुर्बल व कमकुवत घटकांच्या राहणीमानात सुधारणा करून त्यांना आर्थिक विकासाचा लाभ मिळावा, या भूमिकेतून केले जाणारे सामाजिक प्रयत्न होय. भारतीय संविधानातील कलम ४६ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार, दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाति-जमाती यांच्या शैक्षणिक, सामा-जिक व आर्थिक विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. कल्याणकारी राज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शासनामार्फत उन्नत समाजाच्या प्रगतीबरोबर समाजातील दुर्बल घटक, अल्पसंख्याक, मागासवर्गीय, अपंग, महिला इत्यादींच्या कल्याणासाठी प्रयत्न केले जातात. समाजकल्याण ही स्थल — काल सापेक्ष संकल्पना असल्यामुळे, या विषयीची व्याख्या ठरविताना सामाजिक, आर्थिक व राजकीय पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते. समाजातील वंचित, दुर्बल व मागासवर्गीय जनतेला पूरक व पोषक सहाय्य करणे,हे कल्याणकारी सेवांचे कार्यक्षेत्र होय. परिस्थितीजन्य व इतर अनिवार्य समस्यांमुळे ज्या विशिष्ट व्यक्ती अथवा समुदायांचा सर्वांगीण विकास होत नाही (उदा., वृद्ध, बालके, स्त्रिया, अपंग, दलित, गोरगरीब, आदिवासी इ.) अशा व्यक्तींना सक्षम बनविण्यासाठी समाजकल्याणाचे उपकम गरजेचे ठरतात.

भारतातील स्वयंसेवी संस्था या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, संस्कृती क्षेत्रामध्ये मागासलेल्या व दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सर्वांगीण उन्नतीसाठी कार्यरत आहेत ज्या ठिकाणी शासकीय धोरणानुसार कार्य करणे शक्य नसते अशा ठिकाणी स्वयंसेवी संस्था त्या ठिकाणी जाऊन लोककल्याणाचे उपक्रम राबवीत असतात दुर्बल लोकांचे आणि या समुदायाला निरनिराळ्या सामाजिक कौटुंबिक व वैयक्तिक समस्यांना सामोरे जावे लागते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशामध्ये पंचवार्षिक योजना हाती घेण्यात आल्या होत्या व या योजनेमध्ये प्रामुख्याने दुर्बल घटकाच्या विकासासाठी कार्यक्रमांची आखणी मांडली होती. सर्वसाधारणपणे १९५० पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते २०१४ पर्यंत भारत सरकारने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून कल्याणाचे उपक्रम दुर्बळ घटकांमध्ये राबवलेले स्वयंसेवी संस्थांमार्फत राबवलेले दिसून येतात २०१४ नंतर आपल्या देशामध्ये नीती आयोगाची स्थापना झाली नीती आयोगामार्फत विविध उपक्रमाचे व कल्याणकारी विकासाचे कार्यक्रम सुरू असल्याचे जाणवते. भारतामध्ये दुर्बल घटकाच्या शैक्षणिक विकासासाठी स्वयंसेवी संस्था मार्फत विविध उपक्रम राबवले जातात तसेच

ग्रामीण भागामध्ये आर्थिक उन्नतीसाठी मनरेगा यासारखे प्रकल्प आणि पाणलोट क्षेत्र विकासाचे उपक्रम देखील राबवण्यात येत आहेत.

१) **दुर्बल घटकाचे शैक्षणिक विकास साध्य करणे :** स्वयंसेवी संस्था ह्या सामाजिक, आर्थिक, दुर्बल घटकातील लोकांसाठी दर्जेदार शिक्षण व मापक किमतीमध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच बदलत्या काळाच्या ओघांमध्ये कौशल्य विकासाचे शिक्षण अथवा प्रशिक्षण अवगत करण्यासाठी दुर्बल घटकांना प्रशिक्षण देण्याचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच दुर्बल घटकातील मुला मुलींना चांगले शिक्षण देण्यासाठी निरनिराळ्या प्रकारच्या शिक्षणातील कल्याणकारी योजनादेखील राबवण्यात येतात यामध्ये प्रामुख्याने शाळेच्या ठिकाणापासून ये-जा करण्यासाठी मोफत बसप्रवास, शिष्यवृत्ती, मोफत गणवेश, मोफत वह्या पुस्तके इत्यादी सुविधा दुर्बल घटकातील मुलामुलींना देण्यात येतात. यात प्रामुख्याने त्यांचा विकास साध्य होईल हा हेतू त्या ठिकाणी मांडलेला असतो. दुर्बल घटकातील लोकांमध्ये कौशल्य शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. एवढेच नव्हे तर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी अशा प्रकारचे व्यावसायिक कौशल्य प्राप्तीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. दुर्बल घटकातील विकास साध्य करण्यासाठी मेडिकल कृषी फार्मसी टेक्निकल व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात त्यांच्या शिक्षण प्रवेशासाठी जागा आरक्षित ठेवण्यात येतात. तसेच या व्यावसायिक प्रशिक्षणामध्ये प्रवेश घेण्यासाठी समुपदेशनाचे उपक्रम देखील राबविण्यात येतात. महाराष्ट्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था, सारथी व महाज्योती अशा संस्थेच्या मार्फत दुर्बळ घटकातील शैक्षणिक विकासासाठी कार्यक्रम घेण्यात येतात.

२) **दुर्बल घटकांतील समुदायासाठी आरोग्य विषयक सुविधा पुरवणे**: स्वयंसेवी संस्था या दुर्बल घटकातील लोकांना आरोग्य विषयक समुपदेशन देणे आणि आरोग्य विषयक मोफत सुविधा पुरवण्याचे काम देखील करीत आहेत. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागामध्ये स्वयंसेवी संस्थांमार्फत प्रथमोपचार आरोग्य केंद्र चालवण्यात येतात. या केंद्रामध्ये ज्या सुविधा पुरवण्यात येतात त्या सर्व निशुल्क स्वरूपाच्या असतात तसेच काही स्वयंसेवी संस्थांमार्फत औषध उपचाराच्या योजना देखील राबवण्यात येतात या प्रामुख्याने शस्त्रक्रिया मोफत राबविण्यात येतात. डोळ्यातील विकार व मोतीबिंदू सारख्या आजारावर उपचार व शस्त्रक्रिया करण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत दुर्बल घटकातील लोकांसाठी उभारण्यात येतात.

आंबेडकर फाउंडेशन, सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयांतर्गत स्वायत्त संस्था, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींतील रुग्णांना किडनीच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना अनुदान स्वरूपात मदत देण्याच्या उद्देशाने वैद्यकीय मदत योजना राबवते. हृदय, यकृत, कर्करोग आणि मेंदू किंवा अवयव प्रत्यारोपण आणि पाठीच्या शस्त्रक्रियेसह इतर कोणतेही जीवघेणे रोग, ज्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.३.० लाखापेक्षा जास्त नाही. ही योजना देशातील मान्यताप्राप्त रुग्णालयांमार्फत राबविण्यात येते. डॉ. आंबेडकर फाऊंडेशन अंतर्गत योजनेची माहिती त्यांच्या वेबसाइटद्वारे आणि देशातील विविध विद्यापीठांमध्ये स्थापन केलेल्या डॉ.आंबेडकर चेअर्सद्वारे प्रसारित केली जाते.

सार्वजनिक आरोग्य आणि रुग्णालये हा राज्याचा विषय असल्याने दुर्बल घटकांसह सर्वांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित राज्य सरकारची आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (NHM) त्याच्या दोन मिशनसह, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) आणि राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना परवडणारी, सुलभ आणि दर्जेदार आरोग्यसेवा प्रदान करण्यासाठी तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य प्रदान केले जाते. दुर्बल विभाग. NUHM अंतर्गत माता

आणि बाल आरोग्य, लसीकरण, संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, गैर-संसर्गजन्य रोगांचे प्रतिबंध आणि व्यवस्थापन, भौतिक पायाभूत सुविधांसारख्या आरोग्य प्रणाली मजबूत करणे, कंत्राटी आधारावर आरोग्य मानवी संसाधन वाढवणे, यासंबंधित मोफत सेवांसाठी समर्थन देखील प्रदान केले जाते. मोफत रुग्णवाहिका सेवा, मोफत आवश्यक औषधे आणि निदान, गरिबांना मोफत डायलिसिस इत्यादी सेवा दिल्या जातात.

३) **दुर्बल घटकातील लोकांचे पुनर्वसन** : शेती, उद्योग व व्यवसायासाठी जलसिंचन तथा धरणाचे बांधकाम, रस्ते, महामार्ग आणि रेल्वे यासारख्या प्रकल्पामध्ये लोकांची घरं व जमिनी घेतली जातात. तेव्हा ते लोक विस्थापित होतात अशा विस्थापित लोकांचे पुनर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थाची मोठी भूमिका असते.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान देण्यात येणार आहे. मात्र, एखादे स्वतंत्र घर या योजनेमध्ये अंतर्भूत होणार नाही. असे घर बांधण्यात येणारे क्षेत्र हे सर्वांसाठी घरे (Housing for All Plan of Action) या योजनेचा भाग असणे आवश्यक आहे. या घटकातील लाभार्थ्यांना केंद्राचे अनुदान प्रति घरकुल दीड लाख रुपये तर राज्य शासनाचे अनुदान एक लाख रुपये असे एकूण २,५०,००/- (दोन लाख पन्नास हजार रुपयाचे अनुदान) देण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी म्हाडा, सिडको, एमएमआरडीए, एनआयटी, एसपीपीएल सारख्या निमशासकीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येणार आहे. या संस्थांमार्फत तयार केलेले प्रकल्प राज्यस्तरीय सुकाणू अभिकरणामार्फत राज्यस्तरीय अभियान संचालकांना व अंतिमत: मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मंजुरी व सनियंत्रण समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

४) **दुर्बल घटकातील लोकांचे मानवी हक्क** : दुर्बल घटकाच्या मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यात स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकारान्वये भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य आणि समानतेचे जीवन जगण्याची हमी देण्यात आलेली आहे . त्यानुसार दुर्बल घटकातील लोकांना सन्मानाने, स्वातंत्र्याने आणि समानतेने जगण्यास सक्षम आहे याची खात्री करण्यासाठी स्वयंसेवी संस्था कार्य करीत आहेत. स्वयंसेवी संस्था या असुरक्षित गटाच्या लोकांचे मानवी हक्कांची रक्षण करतात. तसेच त्यांच्यासोबत भेदभाव, शोषण आणि गैरवर्तन होणार नाही याची खबरदारी घेतात. तसेच जर त्यांचे शोषण व अमानवी वर्तन त्यांना मिळत असल्यास त्या दुर्बल घटकातील लोकांना कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यासाठी स्वयंसेवी संस्था भूमिका बजावतात. बालमजुरी आणि मानवी तस्करीपासून दूर ठेवण्यासाठी स्वयंसेवी संस्था प्रयत्न करतात. वंचित आणि भेदभावग्रस्त लोकांना सन्मानपूर्वक पुनर्वसन करण्यासाठी उत्कृष्ट अशा सुविधा देतात.

५) **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक** (EWS - Economically Weaker Section) : आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग हे भारतातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी देण्यात आलेले एक आरक्षण आहे. EWS वर्गातील व्यक्तींना शिक्षण आणि सरकारी नोकरीत दहा टक्के आरक्षण देण्यात आले, आणि या आरक्षणाचा लाभ केवळ खुल्या किंवा सामान्य (open or general) प्रवर्गातील उमेदवारांनाच होतो; अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी यासारख्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना या आरक्षणाचा लाभ घेता येत नाही. २०१९ मध्ये, भारतीय संसदेने १०३वी घटनादुरुस्ती करून हा कायदा लागू केला आहे.

ज्या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आहे अशा व्यक्तींना EWS अंतर्गत शिक्षण आणि नोकरीत आरक्षण मिळू शकते. कुटुंबाची शेती पाच एकरापेक्षा जास्त नसावी असाही निकष आहे. तसेच घर कसे असावे, याचे शहर आणि गावात काही वेगवेगळे निकष आहेत.

ईडब्ल्यूएस आरक्षण दिल्यामुळे भारतातील एकूण आरक्षण हे ५९.५ टक्के झाले आहे.

अनुसूचित जाती (SC) - १५ %
अनुसूचित जमाती (ST) - ७.५ %
इतर मागास वर्ग (OBC) - २७ %
आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक - १० %

केंद्रीय स्तरावर आणि सर्व राज्यांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे आरक्षण लागू आहे. महाराष्ट्रात आता ६२ टक्के आरक्षण आहे. २०२१ मध्ये महाराष्ट्र सरकारद्वारे मराठ्यांना दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरवले, त्यानंतर त्याच वर्षीपासून मराठा समाजाला ईडब्ल्यूएस आरक्षण लागू केले गेले.

६) **दुर्बल घटकांना थेट मदत :** स्वयंसेवी संस्था या गरीब, दुर्बल समुदायांसोबत थेट काम करतात, त्यांना अन्न, स्वच्छ पाणी, निवारा आणि परवडणारी आरोग्य सेवा यासारखी आवश्यक संसाधने पुरवितात. दुर्बल घटकाच्या सक्षमीकरणासाठी स्वयंसेवी संस्था दुर्बल घटकांना सामाजिक, आर्थिक आणि मानवी संसाधने विकसित करण्यात मदत करतात, तसेच त्यांच्यातील ज्ञान आणि कौशल्ये सुधारतात, स्वयंसेवीसंस्था या लोकांना उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतात आणि दुर्बल घटक आणि शासन व प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. या उपक्रमांच्या सहभागामुळे ते अधिक मजबूत होतील, जो समाजाच्या विकासाचा परिणाम आहे. स्वयंसेवी संस्था या स्वायत्त आहेत. त्या स्वतःचा निर्णय स्वतः घेऊ शकतात. स्वतःच्या कार्यपद्धतीने कार्य करू शकतात. म्हणून दुर्बल घटकाच्या त्यांच्या माध्यमातून विकासाला चालना मिळाली आहे.

स्वयंसेवी संस्था ही सरकार आणि सामान्य जनता यांच्यातील दुवा म्हणुन काम करते. जेव्हा काही समस्या सरकारपर्यंत पोहोचत नाहीत किंवा त्यांचे निराकरण केले जात नाही, तेव्हा या समस्या सरकारला सोपवण्यात एनजीओ कार्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. एनजीओ काही समस्यांकडे स्पष्टपणे लक्ष केंद्रित करता व समाजातील सर्व दु:खी मानवांसाठी जग अधिक चांगले बनवणे हे त्यांचे मुख्य ध्येय आहे.

७) **दुर्बल घटकांतील लोकांना कृषी विषयावरील कर्ज** : ग्रामीण व आदिवासी भागातील शेतकऱ्यांना कृषीविषयक कर्ज काढण्यासाठी स्वयंसेवी संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात बऱ्याच वेळा शेतीशी निगडित दुग्ध व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, मधमाशी पालन, सेरीकल्चर इत्यादी व्यवसाय सुरू करण्यासाठी स्वयंसेवी संस्था दुर्बल घटकातील लोकांसाठी प्रशिक्षण घेतात आणि प्रकल्प उभारण्यासाठी मदत करत असतात. तसेच दुर्बल घटकातील लोकांना पिकांसाठी कर्ज मिळून घेण्याची प्रक्रिया व पद्धत समजून सांगण्याचे कामदेखील स्वयंसेवी संस्था ह्या करत असतात. शेतीची अवजारे व यंत्रांची खरेदी शेतीमध्ये करायचे सिंचन इत्यादी पद्धतीचे माहिती व ज्ञान देण्याचे काम स्वयंसेवी संस्था करतात.

८) **दुर्बल घटक लोकांसाठी शासकीय योजना** : समाजातील दुर्बल घटक जसे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, अपंग, मुले, वृद्ध इत्यादींना त्यांच्या वंचित स्थितीतून बाहेर काढण्यासाठी सरकारने विशेष तरतुदी आणि उपाययोजना करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे, अशा गटांच्या सदस्यांना अनेक सामाजिक-आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो जसे की, आरोग्य सेवा, पोषण, शैक्षणिक सुविधा, सरकार-प्रायोजित योजना आणि उपाययोजनांपर्यंत प्रवेश नसणे. त्यामुळे, आजच्या सरकारने विकासाची फळे या लोकांपर्यंत पोहोचतील याची काळजी घेतली पाहिजे आणि विशेषत: त्यांच्या फायद्यासाठी तयार केलेल्या विशेष तरतुदी आणि योजनांद्वारे. असुरक्षित विभागांमध्ये विशिष्ट आजारांनी ग्रस्त लोकांचा समावेश होतो, विशेषत: एचआयव्ही/एड्स , कर्करोग आणि लैंगिक इत्यादी.

९) **समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष तरतूद** : सरकार समाजातील दुर्बल किंवा असुरक्षित घटकांसाठी शैक्षणिक सुविधा, रोजगाराच्या संधी, उपजीविका, परवडणारी आरोग्य सेवा आणि इतर आवश्यक सुविधा देऊन त्यांच्या जीवनाची स्थिती सुधारण्यासाठी विविध योजना प्रदान करते. त्यापैकी काही, आर्थिक सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करतात, ज्याचे खाली वर्णन केले आहे.

## ५.२.३ सक्षमीकरणाच्या योजना

१) **मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या पुनर्वसनासाठी स्वयं-रोजगार योजना** (SRMS) : SRMS ची सुरुवात २००७ मध्ये उरलेल्या मॅन्युअल सफाई कामगारांचे आणि त्यांच्या आश्रितांचे पर्यायी व्यवसायात पुनर्वसन करण्यासाठी करण्यात आली. वैशिष्ट्यांमध्ये एक वेळ रोख साहाय्य, स्टायफंडसह प्रशिक्षण आणि वैकल्पिक व्यवसायात गुंतण्यासाठी अनुदानासह सवलतीचे कर्ज यांचा समावेश आहे.

२) **राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ**(NSFDC) : या योजनेचा उद्देश "उद्योजकतेद्वारे गरिबीशी लढा" हा आहे. १९८९ मध्ये स्थापन केलेले, NSFDC सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अंतर्गत SC श्रेणीतील आणि दुप्पट दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या लोकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी वित्तपुरवठा, सुविधा आणि निधी संकलित करण्यासाठी कार्य करते. हे लक्ष्यित लाभार्थ्यांसाठी उत्पन्न निर्मिती योजनांना वित्तपुरवठा करते.

**या योजनेसाठी पात्रता निकष** : SC समुदाय + दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे उत्पन्न दुप्पट (DPL — ग्रामीणसाठी रु. ९८००० पेक्षा कमी आणि शहरी उमेदवारांसाठी रु. १२०००० पेक्षा कमी).

३) **राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ** (NSKFDC) : १९९७ मध्ये स्थापन झालेली आणि सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत, NSKFDC ही विविध कर्ज आणि बिगर कर्जाद्वारे संपूर्ण भारतभरातील सफाई कर्मचारी, सफाई कामगार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांच्या सर्वांगीण सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी एक सर्वोच्च संस्था म्हणून काम करते. प्रस्तुत महामंडळाद्वारे सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक विकास उपक्रमांना चालना देते. हे त्यांच्यासाठी स्वयंरोजगार उपक्रमांना प्रोत्साहन देते. ही योजना सफाई कर्मचाऱ्यांना कर्ज, सबसिडी, ॲडव्हान्स किंवा अनुदानाच्या माध्यमातून उत्पन्न देणाऱ्या योजनांमध्ये मदत करते. ही योजना समाजातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी कर्ज देते. हे स्वच्छताविषयक कामे करण्यासाठी प्रशिक्षण, गुणवत्ता नियंत्रण, तंत्रज्ञान अपग्रेडेशन आणि सामायिक सुविधा केंद्रांना प्रोत्साहन देण्यात देखील गुंतलेले आहे.हे तांत्रिक आणि उद्योजकीय कौशल्यांमध्ये समुदायातील कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढविण्यात मदत करते. ही योजना समाजातील स्वयंरोजगार असलेल्या सदस्यांना कच्चा माल किंवा इतर उत्पादन खरेदी करण्यासाठी किंवा त्यांनी स्थापन केलेल्या युनिट्समध्ये तयार वस्तू आणि सेवांचे विपणन करण्यात मदत करते.

४) **अनुसूचित जाती विकास महामंडळांना (एससीडीसी) सहाय्य**: SCDCs चे मुख्य उद्दिष्टे पात्र अनुसूचित जाती कुटुंबांची ओळख आणि त्यांना आर्थिक विकास योजना हाती घेण्यासाठी प्रोत्साहित करणे, योजनांना कर्ज हमी देण्यासाठी वित्तीय संस्थांना प्रायोजित करणे, कमी व्याजदराने मार्जिन मनीच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य देणे, परतफेडीचे दायित्व कमी करण्यासाठी राज्यांच्या विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत राज्यांना उपलब्ध केलेल्या निधीतून अनुदान देणे आणि इतर गरिबी निर्मूलन कार्यक्रमांशी आवश्यक जोडणी करणे.

**आदिम आदिवासी गटांच्या विकासाची योजना** : ही योजना कृषी, लघु पाटबंधारे, फलोत्पादन, पशुसंवर्धन, मृदा संवर्धन, शिक्षण, वने, मत्स्यव्यवसाय, सहकारी संस्था, ग्राम आणि लघुउद्योग या क्षेत्रातील

कुटुंबाभिमुख उत्पन्न देणाऱ्या योजना आणि किमान गरजा असलेल्या कार्यक्रमांसाठी आहे. आदिम आदिवासी गट (PTGs) ची ओळख तंत्रज्ञानाची पूर्व-कृषी पातळी, साक्षरता पातळी आणि घटती किंवा स्थिर लोकसंख्या यासारख्या काही निकषांवर आधारित होती. या योजनेत पायाभूत सुविधांचा विकास, गृहनिर्माण, जमीन विकास, आरोग्य, शिक्षण, पशुधन आणि कृषी विकास, विमा, सामाजिक सुरक्षा इत्यादींचा समावेश आहे.

५) **किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी योजना** (RGSEAG) : हे किशोरवयीन मुलींना खालील प्रकारे मदत करते.

**पोषण तरतूद :** (अ) IFA (लोह आणि फॉलिक ऍसिड), **(ब)** पूरक आरोग्य तपासणी आणि संदर्भ सेवा, **(क)** पोषण आणि आरोग्य शिक्षण, (NHE) **(ड)** जीवन कौशल्य शिक्षण, **(इ)** सार्वजनिक सेवांमध्ये प्रवेश करणे इत्यादीसह कुटुंब कल्याण, ARSH (किशोर प्रजनन आणि लैंगिक आरोग्य कार्यक्रम), गृह व्यवस्थापन आणि बालसंगोपन पद्धती यावर मार्गदर्शन राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत १६ आणि त्यावरील मुलींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

६) **STEP (महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमासाठी समर्थन)** : १९८६-८७ मध्ये केंद्रीय योजना म्हणून सुरू केलेली, STEP महिलांना रोजगारक्षमता देणारी आणि महिलांना स्वयंरोजगार/उद्योजक बनण्यासाठी सक्षम करणारी कौशल्ये आणि कौशल्ये प्रदान करते.

**स्त्री शक्ती पुरस्कार योजना :** १९९१ मध्ये स्थापन करण्यात आलेली ही योजना दरवर्षी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त (8 मार्च) महिला कर्तृत्ववानांना पुरस्कार देते.
या योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

**(अ)** ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक विकासाची प्रक्रिया बळकट करणे आणि सामाजिक बदलासाठी पोषक वातावरण निर्माण करणे. **(ब)** काटकसर आणि पत तत्त्वांवर आधारित एक लाख स्वयंसहाय्य महिला गट तयार करणे जे स्वावलंबी बनवते आणि महिलांना संसाधनांवर अधिक नियंत्रण ठेवण्यास सक्षम करते. **(क)** ग्रामीण महिलांना उत्पन्न मिळवून देणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभागी करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून गरिबी निर्मूलन करणे.

७) **किशोरी शक्ती योजना** (KSY)

**KSY ची उद्दिष्टे** (मुली-मुलांसाठी) : शिक्षणाच्या अनौपचारिक माध्यमांद्वारे साक्षरता आणि संख्यात्मक कौशल्ये प्रदान करणे. अधिक सामाजिक प्रदर्शन आणि ज्ञानाची इच्छा उत्तेजित करणे आणि त्याद्वारे निर्णय घेण्याची क्षमता सुधारणे. किशोरवयीन मुलींचे पोषण, आरोग्य आणि विकास स्थिती सुधारणे. आरोग्य, स्वच्छता, कौटुंबिक काळजी आणि पोषण याबाबत जागरूकता वाढवणे. जीवन-शिकण्याची कौशल्ये, प्रशिक्षण आणि किशोरवयीन मुलींना गृह-आधारित आणि व्यावसायिक कौशल्ये सुधारण्यासाठी अधिक संधी उपलब्ध करून देणे. सामाजिक वातावरणाची समज सुधारा आणि समाजाचे उत्पादक सदस्य बनण्यास मदत करा.

**राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना (NFBS) :** ही १००% केंद्र शासन प्रायोजित योजना आहे. आणि राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (NSAP) चा एक भाग आहे. या योजनेंतर्गत, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना नैसर्गिक किंवा आकस्मिक कारणांमुळे प्राथमिक अन्नदाताचा मृत्यू झाल्यास एकरकमी रु. १०,०००/- (अक्षरी — दहा हाजार रुपये) दिले जातात.

८) **राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना** : या योजनेंतर्गत, ६५ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची व्यक्ती स्वत: किंवा कुटुंबातील सदस्यांद्वारे उदरनिर्वाहाचे थोडे किंवा कोणतेही साधन नसलेली निराधार आढळल्यास दरमहा ठरावीक रक्कम प्राप्त करण्यास पात्र असते. सध्या दरमहा रु. ६००/- मदत केली जाते.

**स्वयं -अध्यनासाठी प्रश्न**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकातील लोकांसाठी कोणत्या प्रकारच्या सुविधादिल्या जातात.

२) भारतातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काय देण्यात आले आहे.

३) सफाई कामगारांसाठी कोणती संस्था कार्य करीत आहे.

४) स्वयंसेवी संस्था या दुर्बल समुदायांसाठी कोणकोणत्या संसाधने पुरवितात.

५) विस्थापित लोकांचे पुनर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थेची कोणती भूमिका असते.

## ५.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS - Economically Weaker Section) किंवा आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग हे भारतातील आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी देण्यात आलेले एक आरक्षण आहे.
- किशोरी शक्ती योजना (KSY) किशोरवयीन मुलींचे पोषण, आरोग्य आणि विकास स्थिती सुधारणे.
- मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना (SRMS) : SRMS ची सुरुवात २००७ मध्ये उरलेल्या मॅन्युअल सफाई कामगारांचे आणि त्यांच्या आश्रितांचे पर्यायी व्यवसायात पुनर्वसन करण्यासाठी करण्यात आली.
- STEP : महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमासाठी समर्थन.

## ५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) स्वयंसेवी संस्था ह्या सामाजिक आर्थिक दुर्बल घटकातील लोकांसाठी दर्जेदार शिक्षण व मापक किमतीमध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करतात.

२) भारतातील आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी देण्यात आलेले एक आरक्षण आहे.

३) NSKFDC ही विविध कर्ज आणि बिगर कर्जाद्वारे संपूर्ण भारतभरातील सफाई कर्मचारी, सफाई कामगार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांच्या सर्वांगीण सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी एक सर्वोच्च संस्था म्हणून काम करते.

४) स्वयंसेवी संस्था या गरीब, दुर्बल समुदायांसोबत थेट काम करतात, त्यांना अन्न, स्वच्छ पाणी, निवारा आणि परवडणारी आरोग्य सेवा यासारखी आवश्यक संसाधने पुरवितात.

५) जलसींचनासाठी धरण उभारणे, रस्ते, महामार्ग आणि रेल्वे यासारख्या प्रकल्पामध्ये लोकांची घरं व जमिनी घेतली जातात. तेव्हा ते लोक विस्थापित होतात अशा विस्थापित लोकांचे पुनर्वसनामध्ये स्वयंसेवी संस्थाची मोठी भूमिका असते.

## ५.६ सारांश

स्वयंसेवी संस्थेचे सामाजिक व आर्थिक मागासलेल्या घटकातील सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांची व कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाते. सेवाभावी संस्थेमार्फत दुर्बल घटकातील लोकांना शिक्षणाच्या सुविधा आर्थिक सुविधा व सर्वांगीण विकासाच्या योजना लाभ देण्यासाठी स्वयंसेवी संस्था त्यांच्या स्तरावरून मदत करीत असतात. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्यासाठी एक प्रकारची मदत होत असते.

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय

१) स्वयंसेवी संस्थेचे आर्थिक दुर्बळ घटकातील लोकांसाठी कार्य विशद करा.

२) स्वयंसेवी संस्थेचे मार्फत सामाजिक आर्थिक विकासाच्या योजना लिहा.

३) राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना विशद करा.

४) दुर्बल घटकातील लोकांचे मानवी हक्क विशद करा.

५) स्वयंसेवी संस्था व दुर्बल घटकांचे सक्षमीकरण यावर माहिती लिहा.

## ५.७ अधिक वाचण्यासाठी पुस्तके

१) रमेश म्हात्रे, (२०१७), *ग्रामीण विकासासाठी समाजकार्य.*

२) बाबा तिजोरी, *सामुदायिक विकास.*

३) डॉ. फारुक शेख (२०१८), *समाजकार्य सराव*, New Delhi, R.P. Publication.

# घटक ६ : स्वयंसेवी संस्थेपुढील समस्या आणि आव्हाने

***अनुक्रमणिका***

६.० उद्दिष्टे
६.१ प्रास्ताविक
६.२ विषय-विवेचन
६.२.१ स्वयंसेवी संस्थे समोरील समस्या
६.२.१ स्वयंसेवी संस्था समोरील आव्हाने
६.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
६.५ सारांश
६.६ सरावासाठी स्वाध्याय
६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ६.० उद्दिष्टे

- स्वयंसेवी संस्थेपुढील समस्यांचा सविस्तर अभ्यास करता येईल.
- स्वयंसेवी संस्थे समोरील आव्हाने समजतील.
- स्वयंसेवी संस्थेतील कामातील अडथळे कोणते आहेत ते समजेल.
- स्वयंसेवी संस्थेतील कामात राजकीय हस्तक्षेप कळेल.

## ६.१ प्रास्ताविक

भारतात आणि जगभर गेल्या ९० च्या दशकापासून स्वयंसेवी संस्थांची व्याप्ती प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. याच काळात जागतिक राजकारणात महत्त्वाचे बदल घडले सोव्हीयट युनियनच्या विघटनानंतर आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेच्या ताकतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. भारतासह अनेक देशांनी उदारीकरण जागतिकीकरण खाजगीकरण धोरणाचा स्वीकार केला. या घडामोडीच्या परिणामी राज्यसंस्थेच्या स्वरूपात बदल होण्याची सुरुवात झाली. सन १९९० नंतर स्वयंसेवी संस्थेच्या स्वरूपात कार्यात मोठ्या प्रमाणात संस्थागत आणि गुणात्मक फरक पडला. या काळातील महत्त्वाच्या बदलापैकी एक म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वयंसेवी संस्थेच्या कामाला मोठ्या प्रमाणात मान्यता मिळण्यास सुरुवात झाली. बालकामगारांचे प्रश्नांवर, स्त्रियांच्या प्रश्नांवर, वृद्धांच्या समस्यांवर व जागतिक पर्यावरणावर काम करणाऱ्या संस्थांची टक्कर सर्वप्रथम जागतिक स्तरावर घेण्यात आली. दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे विकसित देशातील स्वयंसेवी संस्था वित्तीय संस्था आणि सरकारी यांच्याकडून

स्वयंसेवी संस्थेकडे आर्थिक मदतीचा खूप मोठ्या प्रमाणात सुरू झाला विकासाचे विविध लाभ लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी स्वयंसेवी संस्था या शासन यंत्रणाच्या तुलनेने अधिक कार्यक्षमतेने काम करू शकतात. या भूमिकेतून मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य स्वयंसेवी संस्थांना देण्यास सुरुवात झाली. या काळात तिसरा महत्त्वाचा बदल म्हणजे राज्यसंस्थेने स्वयंसेवी क्षेत्राकडे विकास कामातील सहभागी घटक या दृष्टिकोनात सुरुवात केली. राजीव गांधींच्या काळात स्वयंसेवी संस्थांना सर्वप्रथम पंचवार्षिक योजनेत अधिकृतरित्या स्थान देण्यात आले. या सर्व घडामोडींच्या परिणामी स्वयंसेवी संस्थाचा विस्तार आणि महत्व यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. राजकीय संघटना, सामाजिक चळवळी यांचा प्रभाव, विविध कारणांनी पडला होता. सामाजिक हस्तक्षेपाच्या या मार्गाने परिणामकारकता कमी झाल्याने स्वयंसेवी संस्थाकडे अनेक लोक या काळात वळल्याचे दिसते. भारतातील स्वयंसेवी संस्था या आदिवासी दलित, शेतमजूर, महिला, असंघटित कामगार, वेशा, बाल कामगार, परितक्त्या अपंग इत्यादी गटासोबत रचनात्मक कार्य करीत आहेत. सामाजिक धोरणातील सदोष अंमलबजावणीमुळे स्वयंसेवी संस्था समोर विविध प्रकारच्या समस्या उद्भवलेल्या आहेत. शोषित वंचित लोकांच्या समूहाच्या परिस्थितीत गुणात्मक बदल घडवण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न करण्यात येतात. भारतातील स्वयंसेवी संस्थेवर सरकारकडून नियंत्रण ठेवण्यात येत आहे. वास्तव या वास्तव शोषित वंचित लोकसंवाच्या शाश्वत विकासाकडे जाण्यासाठी एक अडथळा निर्माण झाला आहे. अपुऱ्या निधीच्या कारणामुळे अथवा अपुऱ्या संसाधनामुळे वंचित सशक्त लोकांना स्वयंसेवी संस्थांनी गरजेनुसार सेवा सुविधा योग्य प्रमाणात मिळत नाही.

# ६.२ विषय-विवेचन

## ६.२.१ स्वयंसेवी संस्थेसमोरील समस्या

१. **असंघटित क्षेत्र** : भारतातील स्वयंसेवी संस्था, स्थानिक, राज्य व राष्ट्रीय स्तरावर कोणत्याही प्रकारचे संघटन नाही. त्याचबरोबर स्वयंसेवी संस्थेचे प्रत्येकाचे विशिष्ट उद्दिष्ट व कार्यक्षेत्र निश्चित असतात. त्यानुसार स्वयंसेवी संस्था संघटित होणेऐवजी उद्दिष्टानुसार कार्य करण्यामागे त्यांचा ओघ जास्त असतो. त्यामुळे त्यांच्यामधील कोणत्या स्वरूपाचे समन्वय व सहकार्याची भावना अस्तित्वात नसते. अशा असंघटित कारणामुळे प्रत्येक स्वयंसेवी संस्था एक स्वतंत्र अस्तित्व म्हणून तिच्या क्षेत्रामध्ये काम करते. बऱ्याचदा स्वयंसेवी संस्थांना निराळ्या समस्यांना सामोरे जावे लागते.

२. **पुरेशा निधीचा अभाव** : स्वयंसेवी संस्थांना सामाजिक बांधिलकी ठेवणारे दानशूर व्यक्ती अथवा व्यापारी संस्थांकडून देणगी स्वरूपात निधी मिळतो तसेच स्वयंसेवी संस्थांना समाज परिवर्तनाचे कार्य करण्यासाठी आवश्यक लागणारा निधी वेगवेगळ्या मार्गाने मिळवण्यासाठी प्रयत्न करावा लागतो परंतु स्वयंसेवी संस्थेला त्यांच्या कार्याला लागणारा निधी त्यांना पुरेसा उपलब्ध होत नाही तसे काही स्वयंसेवी संस्था ह्या मात्र संस्थेचे संपूर्ण कारभार चालवण्यासाठी ठरवलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देणगी रूपाने अथवा विशिष्ट कार्यासाठी शासनाकडून अनुदान घेण्यात येतो. परंतु तो निधी मात्र, पुरेशा प्रमाणात नसतो.

३. **राजकीय नेत्यांचे वर्चस्व** : काही स्वयंसेवी संस्थेतील सदस्यांची राजकीय बांधिलकी असल्याने राजकीय अजेंड्यावर त्या संस्थेचा कारभार अवलंबून आहे. ग्रामीण आदिवासी व शहरी भागातील स्वयंसेवी संस्थेतील विचारधारा ही राजकीय नेत्याची अथवा राजकीय पक्षासोबत पाहिले जाते, तेव्हा स्वार्थी स्वयंसेवी संस्थेमध्ये राजकीय नेत्यांनी स्थान मिळवलेले असते. स्वयंसेवी संस्था थोडे आर्थिक साहाय्य करून आपले वर्चस्व

निर्माण केले जाते. त्याचबरोबर राजकीय पक्षाचा फायदा घेऊन किंवा सत्तेचा फायदा घेऊन चुकीच्या मार्गाने शासकीय निधी व सौरती मिळाल्या जातात मात्र अशा संस्था विशिष्ट नेत्याच्या दबावाखाली कार्य करीत असतात सामाजिक कार्य करत असताना समाजामध्ये दुजाभाव व्यक्त केला जातो अशा संस्था खऱ्या अर्थाने समाज हिताचे उद्दिष्ट न राबवता राजकीय नेत्याच्या मर्जीला बळी पडत असतात.

४. **शासकीय अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप** : स्वयंसेवी संस्थेकडून शासकीय लाभ घेण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांवर दबाव तंत्र वापरण्यात येते. अशा त्या विषयी शासकीय अधिकाऱ्यांच्या मनात राग आणि दोष निर्माण होतो. स्वयंसेवी संस्था व शासकीय अधिकारी यांच्यामधील व्यावसायिक सहसंबंध न राहता शुत्रत्वाचे संबंध निर्माण होतात. अशा प्रकारे शासकीय अधिकारी व स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध नसल्याने राजकीय नेत्यांचा आधार घेऊन शासकीय अधिकाऱ्यांमार्फत हस्तक्षेप करून कार्यकर्त्यांना त्रास देतात. कार्यकर्त्याची छळवणूक करतात कार्यकर्त्यांना नाउमेद करतात अशा प्रवृत्ती शासकीय अधिकाऱ्यांमध्ये आढळून येतात.

५. **व्यावसायिक सामाजिक कार्यकर्त्यांचा अभाव** : स्वयंसेवी संस्थेमध्ये कार्य करणारे कार्यकर्त्यांजवळ व्यावसायिक शिक्षणाचा अभाव असतो. बहुदा स्वयंसेवी संस्थाकडे निधीच्या अभावामुळे व्यावसायिक सामाजिक कार्यकर्त्यांची नेमणूक करता येत नाही. काही कार्यकर्ते सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना जोडलेले असतात. या कार्यकर्त्यांना कोणताही अनुभव नसल्यामुळे योग्य रीतीने सामाजिक कार्यक्रम केले जात नाहीत.

६. **कार्यपद्धती मधील उणिवा** : काही स्वयंसेवी संस्थेचे उद्दिष्टे स्पष्ट नसतात. त्यांच्या कार्यात पूर्वनियोजनाचा अभाव असतो किंवा व्यवस्थापन कौशल्याचा अभाव असतो. संस्थेचे कार्यकारी मंडळ आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असतो. विशिष्ट व्यक्तींकडून संस्थेचे सर्व निर्णय घेतले जातात. निर्णय प्रक्रियेत कार्यकर्त्यांच्या मताचा आदर केला जात नाही . त्यामुळे स्वयंसेवी संस्थेचे निर्णय प्रक्रियेतील उणिवा आढळतात . ही समस्या देखील अनेक सेवाभावी संस्थांमध्ये असलेली दिसून येते तसेच शासकीय निधी वेळेवर उपलब्ध करून दिला जात नाही. त्याचा विपरीत परिणाम स्वयंसेवक संस्थेच्या कार्यपद्धतीवर होतो.

७. **स्वयंसेवी संस्था म्हणजे सत्ता काबीज करण्याचे साधन** : राजकीय व्यक्तींना स्वयंसेवी संस्थेचे सभासदत्व स्वीकारल्यानंतर स्वयंसेवी संस्थेच्या नावाने आपली प्रतिमा उजळण्याचे काम करतात. आणि संस्थेच्या माध्यमातून किंवा संस्थेच्या स्वरूप दुरुपयोग करून राजकीय क्षेत्रात सत्ता टिकविण्याचे प्रयत्न करीत असतात. यामुळे स्वयंसेवी संस्थांच्या निस्वार्थी कार्यपद्धतीमुळे मर्यादा येतात. म्हणून स्वयंसेवी क्षेत्रात एक समस्या निर्माण झाली आहे.

८. **शासनाच्या अनुदान फायदा घेणाऱ्या संस्था** : काही स्वयंसेवी संस्था स्वतःच्या उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याचे सोडून फक्त शासनाच्या अनुदान चालवण्यात येतात. त्यामुळे अशा संस्थांना स्वतःचे अस्तित्व ठेवता येत नाही. शासनाकडून विविध विकासाचे योजनांच्या अंमलबजावणीसाठी संस्थामार्फत राबवताना दिसून येते. शासनाच्या नियमांना बांधिलकी राहून संस्थेला कार्य करावे लागते. त्यामुळे समाजाच्या गरजा ओळखून उद्दिष्ट ठरवण्यापेक्षा शासनाने ठरवून दिलेल्या कार्यक्रमांनुसार व मर्यादित कार्य करण्याची प्रक्रिया झाल्याची दिसून येते अशा स्वयंसेवी संस्थेची कामगिरी धोक्यात येते.

९. **नेतृत्वाच्या भावी पिढीचा अभाव** : स्वयंसेवी संस्थेचे कार्याचे उद्दिष्ट नसल्याकारणामुळे संस्थेतील सर्व सदस्य व कार्यकर्त्यांचे काम करण्यासाठी प्रदीर्घ काळ काम करीत असताना परंतु नव तरुण, तरुणींना नेतृत्व

करण्याची संधी देत नाही. त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक गुणांचा व कौशल्याचा विकास होत नाही. त्यामुळे नवीन नेतृत्वविकास होण्यासाठी एक अडचण तयार होते.

१०. **उद्दिष्टपूर्तीला महत्त्व** : काही स्वयंसेवी संस्था सामाजिक कार्य करत असताना वेगवेगळ्या मार्गाने निधी मिळण्यासाठी किंवा शासनाकडून अनुदान मिळवण्यासाठी उद्दिष्टपूर्तीला अधिक महत्त्व देतात. कार्याचा खऱ्या अर्थाने समाजाला किती फायदा होतो या गोष्टींचा विचार न करता दात्यामंडळीकडून देणग्या मिळवणे आणि पैशाची उधळपट्टी करणे किंवा निधीचा गैर व्यवहार करणे या गोष्टीला प्राधान्य देतात अशा स्वयंसेवी संस्थांचा मूळ हेतूपासून त्या दूर जातात.

## ६.२.२ स्वयंसेवी संस्था आव्हाने

**प्रस्ताविक** : भारतातील स्वयंसेवी संस्थेच्या कार्यालय प्रणालीतील दोषांमुळे सेवाभावी संस्थांना निरनिराळ्या समस्या व आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. वैयक्तिकच स्वार्थापलीकडे जाऊन व्यापक समाज हिताच्या भूमिकेतून समाजातूनतळागाळातील वर्गाला उपयोगी पडणारे काम करण्याची मनीषा असणारे अनेक लोक समाजात असतात. सेवा कार्य, समाजकार्य, संघर्षात्मक कार्य राष्ट्रात व कार्य प्रबोधनात्मक कार्य करण्याचे सेवा स्वयंसेविरुद्ध तिचा ऱ्हास आणि कमी होताना दिसून येत आहे. गेल्या दोन दशकात सहभागी क्षेत्रात घेतलेल्या वळणामुळे त्याबाबत चिंतेची भावना सर्वत्र दिसते. सेवाभावी क्षेत्राला पुरवण्यात येणाऱ्या निधी मागणी हेतू समजून घेण्यासाठी जागतिक स्तरावर बदलती आर्थिक राजकीय अवस्था विचारात घेण्याची गरज मांडली जात आहे. या सर्व गोष्टींचा विचार भारतात वेगाने बदलत चाललेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर करणे आवश्यक आहे.

१. **स्वयंसेवी संस्थेचे व्यापारी स्वरूप** : अनेक गरीब देशात बहुसंख्य राष्ट्रीय कंपन्या सी एस आर अंतर्गत स्वयंसेवी संस्थेच्या कार्यप्रणालीत शिरकाव झाला आहे. तसेच नैसर्गिक संसाधनाचा खाजगीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला वेग आला आहे. व्यापारी पद्धतीने स्वयंसेवी संस्थेचे उद्दिष्ट व ध्येय यांच्या अंबलबजावणी होत नाही. तसेच सामाजिक जबाबदारी म्हणून औद्योगिक क्षेत्रातून देण्यात येणारा निधी अगदी औद्योगिक क्षेत्रामार्फत हेतू ठेवूनच निधीचे वाटप केले जाते. स्थानिक लोकांचा व समस्याग्रस्त लोकांच्या समस्यांवर, गरजेंवर अवलंबून उपक्रमाचे व कार्यक्रमाची दिशा नसते. व्यापारी दृष्टिकोन ठरवण्यात आलेल्या कामाची चौकटीनुसार स्वयंसेवी संस्थेचे कार्य स्वीकारण्याकडे कल आहे. २०२० च्या दशकात प्रत्यक्ष लोकांना काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा अनुभव अडचणी लक्षात घेऊन प्रकल्पात बदल केले जात नाही. सर्व कामातून सिद्धता तत्व मूल्य बाजूला सावरून कटिंग एजन्सीच्या निर्धारित व्यक्तीनुसार कार्य करावी लागते. बदलत्या परिस्थितीत समजून घेऊन सर्जनशीलता प्रयोग क्षमता याच्या आधारे त्यामधून मार्ग काढणे कामाला महत्त्व सांगते व त्यामुळे आघात होतो.

२. **स्वयंसेवी संस्थेचा लोकसहभाग तत्त्व** : स्वयंसेवी संस्थाच्या कार्यरचनेत लोक सहभागाच्या तत्त्वाचा पुरस्कार असला तरी लोकांपासून तुटण्याच्या प्रक्रिया त्यांच्या कामातून वेगाने घडताना दिसते. सामाजिक विकासात अथवा कल्याण उपक्रमात आवश्यक लागणारा लोकसहभाग कोणत्या चौकटीत घ्यावा, हे स्वयंसेवी संस्थाच ठरवितात. यामधून लोकसहभागाचा आभास तयार होत असला; तरी लोकांचा खराखुरा सहभाग मिळत नसल्याने शासकीय योजनांच्या कामाला मर्यादा लागू होतात. सर्व संस्थांनी सुरू केलेले काम, प्रकल्प योजना व त्यासाठी निधी असेपर्यंत सुरू राहते हा सर्वसामान्य दृष्टिकोन आहे. हे काम स्थानिक लोक समाजाचे काम न राहता बाहेरील स्वरूपाचे बनते. या कामासाठी कार्यकर्त्यांना पगार मिळतो याची जाणीव

असल्याने लोकांमध्ये अशा कार्यकर्त्यांप्रती जिव्हाळा, प्रेम, आदर अशी भावना राहत नाही. आपल्यासाठी काम करणे ही कार्यकर्त्याची सेवा नसून तो हक्क अशी भावना बळावते.

३. **स्वयंसेवी संस्थेच्या कार्यातील उणिवा** : समाजात बदल घडवण्याचे उद्दिष्ट ठेवणाऱ्या स्वयंसेवी संस्थेच्या क्षेत्रात अपारदर्शकता, उत्तरदायित्वाचा अभाव अथवा व्यक्तिकेंद्री कार्यपद्धती, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता अशा अनेक अपप्रवृत्ती शिरलेल्या दिसतात. स्वयंसेवी संस्थांमध्ये कार्यकर्त्यांच्या राजकीय जाणीव व वैचारिक बैठकीत प्रत्यक्ष काम करण्याची कार्यकर्त्याची तयारी हा सर्वात महत्त्वाचा निकष ठरतो. ज्या समाजसव्यवस्थेविरुध्द, त्यातील मूल्यविरुद्ध काम करण्याची मानसिकता कार्यकर्त्याच्या व्यक्तिगत जीवनात शिरलेल्या आढळते. यामधून सार्वजनिक काम व वैयक्तिक जीवन यांच्यामधील दैववाद समर्थन करणारे तत्त्वज्ञान वाढले आहे. पैशाच्या अवाजवी वापरण्यासाठी व अपव्ययी वापर वैयक्तिक स्वार्थ वा महत्त्वाकांक्षा ह्या वापरणे संस्थेच्या साधनांचा गैरवापर करणे अशा विविध स्वयंसेवी क्षेत्रात आढळतात.

**स्वयं-अध्यनासाठी प्रश्न**

***एका वाक्यात उत्तरे लिहा.***

१) भारतातील स्वयंसेवी संस्थांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते.

२) स्वयंसेवी संस्थेला कोणत्या कारणामुळे निधी मिळविण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

३) व्यावसायिक सामाजिक कार्यकर्त्याची नेमणूक कोणत्या कारणामुळे करता येत नाही.

४) स्वयंसेवी संस्थेच्या कारभारात कोणाचा हस्तक्षेप वाढला आहे.

## ६.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) **असंघटित क्षेत्र** : भारतातील स्वयंसेवी संस्था स्थानिक राज्य व राष्ट्रीय स्तरावर कोणत्याही प्रकारचे संघटन नाही.

२) **व्यावसायिक सामाजिक कार्यकर्त्यांचा अभाव** : स्वयंसेवी संस्थेमध्ये कार्य करणारे कार्यकर्त्यांजवळ व्यावसायिक शिक्षणाचा अभाव असतो.

## ६.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) भारतातील स्वयंसेवी संस्थांमध्ये संघटन निर्माण करण्यास अडचणी निर्माण होतात.

२) स्वयंसेवी संस्था ह्या त्यांच्या धोरणानुसार निधी उपलब्ध होण्यास फार अडचणी निर्माण होत आहेत.

३) व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ते यांची निधीच्या कमतरतेमुळे करता येत नाही.

४) स्वयसेवी संस्थेच्या कारभार मध्ये राजकीय हस्तक्षेप वाढलेला आहे.

## ६.६ सारांश

स्वयंसेवी संस्थांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते त्यात प्रामुख्याने सेवाभावी संस्थेचे एक प्रकारचे संघटन नसून त्यांच्यामध्ये विस्कळीत व असंघटितपण्याची एक भावना निर्माण झालेली आहे. तसेच

सेवाभावी संस्थांना काम करताना आवश्यक लागणार निधी सहजपणे उपलब्ध होत नाही किंवा अपुऱ्या पणाने निधी उपलब्ध होतो. तसेच त्यांना वारंवार राजकीय नेत्यांच्या हस्तक्षेपाला सामोरे जावे लागते. एवढेच नव्हे तर निधीच्या आपूर्ततेमुळे प्रशिक्षित कार्यकर्त्यांची नेमणूक संस्थेमध्ये करता येत नाही.

स्वयंसेवी संस्थेला अनेक प्रकारचे आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये प्रामुख्याने सेवाभावी संस्थेचे व्यापारीकरण सुरू झालेले आहे एवढेच नव्हे तर लोकसभागाचा वनवा दिसून येतो. स्वयसेवी संस्थेच्या कार्याचे स्वरूप एखाद्या राजकीय पक्षाशी निगडित असलेले जाणवते.

## ६.७ सरावासाठी स्वाध्याय

१) स्वयंसेवी संस्थासमोरील आव्हाने विशद करा

२) स्वयंसेवी संस्थेसमोरील समस्या थोडक्यात लिहा.

## ६.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) डॉ. मच्छिंद्र सकटे, प्रा. प्रकाश जगताप (२०१९) *बिगर सरकारी संस्था आणि विकास*, कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्र.

२) डॉ. दत्ता पवार, *ग्रामीण विकासासाठी समाजकार्य*, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ.

३) Dr. George Joseph, Mr. P. O. George (1997) *Social Work Education emergin concerns*, Keral, Rajagiri College of Social Sciences, Kalamssery.

*सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित*

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**( महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले )**


ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७

फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६

वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac ● http://ycmou.ac.in

*सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित*

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

( महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले )


ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७

फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६

वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac ● http://ycmou.ac.in